TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192764
UNIVERSAL LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M86 T15A  Accession No. M476

Author [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below.

# अनेक आशीर्वाद

लेखक
ना. धों. ताम्हनकर

किंमत ३॥ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पेठ, पुणें २

संचालक
भ. त्र्यं. देशमुख,
बी.ए., एल्‌एल्. बी.

१ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

क्रमांक ५४
२५ एप्रिल १९४४

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ फुलें आणि दगड १।।।
२ घरट्याबाहेर १।।।
३ पहिलें प्रेम ( आ. २ री. ) ३
४ जळलेला मोहर ३
५ क्रौंचवध ४
६ सायंकाल (आ. २ री.) २।।
७ अविनाश १।।।
८ मंदाकिनी १।।।
९ सहा भाषणें २
१० कलिका २।
११ स्त्री आणि पुरुष २
१२ पांढरे ढग ४।

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ अवशेष २
२ नागकन्या २
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार ( जप्त ) ४
५ चंदनवाडी ६।।
६ व्यक्तिरेखा २।

## ना. धों. ताम्हनकर

१ तात्या भा. १ ला. २।।
२ तात्या भा. २ रा ३
३ निवाडे भा. १ ला. २।।
४ चकमकी २।।
५ बच्चा नवरा २।।
६ अनेक आशीर्वाद ३।।

## चिं. वि. जोशी

१ आणखी चिमणराव (आ.२) ४
२ नवें भारूड २
३ स्टेशनमास्तर २

## साने गुरुजी

१ पुनर्जन्म २।।
२ आस्तिक २।।

## दत्तु बांदेकर

१ सख्याहरी १।।।
२ नवी आघाडी १।।

## द. र. कवठेकर

१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ४

## वा. म. जोशी

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २।
१ नवें जग ?–पु. य. देशपांडे २।।
१ रॉयचरित्र–भाई बेके १।।

## प. ले. वि. स. खांडेकर

१ काव्यज्योति १
१ पारंब्या-आनंदीबाई [illegible] २।।

## लक्ष्मण० सरदेसाई

१ ढासळलेले बुरूज २

## प्रो. वि. ह. कुलकर्णी

१ व्यक्तिचित्रें
१ फसगत–ना. ह. आपटे २।।
१ साखरपुडा–प्र. के. अत्रे १।।

## कृष्णाबाई मोटे

१ मीनाक्षीचें जीवन २।
१ चलती नाणीं र. गो. सरदेसाई २

## रा. श्री. जोग

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८
१ हितपत्रें–ना. म. पटवर्धन ३
१ बेबीची बहीण वि. वि. बोकील ३
१ ग्रह आणि तारे-सत्यग्राही ४।।

## अनंत काणेकर

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३

## काकासाहेब कालेलकर

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १।।

## य. दि. पेण्ढरकर

१ प्रापंचिक पत्रें ३
१ स्टॅलिन–वि. म. भुस्कुटे ३।।

## कमलाबाई टिळक

१ आकाशगंगा २।।

# आगामीं प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ कालचीं स्वप्नें
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय )
१४ फुलें आणि कांटे
१५ पहिली लाट
१६ कल्पलता

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ती उदयन
५ उर्वशी

### द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी

### ना. ह. आपटे

१ साजणी

### ना. धों. ताम्हनकर

१ निवाडे भा. २ रा
२ गुजाताई
३ दाजी भा. १ ला
४ शेजारी

### य. दि. पेण्ढारकर

१ घायाळ

### प्र. के. अत्रे

१ ललित वाङ्मय
२ 'मी' कसा झालो

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

### अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे
३ पिकली पानें ( दुसरी आवृत्ति )

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ तूं आणि मी

### कुसुमावतीबाई देशपांडे

१ मोळी

### शकुंतलाबाई परांजपे

१ भिल्लिणीचीं बोरें

सप्रेम समर्पित

*विवाहेच्छु व विवाहित*
*चिरंजीव मंडळींस—*

## प्रास्ताविक

लोकांचीं पत्रं वाचूं नयेत असं वाचकांना या ठिकाणीं मुळींच वाटायला नको. कारण हा पत्रव्यवहार ज्यांच्यामधें झाला, त्यांची दुसऱ्यांच्या नजरेस पडूं नये अशी कोणतीहि चोरटी गोष्ट यांत नाहीं. तशी असती तर ती उजेडांत आणण्याची इच्छा प्रकाशकांना झाली नसती; आणि झाली असती तरी ते त्यांचे लाड मीं पुरविले नसते. हा पत्रव्यवहार विशिष्ट व्यक्तींत झालेला असला, तरी त्याचं स्वरूप सार्वजनिक आहे. कारण ज्या निमित्तांनीं पत्रांची ही आवकजावक झाली, ती निमित्तं माझ्या परिस्थितीतल्या बहुतेकांच्या आयुष्यांत घडत असतात.

हा पत्रसंग्रह प्रसिद्ध करण्यांतच नव्हे, तर तो जमवून आणण्याच्या कामींहि मित्र रा. ज. देशमुख यांचं मोठं सहाय्य मला मिळालं आहे.

*अनेक आशीर्वाद.*

त्याबद्दल त्यांना आवडत नसलं तरी मी त्यांचे आभार मानणार. आर्यभूषण छापखान्याच्या व्यवस्थापकांनीं मुद्रणकार्य सत्वर व सुबक केलं याबद्दल मी त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानतों.

२० एप्रिल १९४४ **ना. धों. ताम्हनकर**

*अनेक आशीर्वाद,* 1

तुला पत्र लिहितांना संकोचल्यासारखं कधीं वाटलं नाहीं. आज मात्र थोडं तसं वाटतं आहे खरं. कारण, माझे वडील ज्या विषयांसंबंधीं माझ्याशीं कधींहि बोलले नाहींत व मीहि त्यांच्यापुढं त्या बाबतींत कधीं तोंड उघडलं नाहीं त्या विषयांत मी तुझ्यापुढं 'सूत उवाच' करणार आहे. मुलाचं लग्न हा पूर्वीं सर्वस्वीं वडिलांच्या इच्छेचा व अधिकारांतला प्रश्न होता. मुलानं ते सांगतील तेव्हां, ठरवतील त्या नवरीपुढं, मुंडावळ्या बांधून उभं रहायचं, एवढंच त्याचं काम असे. आणि मुलगा लग्नासारख्या प्रश्नांवर मत देण्याइतका जाणता तरी कोठें असे त्यावेळीं! माझंच उदाहरण देतां येईल. मी त्यावेळीं इंग्रजी पांचवींत असेन, म्हणजे सारा पंधरा वर्षांचा! एके दिवशीं शाळेंतून घरीं आलों, तेव्हां माझ्या लग्नाच्या याद्या सोप्यावर चाललेल्या दिसल्या. मला गंमत वाटली मनांत! आपलं आतां लग्न होणार, म्हणजे आपणास सुरेखशी बायको मिळणार, हा विचार माझ्या

मनांत आला नाहीं; तर या निमित्तानं चार आठ दिवस शाळेला डच्चू देतां येईल, केळवणं सुरू होतील, आणि प्रत्यक्ष समारंभांत चार दिवस पोळ्या चापायला मिळतील, रेशीमकांठी नवं धोतर मिळेल, एक तरी कोट करतील, आणि आतां पुढं वहाणा जोडे वापरायला सांपडतील, याच आनंदांत मी गुंग होऊन गेलों होतों. सांगायचं तात्पर्य असं कीं, वैवाहिक जीवन आणि त्यांतल्या सोयी-गैरसोयी याबद्दलचा विचार करायची पात्रता येण्याआधींच मुलांचीं लग्नं त्यावेळीं होऊन जात. पण आतां मनु पालटला आहे, आणि मुलांचीं लग्नं मोठेपणीं होऊं लागली आहेत. मोठ्या मुलांचीं लग्नं त्यांचा विचार न घेतां ठरविणं शक्य नाहीं आणि इष्टहि नाहीं. तरी पण लग्नाच्या गोष्टी बापलेकांनीं कसल्या बोलायच्या, असा वाऊ पूर्वसंस्कारामुळें वाटतोच. तुझ्या लग्नाच्या गोष्टी घरांतून कानावर यायला लागल्यास दोन वर्षं होऊन गेलीं असतील. ती. आईच्या मतें तर तुझं लग्न होऊन पांच वर्षं तरी व्हायला पाहिजे होती. परंतु हा प्रश्न तुझ्यापुढं कसा काढावयाचा म्हणून मी दबकत होतों. गेल्या वर्षापर्यंत तुझी विद्यार्थीदशाच चालू होती, ती पुरी झाल्यावर पाहूं, असं मीं मनांत व घरांतहि म्हणत आलों. वाचनानं आणि आपल्या आजूबाजूस चाललेले जगाचे व्यापार पाहून माझे विवाहविषयक विचार आतां पुष्कळच बदलले आहेत, आणि मुलांमुलींशीं मोकळ्या मनानं विचारविनिमय केला पाहिजे हें मला पटलं आहे. पण संकोच वाटतो हेंहि खरं आहे.

शिक्षण पूर्ण करून गतवर्षी तूं नोकरी पत्करून स्वतःच्या स्वतंत्र जीवनास प्रारंभ केला आहेस. आतां ही गोष्ट दूर सारण्यास मला कोणतीहि सबब सांगतां येण्यासारखी नाहीं. घरची टोंचणी तर जोरावत आहेच. पण बाहेरूनहि चालना मिळूं लागली आहे. उपवर मुलींचे पालक भेटून जात आहेत, फोटो व टिपणं पाठवीत आहेत. त्यांना 'मुलाचा विचार घेऊन

कळवितों ' असं सांगून मी मोकळा होतों आहे आणि म्हणूनच या बाबतींत तुझं म्हणणं काय आहे तें कळविण्याबद्दल मी तुला हें पत्र लिहीत आहे. उत्तरीं खुलासा करावा.

आम्ही येथील सर्व मंडळी खुशाल आहोंत. प्रकृतीस जपून राहून कुशल-वर्तमान वरचेवर कळवीत असावें. शेजारचे रामाजीपंत सौ. शिताकाकूसह काशीयात्रेस निघाले असून एक दिवस त्यांचा मुक्काम पुण्यास होणार आहे. तुझ्याकडेच उतरण्याबद्दल मीं त्यांना सांगितलं आहे. त्यांना लागेल ती मदत तूं करशीलच. रामभाऊ आणि शिताकाकूंची एखादी चकमक तुझ्या पुणेकर शेजाऱ्यांसमोर न झडेल याबद्दल तुला घेतां येईल तेवढी दक्षता तूं घे. मग व्हायचं असेल तें होईल. हे आशीर्वाद.

*तुझा*
**दादा**

## ती. दादांना सा. न. वि. वि. २

आपलं पत्र येऊन आठ दिवस होऊन गेले. दरम्यान रामभाऊकाका व सीताकाकूहि येऊन गेल्या. माझ्या खोलीवरच मीं त्यांना उतरवून घेतलं होतं. काकू खानावळींत जेवायला कशा तयार होतील व त्या तयार झाल्या नाहींत तर त्यांची कशी सोय करावी या फिकिरींत मी होतों. पण एकादशीनं माझं संकट दूर केलं. काकूंना केळीं रताळीं वगैरे पदार्थ आणून दिले व त्यांनीं स्टोव्हवर फराळाचे जिन्नस बनविले. मी व रामभाऊकाका बोर्डिंगांत जेवून आलों. आपल्या अंदाजाप्रमाणं काकूंच्या, एकच काय, पण दोन चकमकी झडल्या. एक काकांच्या बरोबर नाशिकला दोन दिवस रहायचं कीं तीन दिवस रहायचं या विषयावर, व दुसरी आमच्या दूधवाल्याबरोबर! 'मापाला कचकचीत दोन आणे घेतोस आणि दुधांत पाणी घालतोस! लाज नाहीं का वाटत?' असं चक्क विचारिलं त्यांनीं! 'वाटलं तर घ्या नाहींतर सोडा' असा जबाब त्यानं दिल्यावर काकू कडाडल्या 'तूंच सोड तुला मस्ती आली

असली तर ! तुझी एवढी पत्रास पाहिजे कशाला ? एक म्हैस आणून बांधीन बाप्याच्या दारांत.' 'या खेडवळ बाईच्या बोलण्याकडं लक्ष देऊं नको' असं समजून सांगून मीं त्याला वाटेला लावलं ! त्यावर काकू माझ्यावर उखडून म्हणाल्या 'दूधदुभत्यांतली अक्कल तुम्हां पुरुषांना जन्मांत यायची नाहीं कधीं. बायकांनींच करावं तें काम ! दादा वैनींचे कान उपटतें परत गेलें म्हणजे ! पोर एवढा घोडा झाला तरी त्याचं लगीन करूं नये म्हणजे काय ? चांगलं घर घेऊन रहायचं आणि त्यांत बायको नाहीं !' करतां येईल तितका संक्षेप करून मीं हें लिहिलं आहे. खरोखर, काकू किती आणि कसकसं बोलल्या असतील याची कल्पना आपल्यास येईलच.

आपण गेल्या पत्रांत विचारला तोच प्रश्न काकूंनीं या चकमकीच्या द्वारें माझ्यापुढं ठेवावा या योगायोगाची मला मौज वाटली.

आपल्या या प्रश्नाचं उत्तर देतांना मलाहि बुझल्यासारखं वाटतं आहे. मुलामुलींना स्वतःच्या विवाहाचे कामीं वडिलांकडून स्वातंत्र्य दिलं जात नाहीं याचा निषेध सर्वच तरुण विद्यार्थी–विद्यार्थिनी करितात तसा मींहि केव्हां केव्हां केला होता. कॉलेजांतील एका वादविवाद सभेपुढं तर मी 'मला माझ्या लग्नांत वडिलांकडून सरळपणानं स्वातंत्र्य मिळालं नाहीं तर मी त्यांच्याशीं बंड करीन' असंहि आवेशानं म्हटलं होतं. पण आज आपणच माझ्या इच्छा कोणत्या हें विचारीत असतां मला लाजल्या–बुझल्यासारखं होतं आहे. याचं माझं मलाच आश्चर्य वाटतं !

लग्नाचा प्रश्न आम्हीं मुलांनीं वडील मंडळींशीं खेळीमेळीनं विचारविनिमय करून सोडवावा असं मलाहि वाटतं. आपल्या मनांत माझ्या लग्नासंबंधींचे विचार घोळत आहेत हें मला वर्षाआधींच ठाऊक झालेलं आहे. मी दिवाळींत घरीं आलों होतों, तेव्हां आपण व ती. सौ. वैनी यासंबंधीं स्वयंपाकघरांत कांहींतरी बोलत होतां, तें मीं माजघरांतून ऐकलं ! आणि तिथूनच मागं

फिरलों. वास्तविक आपणां उभयतांपुढं येऊन, बोलण्यांत भाग घेण्यास कोणती हरकत होती ? परंतु मुलांनीं वडिलांपुढं आपल्याच लग्नाचा विषय बोलणं हा उद्धटपणा, असा समज, कसा तें कोण जाणे, आमच्या मनांत घर करून राहिला आहे आणि म्हणूनच मी त्यावेळीं भिऊन दूर पळालों.

आतां आपण विचारलं आहे म्हणून लिहितों. माझ्या लग्नाच्या बाबतींत मीं आतांपर्यंत कधींसुद्धां विचार केला नाहीं. मला अद्यापि त्याची ओढहि लागली नाहीं. उलट, आजच काय नडलं आहे, असं मला वाटतं ! ती. सौ. वैनीला म्हणावं सीताकाकू मला ‘ घोडा ’ म्हणाल्या असल्या तरी मी तसा बेफाट वाढलों नाहीं. तेव्हां तिनंहि या विषयांत विनाकारण घाई करूं नये. आणखी कांहीं दिवस चाललं आहे तसंच चालूं दे !

ती सौ. वैनीस नमस्कार. श्रुत होय ही विज्ञापना.

आपला

बापू

*अनेक आशीर्वाद विशेष.*

३

तुझं खुशालीचं पत्र वाचून आनंद झाला. पत्र लिहिण्याची तुझी चालढकल मला योग्य वाटत नाहीं. विशेष कांहीं असेल तेव्हांच पत्र लिहायचं धोरण घरच्या माणसापुरतं तरी ठेवतां कामा नये असं मला वाटतं ! पत्र नाहीं याचाच अर्थ सगळं ठीक चाललं आहे असा घ्यावा असं तूं अेकदां घरांत बोलला होतास; पण आमचीं मनं मुलांच्या बाबतींत भित्रीं आणि संशयखोर बनलेलीं असतात. त्यामुळं पत्र आलं नाहीं तर सर्व ठीक आहे, अशी निश्चिंतता वाटण्याअैवजीं विपरीत विचारच मनांत डोकावूं लागतात. म्हणून दर आठ दिवसां तुझं खुशालीचं पत्र यावं. रविवारच्या सुटींत हें काम करायचंच असा निश्चय करावा व तो दक्षतेनें पाळावा.

तुझ्या विवाहाबाबतचे तुझे विचार तूं कळविलेस त्यांवर तुला फिरून लिहावयाचं आहे. त्याच वेळीं तुला त्याचं उत्तर द्यावयाचं, पण तुझ्या म्हणण्यावर शांतपणें विचार करून मगच लिहावं असं वाटल्यामुळं विचार करण्यांत एक

दोन महिने गेले, " लग्नाची घाअी नको, चाललं आहे तसंच आणखी कांहीं दिवस चालावं. " अशी आपली अिच्छा तूं कळविलीस. " कांहीं दिवस " असं मोघम लिहिण्या अैवजीं सहा महिने, वर्ष, दोन वर्षं असं कांहीं निश्चित लिहिलं असतंस तर बरं झालं असतं. " लग्नाचा प्रश्न कांहीं दिवस लांबणीवर टाकावा " असं तूं कळविलंस यावरून कांही दिवसांनीं तरी लग्न करण्याची तुझी अिच्छा आहे, हें कळून आलं. आपल्यांतल्या लहान मुलींना ' तुला काळा नवरा हवा कीं गोरा ? ' असं गमतीनं विचारलं कीं, " आम्ही लगीनच करणार नाहीं " असं उत्तर त्या देतात. अलीकडच्या तरुण मुलांतहि असं उत्तर देण्याची प्रथा पडत चालल्याचं दिसतं ! दिवाणांच्या अवधूतचं तुला माहीत असेलच. दहा वर्षं त्यानं विवाहविन्मुखता दाखविली आणि पस्तीशी उलटल्यावर गतवर्षी त्यानं लग्न करून घेतलं. तुला अविवाहित जीवनाचं वेड नाहीं, हें समाधान तुझ्या त्या पत्रानं दिलं.

आणखी कांहीं दिवस लग्न लांबणीवर टाकण्यास तुझीं कांहीं कारणं असतील. तीं समजल्यावांचून तीं वाजवी आहेत कीं गैरवाजवी आहेत, हें कसं सांगतां येअील ? परंतु माहीत नसलेल्या कारणांचा विचार करीत बसण्यापेक्षां तूं कालावधि न करितां लग्न कां करून घ्यावंस याबद्दलचे माझे विचार मी आज तुला कळविणार आहें. त्यांवर विचार करून उत्तर लिही.

तुझ्या वयाचा विचार केला तर, याच वेळीं विवाहित होणं तुला श्रेयस्कर होअील. पुढल्या महिन्यांत तुला सव्वीसावं वर्ष संपून सत्ताविसावं लागेल. लग्न झाल्यानंतर साधारणपणें दोन वर्षांत तुला पितृपद येअील. तुझं पहिलं मूल, मुलगाच असेल असं गृहीत धरल्यास पन्नाशी उलटून सेवानिवृत्तीच्या काळापर्यंत हा मुलगा पंचवीस वर्षांचा झालेला असेल. म्हणजे, तुझं घर चालविण्यास समर्थ असा तुझा प्रतिनिधि निर्माण होअील. त्याच्या आधारावर सेवानिवृत्तींतला तुझा काळ बिनकाळजीचा म्हणजे सुखावह होअील. पन्नाशी

उलटल्यावर शरीर व मनहि दुर्बल होतं. आणि संसाराच्या खस्ता खाण्याची माणसाची धमक कमी होते. अशा वेळीं, जीं आपल्या पायांवर उभीं राहूं शकत नाहींत, अशा मुलांच्या अवश्य त्या गरजा भागवितांना तो जिकीरीस येतो. पण त्याच वेळीं त्याचा भार आपल्या शिरावर घेणारा, निदान त्याचा भार हलका करणारा, सत्तेचा सहाय्यकर्ता असल्यावर त्याला आपलं उतार-वय भीतिप्रद वाटत नाहीं.

तूं आपला विवाह आणखी कांहीं दिवस पुढं ढकललास आणि त्याप्रमाणं तिशी उलटल्यावर लग्न केलंस, आणि समज, पस्तीस वर्षांपर्यंत तुला मुलगा झाला नाहीं तर काय होईल याचा वर सांगितलेल्या दृष्टीनं तूं विचार कर. याचं एक चांगलं उदाहरण तुला लक्षांत घेण्यासारखं आहे. आपल्या शेजारीं दाबके पोस्टमास्तर रहात होते, ते तुला माहीत आहेत. चार महिन्यांपूर्वी ते सेवानिवृत्त झाले किंवा त्यांना करण्यांत आलं. आणखी कांहीं वर्षं नोकरीवर ठेवण्याबद्दल त्यांनीं शक्य ती खटपट केली, पण यश आलं नाहीं. नोकरी करण्याचा जोम त्यांच्या अंगीं आहे, म्हणून त्यांना ही मुदतवाढ पाहिजे होती असं नाहीं, तर पेन्शनीच्या सत्तर रुपयांवर प्रपंचाचा पसारा आवरण्यांतले कष्ट त्यांना भेडसावीत होते, म्हणूनच नोकरीस चिकटून रहाण्याचा ते प्रयत्न करीत होते. प्रॉव्हिडंट फंड, विमा वगैरेबद्दल त्यांना दोन तीन हजार रुपये मिळाले ते प्रथम कुटुंबाच्या दोन मुलींच्या लग्नकार्यांत झालेल्या कर्जापायीं गडप झाले. दाबक्यांच्या द्वितीय कुटुंबाचा मोठा मुलगा आतां कुठं बारा वर्षांचा होतो आहे आणि त्याच्या पाठचीं चार भावंडं आहेतच. या परिस्थितींत दाबके मास्तर बावरून गेले असल्यास नवल नाहीं. त्यांना कर्ता मुलगा असता तर त्यांची अशी अवस्था झाली नसती. विवाहाचा विचार, विद्यमान जीवन आनंदमय होईल या दृष्टीनं तर केलाच पाहिजे, पण भविष्यकाळाकडं त्यावेळीं डोळेझांक करणं इष्ट नाहीं. आम्हां

म्हाताऱ्यांच्या डोळ्याला अधूपणा येत असला तरी, दूरचा भविष्यकाळ त्यांना तरुणापेक्षां अधिक स्पष्ट दिसतो आणि आपणांस जें दिसतं तें मुलांना दाखविणं त्यांना कर्तव्य वाटतं म्हणून हें लिहिलं आहे. या दृष्टीनं विचार करून काय करावं तें लिही. इकडील सर्व ठीक, क्षेम असो हा आशीर्वाद.

*तुझा*
दादा

*चिरंजि बापूला वैनिच आशिर्वाद.* ४

मि तुला पत्र लिहीतें त्याला च्यार दिवस लागले. यात च्चुक झाल्या आसतील पण तु हासु नकोस. तु लगीन कधी करणार म्हणून तूला विचारण झाल होत. इतकात नको अस तुझ उत्तर आल ते माला वचुन दाखिवल. तूला लगन नको ते का हे मातर लक्शात येत नाहि. तुझ आता लवकर लगिन हाव आस माला वाटतय. तु म्हणशिल वैनिला सुनमुक बघयची घाइ झालीय. पण तस बरिक नाहि. ते आज नाइतर उद्या दिसेल. पण माला तुझ्याबद्दल काळजि वाटती. कालीजात तुमची तुमचि चेवणाची सोय होंति तेवा काळजि नवती. पण आतां चाकरि करायचि अन खाणावळिच जेवण तुला कस मनवत असेल आस वाटत. आणि म्हणें तुला कामावरन यायला एकेक दिवस दोन तीन दिखिल वाजतात. त्य वेळि कुठल आलय खाणावळित जेवण चाकरिच्या माणसाला घरच जेवण हव बाबा. त्यासाठीं घरात बायको हावी. आणिक एक मनात येत शहरगावाची मुल बीघडतात.

परवा चीमाकाकुनी त्यंच्या चूलत चूलत भावाच्या म्हेवणीची गोष्ट सांगितली. ती म्हणे चांगलि चांगलि मूल नादाला लावती. आणीक शवटि तोंडघशी पाडती. तिच्या पायात एका श्रीमंताच्या मुलग्यान पत्रतिपासल्या तळ्यांत जिव दिला आस चिमाकाकु म्हत होत्या. आसल्या गोष्टी आइकल्या कि माझ्या मनात नाइनाइ ते यायला लगत. लगीन झालल्या मुलांची अशी काळजी वाटायची नाहीं, शहरांतल्या मुली आणीक मुलगे छिचोरपणान वागतात आणीक कुणाला कोण्या वेळीं कशी बुधी हुइल याच नेम नाइ आस म्हणाल्या चीमाकाकु. खोट कशाला सांगू त्यांच ते भारूड आइकताना माला एकसारखी तूझी आठवण होत होती. आमच्यात माग कधी आसल झल नाइ आणि तूझ्याविशी माला खातरी आहे. पण आपल काहींबाइ मनात येत. तुझ एगदा लगीन झाल मंजे सगळ्या कुशंका पळून जातील. सौ. बयाताइच्या मनोहरच लगीन ठरलय, तो तुला पुण्याला भेटत असेलच. माला एक लहानशी विळी हावीय. तुळशबागेत मिळती आस फाटकीणबाइ म्हत होता. तसली विळी घेऊन कुणाबरबर तरी धाडून दे.

*तुझी*

**सौ. वइनि.**

ती. दादांना नमस्कार वि. वि. ५

आपलं पत्र पोंचलं माझी प्रकृति उत्तम आहे. काळजी नसावी. यापुढं दर रविवारीं मीं आपणांस खुशालीचं पत्र लिहिण्याचं ठरविलं आहे. हा माझा निश्चय मी शक्य तों पाळीन. मात्र एकादा रविवार, मागील संवयीमुळें चुकला तर आपण राग मानूं नये अशी मी आधींच विनंति करून ठेवतों.

आम्हां मुलांना दूरचं दिसत नाहीं हें खरेंच आहे. आपण पत्रांत लिहिलेल्या गोष्टी माझ्या लक्षांत आल्या नव्हत्या आणि आल्याहि नसत्या. त्या गोष्टी विचारांत घेण्यासारख्या असतील, परंतु मीं आज त्यांत लक्ष घालावं हें मला कसंसंच वाटतं. उतारवयाचा विचार मी बळेंबळें करूं लागलों तेव्हां मी दांतपडका, मंद दृष्टीचा, काठीचा आधार घेऊन चालणारा एक दीन-दुबळा माणूस आहे असं माझंच चित्र मला दिसूं लागलं आणि तें मी ताबडतोब पुसून टाकलं. मी आतां दिसतों तसाच दिसत रहावा असं मला

वाटतं. सांगायचं तात्पर्य असं कीं, आम्हां मुलांना दूरचं दिसत नाहीं आणि कोणीं दाखविलं तर बघवतहि नाहीं. समीपचं जें कांहीं असेल तेंच पहाण्याची आणि त्यांत रमण्याची आम्हांस संवय झालेली असते.

त्या दृष्टीनं माझी समीपची स्थिति काय आहे, ती मी पाहूं लागलों म्हणजे मीं मागं आपणांस कळविलेला विचार योग्यच आहे, असं मला वाटूं लागतं. कसं तें आपणांस सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहें.

मला सध्यां दरमहा साठ रुपये मिळतात. त्याचा खर्च ठोकळमानानं पुढीलप्रमाणं होतो. सब्ध्या माणसास आवश्यक अशीच जागा मीं घेतली आहे व तीहि थोडा वशिला लावून ! त्यामुळं भाडं फक्त दहा रुपयेच द्यावं लागतं. दूध, चहा, कॉफीचा खर्च किमान पांच रुपये होतो. खानावळीचा दर पंधरा रुपये असला तरी, पोळी, तुपाची विशेष सोय करून घेतल्यामुळं मला दोन रुपये अधिक पडतात. सरासरी काढली तर दरमहाचा कापडखर्च पांच रुपये होईल. केर, दुधाचीं भांडीं आणि रोजचे कपडे धुणं यासाठीं तीन रुपये द्यावे लागतात आणि न्हावी, परीट, तेल, साबण असा किरकोळ खर्च चार पांच रुपये होतो. व्यायामशाळेची वर्गणी दोन रुपये आणि हार्मोनियम क्लासची फी पांच रुपये पडते. वर्तमानपत्रांची आणि मासिकांची वर्गणी अधूनमधून असतेच. या सर्व बाबींचा हिशेब केला तर माझी प्राप्ति मला एकट्यालाच बेतासबात होते. एक स्नेही विमा एजंट आहेत. विमा उतरण्याबद्दल त्यांनीं पिच्छा पुरविला आहे. आणि निरुपाय होऊन मी " होय " म्हणून गेलों आहे. आतां फक्त पॉलिसी घ्यायची ती हजाराची कीं दोन हजारांची, एवढंच ठरायचं आहे. एजंटमित्रांनीं आपलं म्हणणं खरं करून दोन हजारांची पॉलिसी माझ्या माथीं मारली, तर दरमहा कमींत कमी सात रुपये हप्त्यासाठीं वेगळे काढून ठेवण्यावांचून गत्यंतर नाहीं. हें सर्व झाल्यावर माझ्यापाशीं काय उरलं ?

मीं हें सर्व एवढयासाठींच सांगितलं कीं प्रपंच थाटण्याइतकं पैशाचं बळ अद्यापि माझ्या अंगीं आलं नाहीं; आणि तसं बळ नसतांना मीं ती जोखीम शिरावर घ्यायची, हें मला भीतिप्रद वाटतं. माझी ही भीति अगदींच अकारण नाहीं अशी आपलीहि खात्री होईल.

हेंच पत्रीं ती. सौ. वैनीला नमस्कार. तिला सांगा, चिमाकाकू म्हणतात तसल्या गोष्टी माझ्या बाबतीत तरी घडणार नाहींत. चिमाकाकूंनीं श्रीमंतांच्या मुलांच्या गोष्टी वैनीला सांगितल्या आणि मी श्रीमंत मुलगा नाहीं हें तिला माहीतच आहे. मग भ्यायचं काय कारण ? तिनं सांगितल्याप्रमाणं चिमुकली विळी तुळशीबागेंतून विकत आणायचं काम, मी माझी धुणंभांडीं करणाऱ्या म्हाताऱ्या रखमाला सांगितलं आहे. तिनं आणून दिल्यावर कोणाबरोबर तरी पाठवून देईन. आपल्या घरीं भाजीची एक व कांद्याची एक अशा दोन विळ्या आहेत; मग छोट्या विळीची गरज वैनीस कां भासूं लागली हें माझ्या लक्षांत येत नाहीं. बयामावशीचा मनोहर भेटला होता व आपल्या लग्नास मीं आलंच पाहिजे असं बजावून गेला आहे. ‘ रजा मिळाली तर येतों ’ असं त्याला सांगितलं आहे पण फार करून रजा मिळणार नाहीं. अलीकडं अधिकारी रजेच्या कामीं फार खलखळ करतात म्हणून विचारणंच नको असं वाटतं. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

आपला

**बापू**

तुझं पत्र वाचून आनंद वाटला. प्रपंचांत ज्या एका दृष्टीची आवश्यकता असते, पण पुष्कळशा प्रापंचिकांना ती असत नाहीं, ती हिशेबी दृष्टि प्रपंचास प्रारंभ करण्यापूर्वींहि तुझ्या ठिकाणीं निर्माण झाली आहे, ही खरोखर मोठ्या कौतुकाची गोष्ट आहे असं मी समजतों. आदा पाहून गरजा वाढवायच्या हें धोरण नसल्यामुळं पुष्कळांचे प्रपंच ओढाताणीचे, म्हणूनच कष्टप्रद होतात. आपल्या पलीकडं ते खंडेराव लाटे रहातात, त्यांच्या एकेक गोष्टी तूंहि ऐकल्या आहेस. गृहस्थ हुषार आहे, आणि त्याच्या इतर व्यवसायबंधूंकडं पाहिलं तर, खंडेरावाची प्राप्ति चांगली आहे. तेवढ्या प्राप्तींत त्यांच्या संसाराचा गाडा नीटनेटकेपणानं खचित हांकतां येईल; पण त्यांचं धोरण प्राप्तीप्रमाणं खर्च करायचा हें नसून, गरज लागली कीं खर्च करायचा; मग तो आपल्या प्राप्तींत बसो, कीं न बसो! खर्च करितांना उधारीचा किंवा उसनवारीचा अवलंब करावा लागला, तरी ते खंत करायचे नाहींत. त्यांनीं

आपल्या राहणीचं मान, आपल्या तोलाच्या प्रापंचिकासारखं ठेवलेलं नसून, ज्या बड्या लोकांत आपणास जावं यावं लागतं, त्यांच्या तोडीचं ठेवलं आहे. त्यामुळं "आदा फडणीसाचा आणि थाट दिवाणांचा" अशी तऱ्हा होते. याचे परिणाम व्हायचे तेच होतात. लोकांचीं देणीं वाढत जातात, त्यांची फेड होऊं शकत नाहीं आणि अखेर फिर्यादीअर्यादी होऊन एका काळचे गळ्यांत गळा घालणारे स्नेही एकमेकांचा गळा कापायला उठलेले दिसतात. खंडेराव लाड्यांचे इतर गुण वाखाणण्यासारखे आहेत. मध्यरात्रीं हांक मारली तरी शेजाऱ्याच्या सहाय्याला धांवून जाण्याची तत्परता खंडेरावा-इतकी दुसऱ्याच्या ठिकाणीं क्वचित्‌च आढळेल. पण त्यांच्या या चांगुलपणा-वर, त्यांच्या या बेहिशेबी कारभारामुळं पाणी पडतं! मला तर असं वाटतं कीं, विद्यालयांनीं नुसतं कारकुनी शिक्षण देण्याऐवजीं प्रापंचिक जबाबदाऱ्यांचं शिक्षण अवश्य दिलं पाहिजे. सरकारचं अंदाजपत्रक कसं तयार करावं, जमाखर्चाचा मेळ कसा घालावा, हें कारकुनाला शिकवितात, पण आपल्या घरच्या कारभाराचं तसं बजेट तयार करून त्याप्रमाणं कांटेकोरपणानं कसं चालावं, हें शिक्षण कुठं दिलं जात असेल, असं वाटत नाहीं.

माझं हें हिशेब–पुराण तुला अनाठायीं झाल्यासारखं वाटेल. पण म्हाताऱ्या माणसांना दुसऱ्यास कांहीं सांगायची संधि मिळाली कीं, लोकांस काय वाटेल याचा विचार न करितां, तीं आपलीं मतं सांगून मोकळीं होतात. आमच्या जातीची ही खोड माझ्यांत तरी कशी नसेल?

पण हें हिशेबपुराण तुझ्या पत्रामुळं सांगावं लागलं, ही गोष्ट तूं लक्षांत ठेवली पाहिजेस. 'जें काम करायचं, तें हिशेबी दृष्टीनं' हें तुझं धोरण योग्यच आहे, पण तुझ्या विवाहास व्यत्यय आणणारा तुझा हिशेब बरोबर आहे कीं चुकीचा आहे हेंहि पाहिलं पाहिजे, नाहीं कां? आपण करतों तो प्रत्येक हिशेब बरोबरच, असा अहंकार कोणी बाळगूं नये व तूंहि बाळगणार नाहींस.

तुझा हिशेब आंकड्यांच्या बेरीज–वजाबाकीपुरता बरोबर असला तरी तो व्यवहारतः चुकीचा आहे, हें तुला दाखवावं म्हणून मी हें पत्र लिहीत आहे.

तुझा मासिक खर्च पन्नास रुपये असल्याचं तूं लिहिलं आहेस, व तो आवश्यक असाच आहे. तूं लिहिल्यापैकीं अमुक एक बाब गैरवाजवी व अनवश्यक आहे असं मी तरी म्हणणार नाहीं. तूं ज्या दृष्टीनं विचार करितोस, त्याच दृष्टीनं विचार केल्यास, तुझ्या कुटुंबांतील दर माणसागणिक चाळीस रुपये दरमहा मिळाल्यावांचून तुमचं भागणार नाहीं. चाळीस रुपयांची मासिक हुंडी तुझ्या हातांत ठेवावी आणि मग तुझ्या घरांत पाऊल टाकायचा प्रयत्न करावा असा याचा अर्थ होतो. हा हिशेब अधिक बारकाईनं केल्यास, एक दिवसाच्या मुक्कामास आलेल्या पाहुण्याचा दीड रुपया, तुला मिळावयास पाहिजे, व शिष्टाचारादाखल पाहूण्याकडं तूं तो मागितला नाहींस तरी स्वतः एक दिवस उपास करून तुला ती तूट भरून काढली पाहिजे. तूं दिलेला हिशेब मान्य केला तर तुझी प्राप्ति कमींत कमी दरमहा ऐंशी रुपये होईपर्यंत तुझ्या लग्नाचा प्रश्न कोणीं काढतां नये, म्हणजे आणखी चार वर्षं तरी ही गोष्ट लांबणीवर टाकली पाहिजे. पुढचा विचार तुला करावयाचा नाहीं म्हणून गेल्या पत्रीं लिहिलेला विचार मी फिरून लिहीत नाहीं, पण मला ती गोष्ट विचारार्ह वाटते हें मात्र खरं !

चार वर्षांनीं नवरा–बायकोचा निर्वाह होऊं शकेल, इतकी प्राप्ति तुला होऊं शकेल, पण त्यावेळीं तो प्रश्न सुटला तरी तो कायमचा सुटला असं होईल काय ? दर चारदोन वर्षांनीं, खाणाऱ्या एकेका तोंडाची भरती तुझ्या घरीं होत राहील आणि त्या वाढीबरोबर तुझ्या प्राप्तींत अवश्य ती वाढ होत राहील असं नाहीं ! मग हें गणित कसं सोडवायचं !

याचं उत्तर मला एकच देतां येतील; तें म्हणजे, इतर सांसारिक, ज्या रीतीनं हा प्रश्न सोडवितात, तसाच आपणहि सोडविला पाहिजे. तूं काम

करितोस त्याच संस्थेंतील दुसरी मंडळी काय करतात? पाउणशें-शंभर प्राप्तीची मंडळी पांचसात माणसांचा प्रपंच नेटकेपणानं करीत असलेली तुला आढळतील; आणि त्या त्यांच्या प्रपंचांत दैन्य आणि दुर्भिक्ष्य दिसेल, असंहि नाहीं. तुला प्रत्यक्ष उदाहरण पहायचं असेल तर आमचंच पहा! आम्हीं आज ज्या राहणीनं राहतों, ती आमची पहिल्यापासूनची राहणी आहे, हें तुला माहीतच आहे. माझा पगार पन्नासापासून शंभर रुपयांपर्यंत असतांना ती. आई, आम्हीं दोघें, वैनी, चि. तात्या व तुम्ही पांच भावंडं एवढा माझा प्रपंच होता. तुझ्या हिशेबानं पाहूं गेल्यास मला किमान दोनशें तरी पगार असायलाच हवा होता. पण मिळाल्या पगारांतच आम्हीं आमचं गाडं पुढं ढकललं. तुम्हां मुलांसाठीं मी कांहीं माया करून ठेवली नाहीं हें खरं, तरी तुमच्या वांट्यास कोणाचं दिडकीचंहि देणं नाहीं. तुझ्या बहिणींचीं लग्नं आणि तुमचं शिक्षणहि, या माझ्या मर्यादित मिळकतीं-तूनच झालेलं आहे. मी एखाद्या सरकारी कचेरींत कारकून किंवा हपीसर असतों तर अवांतर प्राप्तीच्या जोरावर मीं हा कारभार केला असा लोकांनीं तर्क बांधला असता. पण माझ्या बाबतींत ती शंका घ्यायलाहि जागा नाहीं. यावरून एकच अनुमान बांधतां येण्यासारखं आहे, आणि तें हें कीं, कुटुंब-नायकाची प्राप्ति आणि कुटुंबांतलीं माणसं याचं गणित अगदीं त्रैराशिक पद्धतीनं सोडवायचं नसतं! एकट्याचा जितका खर्च होतो, तितकाच दुसऱ्याचा होत नाहीं; व दोघांत तिसरा सुखानं बसूं शकतो. तूं आज एकट्यासाठीं दहा रुपये घरभाडं देतोस. उद्यां दोघं झाल्यावर तुला फार तर पंधरा द्यावे लागतील व त्या पंधरा रुपयांच्या जागेंत तिसऱ्याचा आणि चौथ्याचाहि समावेश होऊं शकेल. गडीमोलकरणीचा खर्च माणसांच्या प्रमाणांत वाढत नाहीं. फार काय, दोघांच्या भातांत तिसऱ्याचंहि पोट भरूं शकतं. तूं हिशोब करतोस तो अंदाजावर आणि मी हिशेब सांगतों आहे तो

प्रत्यक्ष अनुभवांवर सांगतों आहें ! अंदाजावर विश्वास ठेवायचा कीं अनुभवावर ठेवायचा, हें तूंच ठरव !

प्रापंचिकांस पैशाचा प्रश्न महत्त्वाचा आहेच आहे. आणि तो समाधानकारक सुटेल तरच, कोणतंहि पाऊल टाकायचं म्हटलं तर, पाऊल टाकणं अशक्य होईल. म्हणून आहे हेंच सामर्थ्य विचारांत घेऊन ' श्रीमन्महा ' करावं लागतं ! प्रारंभ केल्यावर, आहे त्यांत गुजराण कशी करायची हें कळूं लागतं ! सहा उतारूंनीं बसावयाच्या डब्यांत सात आणि आठ माणसं आलीं तरी खपतात आणि तेवढ्यानं प्रवास क्लेशकारक होतो असंहि नाहीं. आपल्या प्रपंचाचा विचार तूं आपलीच मिळकत जमेस धरून करतोस, हें तुझं स्वावलंबनाचं धोरण, मलाच काय पण कोणासहि कौतुकास्पद वाटावं, असं आहे. पण वडिलांचं थोडं फार सहाय्य सुरवातीसच लागलं तर घेऊंच नये, असं कां आहे ? कीं, तुझे वडील तुझी गरज भागवणार नाहींत, असं तुला वाटतं ? तसं वाटत असलं तर मात्र नाइलाज आहे.

चि. मनोहराच्या लग्नास तूं फार करून जाणार नाहींस असं दिसतं. सौ. जाणार म्हणते आणि गेलंहि पाहिजे ! मी रोखीनं अहेर करावा म्हणतों, पण तिला तें मान्य होईलसं दिसत नाहीं. सौ. बायाक्कास लुगडं आणि मनोहरला चांदीची अत्तरदाणी देण्याचा तिचा बेत आहे. अशा वस्तू त्यांना अनेकांकडून मिळतील, व त्यांचा उपयोग सणावारींच झाला तर व्हायचा. रुपये हवे तेव्हां उपयोगी पडतात. आणि लग्न करायला निघालेल्या माणसास त्याचीच खरी गरज असते. पण उपयोगापेक्षां डामडौल आणि रीतीरिवाज पहाण्याचीच आम्हांस संवय जडलेली आहे. त्यामुळं शहाणपणाची कल्पनाहि वेडगळपणाची ठरायची भीति असते.

इकडील सर्व ठीक. प्रकृतीस जपून असावें; हे आशीर्वाद.

तुझा
**दादा.**

## ७

*ती. दादांना नमस्कार वि. वि.*

आपलें पत्र येऊन बरेच दिवस झाले. आज उद्यां करतांना त्याचं उत्तर लिह्यायचं राह्यलंच; आणि खरं सांगायचं म्हणजे आपला मुद्दा आपण इतका समर्पक मांडला होता कीं त्यावर काय लिह्यायचं हेंच माझ्या लक्षांत येईना. पत्रांतील शेवटचा मजकूर लिहितांना–माझ्या स्वावलंबी बाण्याचं कौतुक करतांना—आपलं मन थोडं तरी संतप्त झालेलं असावं, अशी मला शंका आली. त्या बाबतींत मात्र ताबडतोब खुलासा करणार होतों, पण मध्यंतरीं मनोहरच्या लग्नास नाहीं नाहीं म्हणतां गेलों आणि पत्र लांबणीवर टाकलं, तें आज लिहीत आहे.

आपलीहि मदत न घेतां मी स्वतःच्या हिंमतीवर माझं सर्व कांहीं निभावून नेईन अशी घमेंड मला थोडीसुद्धां नाहीं; आणि ती मला कधींच शिवणार नाहीं. मी आज जो असा जगांत उभा राहिलों आहें, ती माझीच कर्तबगारी असं का मी म्हणूं ? माझ्या तोंडांतून असे शब्द स्वप्नांत सुद्धां

निघणार नाहींत. आपण आणि वैनीनं आपल्या रक्ताचं पाणी शिंपून हीं रोपं जतन केलीं आहेत. लहानपणीं कळत नव्हतं आणि मनांत येईल ती गोष्ट व्हायला पाहिजे, असा मी हट्ट धरीत होतों. आपला हट्ट पुरा करितांना दादांना किती कष्ट पडतील याचा विचारहि आमच्या डोक्यांत यायचा नाहीं. आमच्या त्या वेळच्या खुळेपणाच्या अेकेक गोष्टी आठवल्या म्हणजे, माझी मलाच चीड येते आणि आपल्याच थोबाडींत मारून घ्याव्या असं मला वाटतं. हायस्कूलमध्यें असतांना एम्. सी. सी. ची मॅच पहायला मी मुंबईला गेलों तेव्हां आपण रात्रीं नकार दिला व उजाडतांच पंधरा रुपये माझ्या हातावर ठेवले. जुन्या शर्ट धोतरांवर स्वतः दोन महिने काढलेत. वैनीनंहि धुणीं भांडीं दोन महिने घरीं केलीं; आपल्या अवश्यक गरजांचा विचार न करतां, मुलाचं मन न मारण्याचं व्रत आपण उभयतांनीं आचरलंत. सौ. ताईनं लग्नाआधीं कुड्यांची इच्छा प्रदर्शित करतांच वैनीनं बिलवर काढून दिले. आपलं दूध बंद करून आपण चि. आप्पास स्काउटचा सूट करून दिला आणि सईमाईनां जरीचीं पातळं हवींत म्हणून मामांनीं दिलेल्या बनारसी पातळाचे धडपे फाडायला वैनी डगमगली नाहीं. आम्हां मुलांसाठीं आपण केलेले कष्ट पाहून, उतारवयांतहि आम्ही तुम्हांला स्वस्थपणा लाभूं देऊं नये ही गोष्ट मला तरी क्रूरपणाची वाटते. आतांपर्यंत आम्हीं आपणांला थोडं कां पिळून काढलं ? यापुढं आपल्यावर शक्य तों भार घालायचा नाहीं असं खरोखरीच मला वाटतं. पण तें स्वतःच्या कर्तबगारीविषयीं फाजील घमेंड आहे म्हणून नव्हे, तर तसं करणं कृतघ्नपणाचं ठरेल, अशी मला भीति वाटते म्हणून ? माझ्याविषयीं आपणांस कसला संशय आलाच असेल तर, तो या खुलाशानं दूर होईल ना ? आणि आतांपर्यंत ज्या निर्मल वत्सलतेनं आपण मजकडे पहात आलां, त्याच निर्मल वत्सलतेनं सदैव पहात रहाल ना !

मनोहरच्या लग्नास मी गेलों नसतों तर बरं झालं असतं, असं मला वाटूं लागलं आहे. आपल्या समाजांत घडून येत असलेले हे विवाह, आणि ते साजरे करण्याची आपली पद्धत पाहिली कीं, त्यांपासून चार पावलं दूर राहिलेलंच बरं, असं मला तरी वाटूं लागलं आहे. मनोहर आणि त्याची पत्नी यांचेकडे नुसतं पाहून सुद्धां समजून येणार आहे कीं, दोघं एकमेकांस साजेशीं नाहींत. मनोहरसारख्या देखण्या आणि रंगेल वृत्तीच्या तरुणास निर्विवादपणें कुरूप असलेल्या मुलीस संमति द्यावी लागली; त्याला कारण त्याचा अडाणीपणा खचित नव्हे, तर वडिलांच्या मर्जीविरुद्ध जाण्याइतका तो खंबीरमनाचा नाहीं आणि या दुबळेपणाचं प्रायश्चित्त जन्मभर त्याला भोगत रहावं लागणार ! मुलाच्या सुखापेक्षां हुंड्याला अधिक मान वडिलांनीं द्यावा आणि ती. बयामावशींनींहि सुनेपेक्षां करणी मानपानच प्रथम पहावा, याचं मला नवल वाटलं आणि वाईटहि वाटलं ती. सौ. वैनीकडून आपणांस सर्व हकीकत कळली असेलच. वरपक्ष, वधूपक्षाचा या सुधारणा युगांतहि किती प्रकारें छळवाद करूं शकतो, हेंहि मनोहरच्या लग्नांत मला पहायला मिळालं. वरपक्षाचा मस्तवालपणा पाहून आणि वधूपक्षाची लाचारी पाहून मला एकसारखी चीड येत होती.

माझी प्रकृति ठीक आहे, हें सौ. वैनीनं सांगितलं असेलच ! तिनं दिलेला डबा आतां अर्धा उरला. उद्यां मित्रमंडळी जमतील आणि तो पुरता रिकामा करतील. श्रुत होय ही विज्ञापना.

*आपला,*

**बापू.**

परवांच्या तुझ्या पत्रानं मला इतका आनंद वाटला कीं तितका आनंद उभ्या आयुष्यांत दोनचारदां तरी मिळाला असेल कीं नाहीं, याची शंकाच आहे. मुलांना आईबापांविषयीं आदर वाटतो, त्यांच्यावर ते भक्तीहि करितात, पण त्यांचे उपकार मानून त्यांची परतफेड करण्याची जाणीव तुझ्यासारख्या एखाद्याच मुलांत आढळते. आईबापांनीं आपणास जन्म दिला, तो आपल्यावर उपकार नसून त्यांच्या स्वतःच्या वासनापूर्तीचा तो स्वाभाविक परिणाम आहे, त्याबद्दल त्यांचं आम्ही कांहींहि देणं लागत नाहीं, असं बरळणारीं पुत्ररत्नं माझ्या पहाण्यांत आहेत. "आईबापांनीं आपल्या खस्ता खाल्ल्या, त्या आपल्यावरील प्रेमामुळं नसून जगांत आपलं हसं होईल या भीतीनं खाल्ल्या," किंवा "आम्ही काय सांगायला गेलों होतों त्यांना कीं, आम्हांला जन्माला घाला आणि आमच्यावर ममता करा म्हणून? आईबापांनीं आपली हौस पुरवून घेतली, यांत आमच्यावर कसले आले

आहेत उपकार ?" अशी कृतघ्न वृत्ति कित्येक शिकलेल्या मुलांमधेंहि पाहून मन कष्टी होतं! भाग्य आमचं म्हणून तुझ्यासारखा मुलगा आम्हांला लाभला आहे. देव तुला उदंड आयुष्य देवो आणि अखंड सुखी करो!

प्रत्येक माणसाला या ना त्या प्रकारे कष्ट करावे लागतात. त्यांतले कांहीं सक्तीचे असतात, कांहीं हौसेचे असतात. पोटाला पाहिजे म्हणून नोकरी करावी लागते, व नोकरी म्हणजे कष्टाचीच. हे कष्ट सक्तीचे म्हणतां येतील. पण मित्रानं मित्रासाठीं आणि आईबापांनीं मुलांसाठीं केलेली दगदग, हा हौसेचा विषय असतो. सक्तीच्या कष्टाइतका हौसेच्या दगदगींत शीण येत नाहीं. मुळींच येत नाहीं, असं मात्र नव्हे. पण कष्ट कशाहि प्रकारचे असोत, ज्यांच्यासाठीं ते केले, त्यांना ते रुचले म्हणजेच त्यांचं सार्थक होतं. जीव तोडून केलेली चाकरी, मालकाला समाधानकारक वाटली आणि आप्तस्वकीयांसाठीं घेतलेल्या परिश्रमानुळें ते सुखी झाले, म्हणजे सारा शीणभागोटा दूर होतो. केलेल्या कामाबद्दल शाबासकी किंवा धन्यवाद मिळाल्यावर तर विचारायलाच नको! थकलेल्या शरीरावर आणि शिणलेल्या मनावर ती अमृताची वृष्टीच!

आमच्यावर आपल्या पत्रांतून तूं ही अमृताची वृष्टि केलीस. तुझं पत्र वाचून दाखवितांना मी आणि ऐकतांना ती, दोघंहि रडलों. किती आनंददायक रडं होतं तें बापू! तुला इतक्यांत कळायचं नाहीं. पत्र वाचून झाल्यावर पदरानं डोळे टिपून ती उठली आणि मीठमोहऱ्या घेऊन, पुण्याकडं तोंड करून तिनं दृष्ट काढली. 'माझी मेलीचीच दृष्ट होईल माझ्या बापूरायाला' असं म्हणून तिनं मीठमोहऱ्या चुलींत टाकल्या.

पण तुला खरं सांगूं का, तुमच्यासाठीं आम्हांला कांहींच करूं द्यायचं नाहीं ही शिक्षा तुम्हीं मुलांनीं आम्हांला देऊं नये. आम्हीं कांहीं न करितां आम्हांला आराम वाटावा ही तुमची इच्छा, तुझ्या दृष्टीनं योग्य

असली तरी आमच्या दृष्टीनं सुखाची नाहीं. मुलांसाठीं, त्यांच्याहि मुलांसाठीं, कांहींतरी करीत राहणं, हाच एक आनंदाचा विषय वृद्धांना उरलेला असतो. बोलून चालून थकलेलीं घोडीं तीं ! दौड करतों करतों म्हटलं तरी कितीशी करणार ? म्हाताऱ्यांच्या अंगीं मोठीं ओझीं उचलण्याइतकी ताकत थोडीच असायची आहे ? पण ओझीं नाहीं उचललीं, तरी मुलांसुनांच्या आणि लेकी-जावयांच्या संसारावर बसल्या बसल्या पहारा तरी करतां येतोच कीं त्यांना. तो मात्र मुलांनीं बिनतक्रार करूं दिला पाहिजे. आम्हांला फुलांसारखं संभाळण्याची तुझी इच्छा, आम्ही पुरेपूर पुरवूं, पण आम्हांला अगदींच हातपाय न हलवूं देण्याचा तुझा जुलूम आम्हांला फार तापदायक होईल.

आज तुझी शक्ति मर्यादित आहे. आणि त्यामुळं नवा प्रपंच थाटल्यास उणीवा राहतील. या उणीवा भरून काढण्याचा बोजा आमच्यावर टाकणं तुला अवघड वाटतं. यांत दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. तुझ्या उणीवा भरून काढणं, हा आमच्यावर खरोखर बोजा आहे काय ? आणि तो बोजा असला तरी उचलतांना आम्हांस कष्ट होतील काय ? यांतल्या शेवटच्या प्रश्नाचं उत्तर मीं वर दिलंच आहे. मुलांच्या संसाराचा गाडा जुंपतांना थोडी दमचक्की झाली तरी तिचा वडिलांना हर्षच वाटत असतो. पहिल्या प्रश्नाचं उत्तर असं कीं, त्यांना तो बोजा वाटत नाही. आपल्याच आयुष्यांतलं तें उरलेलं काम आहे, आणि तें आपण पुरं करायचं अशी त्यांची समजूत असते. त्यांना ही म्हातारपणीं वांट्यास आलेली सक्तमजुरी असं कधींच वाटत नाहीं. उलट आपल्या जीवनांतला हा शेवटचा गोड घांस, असं वाटत असतं ! आपल्या संसाराच्या मंगलाचरणाच्या वेळीं आम्हीं आपल्या वडिलांकडून किती तरी सहाय्य घेतलं ! त्याची फेड आपल्या मुलांच्या द्वारें करायची, आणि आज तुम्ही आमची थोडी मदत घेतली तर,

उद्यां तुमच्या चिरंजीव मंडळींना मदत करून तिची परतफेड करायची हें रहाटगाडगं अखंडपणं फिरत राहील, राहिलंहि पाहिजे.

मागील पत्रांत आम्हांविषयीं तुला वाटणारा जिव्हाळा व्यक्त करण्याच्या भरांत, विवाहाचा मुख्य प्रश्न अजिबात बाजूस पडला आहे, हें तुझ्या नसलं तरी, माझ्या लक्षांत आल्यावांचून राहिलं नाहीं! आतां तुझ्या मनांतील बाऊ नाहींसा झाला असेल असं वाटतं. तुझ्या मनांतील बहुतेक शंकांचं निराकरण मीं माझ्याकडून तरी केलं आहे. आणखी कांहीं विचारायचं असल्यास संकोच न करितां विचार.

मनोहरच्या लग्नाचा प्रकार ऐकून मला वाईट वाटल्यावांचून राहिलं नाहीं. तुझ्या लग्नांत असं कांहीं होईल ही धास्ती नको. इतरांस धडा घ्यावा असं नमुनेदार कार्य करून दाखवावं अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. विवाहानं दोन कुळं एकत्र येतात; व त्यांच्यामध्यें अभंग स्नेहभाव नांदत राहील, असंच वर्तन उभयपक्षीं व्हायला पाहिजे. पण आमच्या लोकांत होतो प्रकार तो सर्वस्वीं विपरीत! स्नेही निर्माण होण्याऐवजीं दावेदार मात्र तयार होतात. आम्हांला अजून पुष्कळच शिकायचं आहे. डोळे उघडतील तेव्हां खरं!

प्रकृतीस संभाळून असावं. पत्रोत्तर सत्वर यावं. मुलींच्या पालकांकडून तगादे यायला लागलेत. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

तुझा

दादा

## अनेक आशीर्वाद

## १

भाऊबीजेस तूं चि. सौ. ताईकडं गेला होतास हें तिच्या पत्रावरून कळलं! ओंवाळणीची देणगी रोखीनं देण्याऐवजीं तूं तिला चांदीची पेला-बशी दिलीस, याबद्दल तिनं आपला आनंद व्यक्त केला आहे. पण या देणगीपेक्षांहि तिला अधिक आनंद झाला आहे तो दुसऱ्याच गोष्टीबद्दल. ती गोष्ट तिनं आम्हांस कळविली आहे. सौ. ताईनं तुझ्या लग्नाची गोष्ट काढली असतां 'दादावैनी कांहींहि करू देत, माझी हरकत नाहीं' असं उत्तर तूं दिल्याचं तिनं लिहिलं असून आतां आम्हीं लगबग केली पाहिजे असंहि बजावलं आहे. तुझं हें उत्तर मध्यस्थांमार्फत असलं तरी मी तें खरं धरून चालतों. मात्र तुझ्या उत्तराविषयी मला थोडा खुलासा विचारावासा वाटतो. आम्हीं कांहींहि ठरवलं तरी त्याप्रमाणं तूं मुकाट्यानं चालणार, म्हणजे आमची हौस पुरवण्यासाठीं तूं लग्नाला उभा रहाणार, असाच तुझ्या संमतीचा अर्थ घ्यावयाचा काय? तसा तुझा अभिप्राय असेल तर या

बाबतींत अधिक लक्ष घालण्यास मला उत्साह वाटणार नाहीं. तुझ्या विवाहांत दुसऱ्याची हौस पुरविण्यापेक्षां, स्वतःची हौस पुरवून घेण्याचा हुरूप तुला वाटला, तरच त्यांत स्वारस्य आहे. तुझं लग्न करण्याची आम्हां उभयतांना हौस खचित आहे. परंतु तुझ्या इच्छेविरुद्ध आमची हौस पुरवून घेण्याचा उपद्व्याप, आम्ही कधींहि करणार नाहीं. या कामीं तुझे मार्गदर्शक व सहाय्यकर्ते एवढीच आमची भूमिका आहे व तेवढीच ती राहील. लग्न केव्हां करून घ्यायचं व कोणाशीं करायचं या गोष्टींत तुला संपूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यावर आम्ही थोडंहि दडपण आणणार नाहीं. कारण, तसं केल्यास तो जुलमाचा रामराम होण्याचा संभव असतो. आणि त्याचा परिणाम बिचाऱ्या निरपराधी मुलीला भोंवण्याची भीतीहि असते. स्वतःच्या पूर्ण पसंतीनं निवडलेली जोडीदारीण, असं वाटण्याऐवजीं लोकांनीं गळ्यांत बांधलेली घोरपड, असा ग्रह होऊन बसणंहि शक्य आहे. म्हणून म्हणतों, आमच्या हौसेसाठीं तूं आपलं मन मारूं नको ! तूं सत्वर विवाहबद्ध कां व्हावंस या बाबतींतील माझे विचार तुला पटल्यामुळं असो, किंवा तारुण्य-सहज प्रेरणेमुळं असो, लग्न करून घेण्याची इच्छा तुझ्या मनांत जागृत झाली तरच तूं रुकार द्यावास म्हणजे पुढच्या गोष्टी मी पाहीन. इकडील सर्व ठीक आहे. उत्तरास विलंब होऊं नये; हे आशीर्वाद.

तुझा
**दादा**

आनेक आशीर्वाद. १०

काल तूल लिहिलेल पत्र माला वचून दाखल पर ते माला आवडल नाही. तें पाठऊ नवे आस दिखिल म्हटल मी मूल मोठ्ठी झाली तरी आगदि पष्ट कस सांगतील. आडून आडून बोलनार. त्यान कस का हुअिना होय म्हटलं ना झाल तर मग. आतां बघा मुलगी नि जमऊन टाका आस मी म्हणाले. तर माझ आअिकण हुअीना. हे जल्माचे प्रष्ण आह्त. त्यात गूळमुळीतपणा नको नि गअिर समज नको आस म्हनताना मी जराशी चीडलेच आणिक विच्यारल सावकाराला कूळ कागद लिहुन आटी लिहुन देतात तसा कागद का लीहुन मागायचा तुझ्याकडुन मग काय बोलण झाल नाहिं. मला वाटल पत्र टाकायचा बत रहीत झला पर तें टाकल आस सध्याकाळी सांगीतलीनी. म्नुणून मी रात्रि वसुन हें पत्र लीहीलं. तूला आस लिल म्हणुन काहीं वाटुन घेउ नको. बारीक बारक गोशटींत दिखील घोळ घालीत बसायची सवय तूला ठाउकच आहे. तेवा तू हव आहे तस होय म्हणुन लीहुन टाक. उषीर करू

नकोस. परवाच्या दिवशि सांगलीची एक मूलगि दाखवयाला आणलीनी. आगोदर कळीवल सुधा नाऔं. आस करतात बाबा माणसँ. मुलगि बरी आहे दीसायला मनहरच्या लगनांत नवरीच्या पाठराखणी आली होती बघ एक गोरी मूलगि तिच्यागत दीसली थोडिशि. आणि सभावही गरीब आसावा आस वाटत. चिरंजीव सो. ताअिन दिखिल तीच्या गांवच्या एका मास्तरांच्या मूलीबद्दल लिहीलय. आणीकही मूली सांगुन आल्या आहेत. मागरेसरांत नाइ तरी माहीत लगीन राहुं नवे. तुझी वयनी.

*ती. सौ. वैनीस बापूचे नमस्कार.* ११

ती. दादांचं व तुझं पत्र पोंचलं. दोन्हीं पत्रांचा मला आनंद वाटला. दादांचं पत्र तुला आवडलं नाहीं पण मला आवडलं. त्यांच्या पत्रांत मला नेहमीं कांहीं तरी नवं सांपडतं, आणि त्यासाठीं मीं त्यांच्या पत्राची उत्सुकतेनं वाट पहात असतों.

सौ. ताओीनं तुम्हांला कळविलेली बातमी खोटी नाहीं. मी तिच्यापाशीं जें बोललों तें मनापासूनच बोललों होतों. अधिक काय लिहूं ?

मी रहातों त्याच्या शेजारच्याच बंगल्यांत काळे नांवाचे एक गृहस्थ राहतात. एका विमाकंपनीच्या आफिसांत ते हेड् क्लार्क आहेत. माझ्या एका मित्रामार्फत त्यांनीं आपल्या मुलीचा फोटो मजकडे पाठविला असून तोच मी या पत्रासोबत तुमच्या अवलोकनासाठीं पाठवीत आहे. ही मुलगी मीं पाहिलेली आहे. तुमच्या पसंतीस ती उतरली तर मी ती नाकारणार नाहीं. तुम्हीं पाहिलेली सांगलीची मुलगी मनोरमावैनींच्या पाठराखणी आलेल्या

मुलीसारखी दिसते, असं तूं लिहिलंस. पण ती मुलगी तरी मीं कुठं पाहिली होती ! लग्नघरीं जमलेल्या मुली आणि मुलगे एकमेकांना बघून घेण्यांत गर्क असतात, असं पुष्कळांना वाटतं. तसं पहात असतील, पण त्यांत जोडी-दार निवडायची दृष्टि कितपत असेल, याची वानवाच. निदान मी तरी त्या दृष्टीनं आतांपर्यंत कोणत्याच मुलीचं निरीक्षण केलं नव्हतं.

माझी प्रकृति ठीक आहे. ती. दादांना माझे नमस्कार. त्यांच्या पत्रास मी आतां वेगळं उत्तर लिहीत नाहीं.

तुझा
**बापू.**

घरीं आलेलं तुझं पत्र वाचून समाधान वाटलं! आणि मीं वधूसंशो-धनाचं काम जोरानं सुरू केलं. आतांपर्यंत सांगून आलेल्या मुलींपैकीं, ज्यांच्या घराण्याशीं आपला ऋणानुबंध जुळला तर बरं होईल, असं मला वाटलं, अशा सात आठ मुलींचं निरीक्षण मी करून आलों आहे. यासाठीं धारवाडपासून साताऱ्यापर्यंत मला चक्कर मारून यावं लागलं! "मुलगी दाखवायला आणा" असं मीं म्हटलं असतं तर त्यांनीं आणलीहि असती, पण मला ही पद्धत पसंत नाहीं. आमच्या वेळीं अजाण मुलींचीं लग्नं होत. त्यावेळीं त्यांना दाखवायला नेण्यांत कांहीं वाईट वाटत नसे; उलट पर-गांवचा प्रवास करायला मिळतो याचा त्यांना आनंदच वाटे. परंतु आतां शिकलेल्या व प्रौढ मुलींना आपलं असं फिरतं प्रदर्शन होणं अपमानास्पद वाटतं आणि अशा प्रदर्शनांत नापाशीचा छाप बसला कीं, त्यांना अमर्याद मनस्ताप होतो. चि. सौ. ताईचं लग्न जमवितांना मला मुलींची ही मनः-

स्थिति अजमावतां आली व तेव्हांच मीं मनाशीं ठरवलं कीं आपली सून निवडतांना शक्य तों लोकांच्या मुलींना आपण त्रास द्यायचा नाहीं. म्हणूनच सांगून आलेल्या मुलींच्या माहितीवरून योग्यायोग्य ठरवून सहा मुली आम्हीं निवडल्या आणि त्यांचं त्यांच्याच घरीं जाऊन निरीक्षण केलं. पहाण्यासाठीं आम्ही येत आहों, याची चाहूल पालकांना व त्यांच्या मुलींना आम्हीं लागूं दिली नाहीं. अशी पूर्वसूचना असली कीं, पालक मुलींना सजवितात, आणि त्या सजावटीखालीं मुलीचं स्वाभाविक सौंदर्य झांकलं जातं. शिवाय अनोळखी माणसं आपली पाहणी करणार या कल्पनेनं मुली बावरतात, त्यामुळं एखादी देखणी मुलगीहि वेंधळी दिसते. अगदीं नेहमींच्या राहणींत मुलगी दिसते तशीच तिला पहायचा आमचा उद्देश बराच सफळ झाला. पूर्वयोजना ठरवून आम्ही ज्या मुली पहायला गेलों, त्यांशिवाय आणखी चारपांच मुलीहि आम्हांला पहायला मिळाल्या !

आम्हीं पाहिलेल्या मुलींपैकीं कांहीं मुली आम्हांसच पसंत पडल्या नाहींत. आमच्या दोघांची दृष्टी त्या कामीं वेगवेगळी होती हेंहि तुला सांगितलं पाहिजे. मी मुलीचं रूप, प्रकृतिमान आणि शिक्षण यांकडे विशेष लक्ष देत होतों, तर तिची दृष्टि मुलीच्या वडिलांची परिस्थिति, त्यांच्या घरचं वळण आणि मुलीची वागणूक यांवर असे. एक मुलगी माझ्या दृष्टीनं मला बरी वाटली, परंतु तिला तिच्या घरचं वळण आणि मुलीचा छिचोरपणा आवडला नाहीं. तिच्या पसंतीस उतरलेली एक मुलगी मींहि नापास केली. मला ती प्रकृतीनं सुदृढ वाटली नाहीं आणि तिच्या आईच्या आणि बहिणींच्या प्रकृतींत दम्यासारखे कांहीं दोष असल्याचंहि मीं ऐकलं. समजून उमजून हा तकलुपी दागिना कशाला पत्करायचा ? या विचारानं मीं नकार दिला.

आमच्या दोघांच्याहि दृष्टीनं बऱ्या वाटणाऱ्या चार मुलींचे फोटो सोबत

पाठविले आहेत. प्रत्येकावर मीं अंक लिहिले आहेत आणि त्यांची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणं आहेः—

( १ ) मुलीचं वय १९ संपून २० लागलं आहे ! मॅट्रिक झाली आहे. तुझ्याहून काळी ठरणार नाहीं. फोटोंत दिसला नाहीं तरी, एक दांत बाहेर थोडासा दिसतो. मर्यादशील दिसली. आईच्या रजेंत घर आवरते, असं तिच्या वडिलांनीं सांगितलं आहे. हीच सर्वांत वडील मुलगी. पाठच्या दोघी बहिणी आणि दोघे भाऊ आहेत. वडील हायस्कुलांत शिक्षक आहेत. बेताची प्राप्ति असून घरांत दैन्य दिसत नाहीं. टापटीप आणि नीटनीटके-पणा दिसला. माणसं अगत्यवान असावींत असं वाटतं.

( २ ) अठरावं वर्ष आहे. पण त्या मानानं चांगलीच ठसठशीत दिसते. व्हृ. फा. पास होऊन मग इंग्रजी शिकूं लागल्यामुळं आतां पांचवींत आहे. हिचे वडील एका सावकाराचे दिवाणजी आहेत, त्यामुळें घरीं, पगार बेताचा असला तरी ददात दिसली नाहीं. वडील थोडेसे अहंमन्य वाटतात, पण मुलीची आई नम्र आणि मनमिळावू आहे, असा घरचा अभिप्राय आहे. मुलीला चार भाऊ असून एक दोन वर्षांची बहीणहि आहे. ही मुलगी आईच्या वळणावर आहे असें मला सांगण्यांत येत आहे. हे गृहस्थ देशस्थ आहेत, पण आपल्याकडं मुलगी द्यायला तयार आहेत.

( ३ ) वय एकोणीस. गोरीपान आहे. शिक्षण मराठी पांच व इंग्रजी चार यत्ता. थोडी रोड दिसते. हिला वडील नाहींत. आई आहे. वडीलांचे विमा प्रॉव्हिडंट फंडाचे तीनचार हजार रुपये आले ते व्याजीं लावले आहेत व शें दीडशें रुपयांचं उत्पन्न आहे. त्यांवर त्या मायलेकी व एक चौदा पंधरा वर्षांचा मुलगा, अशा तिघांना निर्वाह करावा लागतो. एकंदरींत गरीबीच, आणि मुलीचं अपुरं शिक्षण व रोडपणा त्या गरीबीचाच परिणाम असावा.

सुख लागलं तर मुलगी चांगली होईल असं घरचं मत आहे. गृहकृत्त्यांचा चांगला सराव आहे.

( ४ ) वय एकवीस; लालसर गोरी; नाक थोडं आंखूड; डोळे पाणीदार, निरोगी. एकंदरींत बरी दिसते. मॅट्रिक नापास झाल्यामुळं शाळा सुटली, पण शिवण व भरतकामांत चांगलं प्रावीण्य मिळवलं आहे. स्थानिक प्रदर्शनांत त्याबद्दल मिळालेलीं प्रशस्तीपत्रं आम्हांला दाखविण्यांत आलीं. पेटी व दिलरुबा बरा वाजवितां येतो असं सांगण्यांत आलं. वडील वकील आहेत. घरीं थोडी श्रीमंती राहणी असावी. मुलीला सख्खी आई नाहीं. सावत्र आईच्या मुलीची आबाळ होते, याचं प्रत्यंतर या मुलीकडं पाहून येतं.

या चौघींपैकीं तुला अवश्य वाटेल तेवढ्या मुलींचं प्रत्यक्ष निरीक्षण तूं करावंस व आपली निवड निश्चित करावीस असं माझं मत आहे. तूं पुण्याहून पाठविलेला फोटो मीं पाहिला. तीहि मुलगी दिसायला वाईट नाहीं. पसंतीसाठीं आम्हीं निवडलेल्या मुलींत तिचाहि अंतर्भाव करायचा असेल तर आमची हरकत नाहीं. तिच्या स्वरूपाबद्दल आमचं मत सांगितलंच आहे. तिची बाकीची माहिती तूं कळविली नाहींस. त्यामुळं इतर दृष्टीनं आमचं मत कळवितां आलं नाहीं. आम्हां दोघांची दृष्टि आतां तुला कळलेलीच आहे. त्या दृष्टीनं ती योग्य आहे कीं नाहीं हें तुझं तूं पहा.

मुलींची पाहणी त्यांच्या घरीं जाऊन तूं करावीस असं माझं मत आहे. चार दिवसांची रजा मिळव; सुट्टीस जोडून मिळाली तर उत्तमच.

आतां चालढकल न करितां झटपट कार्य उरकून घेणं श्रेयस्कर. इकडील सर्व ठीक. हे आशिर्वाद.

*तुझा*
दादा.

*सा. न. वि. वि.* १३

चिरंजीव बापूरावाचं पत्र आलं. त्यावरून असं दिसतं कीं आपल्या कन्येस स्नुषा म्हणून माझ्या घरीं बोलावण्याइतका मी भाग्यवान नाहीं. तिला अनुरूप वराची प्राप्ति लौकर होवो असं इच्छितों. त्या कामीं माझं कांहीं सहाय्य पाहिजे असल्यास आपण संकोच न करितां लिहावं. मला करतां येणं शक्य असेल तर मी तें आनंदानं करीन. या निमित्तानं झालेल्या परिचयाचं स्नेहांत रूपांतर झालं तर ती आनंदाची गोष्ट नाहीं का ?

लोभ असावा ही विज्ञापना.

*आपला*

दादा

चि. बापूराव आणि आपली कन्या चि. सुमनाताई यांनीं परस्परांचं निरीक्षण केलं आहे. आतां त्यांनीं आपली एकमेकांविषयींची पसंती-नापसंती कळविण्यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत. चि. बापूरावापुरतं सांगायचं तर चि. सुमनताई त्यांच्या पसंतीस उतरली आहे. आपण चि. सुमनताईस तिची पसंती–नापसंती विचारावी आणि तिनं बापूरावाशीं विवाहबद्ध होण्यास स्वखुषीनं मान्यता दिली तर कळवावं. ' स्वखुषीनं ' असं मी मुद्दाम लिहीत आहें. धडधाकट, मिळवता मुलगा मिळाला कीं लग्न जमवून टाकायला मुलीचीं वडील माणसं सिद्ध होतात आणि मुलींना देखील आपली इच्छा-अनिच्छा बोलून दाखवायचा धीर होत नाहीं. म्हणून असो, किंवा दाखवण्या-पायीं निघत असलेली आपली धिंड थांबेल व आपल्यापायीं वडिलांना होणारी यातायात संपेल या बुद्धीनं असो, आपली आवड–नावड विसरून वडील करतील त्यास त्या मूकसंमति देतात. हा एक प्रकारचा जुलमाचा रामराम

असतो; आणि आतां मुलं जाणतीं झाल्यावर तसा प्रकार होऊं देणं बरं नाहीं असं मला वाटतं; म्हणून आपल्यास विनंति करितों कीं, आपण चि. सुमनताईचं बापुरावांबद्दलचं खरंखुरं मत समजून घ्यावं, तिच्या स्वतःच्या अशा आवडीनावडी असतील त्या विचारांत घ्याव्या, आणि साधकबाधक विचार करून, तिनं बापूरावाच्या हातीं हात द्यायचा कीं नाहीं हें ठरवावं. आपण तिचं कांहीं चुकत असेल तर तेवढंच सांगावं. तिला विनाकारण भीड घालूं नये. धाक दाखवण्याचं किंवा त्रागा करण्याचं तर नांवच नको.

ज्या घरांत आपल्या मुलीनं जन्म काढायचा तेथली परिस्थिति आपणांस आणि तिलाहि, मान्यता देण्यापूर्वी पूर्णपणें माहीत असणं मला अवश्य वाटतं. म्हणून ती मी पुढं देत आहे. एका खेडेवजा शहरांत आमचं घर आहे. तिथं आम्ही रहायला जाण्याचा संभव फारसा नाहीं. त्याचप्रमाणं आहे असं सांगण्यापुरतं जमिनीचं उत्पन्न आहे. खेड्यावर जाऊन वसुलाची खटपट केलीच तर वर्षाकांठीं शेंदीडशें रुपये येतील. मी स्वतः या गोष्टींत फारसं लक्ष घालीत नसल्यामुळं एकाद्या वर्षी शेंपाऊणशें रुपये येतात, तर एकाद्या वर्षी कांहीं येतहि नाहीं. थोडक्यांत सांगायचं म्हणजे आम्ही हातावर पोट भरणारीं माणसं आहों. माझी प्राप्ति आणि प्रपंच यांचा मेळ जेमतेम बसला आहे. त्यामुळं माझ्यापाशीं कांहीं माया नाहीं असंच समजून चाललं पाहिजे. मात्र मला एक पैचंहि देणं नाहीं.

चि. बापूराव इंटरपर्यंत शिकला आहे. बरीशी नोकरी मिळाल्यामुळं पदवीचा नाद सोडून दोन वर्षांपूर्वीच त्यानं ती पत्करली. सध्यां त्याला दरमहा पासष्ट रुपये पगार मिळतो व तो दीडशेंपर्यंत वाढत जाईल. त्यानं अधिक कर्तबगारी दाखविली आणि जादा बढती मिळाली तर गोष्ट वेगळी; पण दीडशेंचा टप्पा तो गांठीलच. आपल्या मुलीस त्याच्या घरांत जाडंभरडं अन्नवस्त्र भरपूर मिळेल, पण हौसामौजा करण्याची शक्यता मात्र बेताचीच.

ज्याच्या हातीं हात घालून आयुष्याची वाट चालायची त्या जोडीदाराच्या स्वभावाबद्दलहि माहिती असणं अवश्य आहे. चि. बापूराव प्रकृतीनं निकोप आहे, तसा स्वभावानंहि उमदा आहे. दुसऱ्यास लागेल असं वागणं बोलणं त्याच्या हातून सहसा व्हायचं नाहीं. आपणांस थोडा त्रास झाला तरी तो पत्करील, पण आपल्या पायीं दुसऱ्यास त्रास होऊं देणार नाहीं. आहे त्यांत त्याला आनंदी राहतां येतं ! मात्र तो थोडा भावनाप्रधानहि आहे. आपल्या परिवारांतल्या माणसांपैकीं कुणी गैरवर्तन केलं तर तो मनांतून संतापतो. आपला संताप तो बोलून दाखवीत नाहीं पण त्याच्या मनांत होत असलेला ताप दिसून आल्यावांचून रहात नाहीं. रहाणी थोडीफार अस्ताव्यस्तच आहे. आपले कपडे आणि चीजवस्त तो कोठें कशी टाकील याचा नेम नाहीं; आणि पुनः ती सांपडेनाशी झाली म्हणजे त्याच्या धायकुत्या सुरू होतील. त्याला व्यसन कसलंहि नसेल असं वाटतं ! यापूर्वी तो चहाकॉफीहि घेत नसे. अलीकडं नोकरी धरल्यापासून तो ती प्रसंगविशेषीं घेतो असं ऐकतों. जेवणाच्या बाबतींत मात्र तो थोडा तब्बेतखोर आहे म्हणजे त्याला नित्य नवे खमंग मसालेदार पदार्थ लागतात असं नाहीं; उलट त्याला कांहींच लागत नाहीं असं म्हणणं बरोबर होईल. भात, वरण, पोळी, तुरीच्या डाळीची आमटी आणि ताकदहीं यांपेक्षां अन्य पदार्थ त्याला नकोत. त्याला गाण्याबजावण्याची गोडी आहे, पण नाटक सिनेमा पहाण्याचा षोक नाहीं. वाचन ही एक करमणूक त्याला पुरते.

ही सर्व माहिती विचारांत घेऊन त्याला सुखी ठेवणं आणि स्वतःहि सुखी होणं चि. सुमनताईस जमेल का, याचा आपण दोघांनींहि विचार करावा, आणि हा संबंध उभयपक्षीं सुखदायक होईल असं आपणांस वाटत असेल तर या विवाहास आपण अनुमति द्यावी. कोणत्याहि कारणामुळं चि. बापूरावाचं पत्नीपद चि. सुमनताईस अनिष्ट वाटत असेल तर, आपण

निःसंकोचपणें नकार द्यावा. आपल्या नकारामुळं मला अपमान झाल्यासारखं वाटणार नाहीं. कांहीं मुलगे वधूपसंतीच्या कामीं जो चोखंदळपणा ठेवतात व जें स्वातंत्र्य उपभोगतात, तेंच मुलींना उपभोगतां आलं पाहिजे असं माझं मत आहे.

आपलं उत्तर उलट टपालानं द्यावं असं मी म्हणत नाहीं. कारण, या प्रश्नावर शांतपणें विचार व्हायला पाहिजे, आणि त्याला चार दिवस अवधी लागणारच. म्हणून मी आठवडाभर वाट पहायला तयार आहें. पण पंधरा दिवसांत आपलं कांहींच उत्तर नाहीं आलं तर आपणांस ही गोष्ट कर्तव्य नाहीं असं समजून चालेन. लोभ असावा ही विनंति.

*आपला*

दादा

## चि. दादाराव यांस अनेक आशीर्वाद. १५

जनूभाऊ गोरे यांनीं तुमचं पत्र मला दाखवलं. त्यांचा आणि माझा परिचय आणि माझा तुमचेशीं असलेला आप्तपणा त्यांना माहीत म्हणूनच तें पत्र त्यांनीं मला दाखवलं. स्पष्टपणा तुम्हांला आवडत असला तरी तो सर्व ठिकाणीं प्रशस्त वाटत नाहीं. मला तरी तुमचा हा स्पष्टवक्तेपणा चमत्कारिक वाटला. मुलाला मुलगी आवडली हें कळवून तुम्हीं मोकळे झाला असतां तरी पुरें होतं. जनूभाऊंनीं तुम्हांला मुलगी दाखविली त्याअर्थीं तुमच्या मुलाचं स्थळ त्यांना पसंत होतं म्हणूनच दाखविली असं समजायला काय हरकत होती ? मुलीचे पालक आशेला आलेले असतात आणि कुणीकडून लग्न जमलं म्हणजे झालं असं त्यांना वाटत असलं, तरी वाटेल त्या खाईंत तिला लोटण्याइतके ते निष्ठुर बनलेले नसतात. स्थळ कळलं कीं, त्याची ठोकळ मानानं माहिती घेऊन मगच ते पुढील उद्योगाला लागतात. तुमची माहिती जनूभाऊंनीं माझ्याकडूनच विचारून घेतली होती; आणि ती बरी वाटली म्हणूनच त्यांनीं

तुम्हां बापलेकांना सुमनला दाखविली. आपल्या निर्धनपणाचा पाडा आपण होऊन वाचीत कशाला सुटतां ? आणि आपल्या मुलाच्या खोडीचं लोकांपुढं प्रदर्शन कशाला करितां ? जगांत निर्दोष असा माणूस अजून जन्माला यायचा आहे. चि. बापूरावच्या अंगीं कांहीं गुण, तर कांहीं दोष असतील; सुमनच्याहि अंगीं असतील. लगीनगांठीनं नवरानवरी एकत्र बांधल्यावर तीं आपोआपच जमवून घ्यायला लागतात. तुमच्या लग्नाच्या वेळीं कोणी असा घोळ घातला होता कां ? आणि तुम्हीं व तुमची बायको दोघं काय अगदीं निर्दोष आहांत, आणि दोघांच्या आवडीनिवडी काय एकच आहेत ? पण असं असून सुद्धां, अगदीं दृष्ट लागण्याइतक्या खेळीमेळीनं नि गोडी गुलाबीनं नांदतांच कीं नाहीं ? नवराबायको झाल्यावर देवाण घेवाण सुरू होते. आपोआप येते ती अक्कल. आधींपासूनच चिकित्सा करण्याची गरज नसते. तुम्हांला स्पष्ट लिहिणं आवडतं म्हणून मीहि स्पष्ट लिहिलं. तुम्हीं रागावणार नाहींच. जनूभाऊंना आणि सुमनलाहि बापूराव पसंत आहेत. देणंघेणं आणि तिथिनिश्चय ठरविण्यासाठीं या, असं त्यांच्याच सांगण्यावरून लिहिलं आहे. त्यांच्या वेगळ्या पत्राची आतां जरुरी नाहीं. चि. सौ. वैनीबाईस आशीर्वाद.

काका.

*ती. काकांचे सेवेसीं दादाचे कृतानेक साष्टांग नमस्कार.* १६

आपलं पत्र पोचलं. "स्वभावाला औषध नाहीं" एवढंच मी त्याचं उत्तर देतों. आतां पुढील कार्याबद्दल.

येत्या दोन तारखेपासून लग्नाचे मुहूर्त सुरू होतात. चि. बापूरावाच्या सोयीच्या दृष्टीनं रविवार ता. ७ चा मुहूर्त धरणेचं मीं योजिलं आहे. तो जनूभाऊ व सुमनताई यांना गैरसोयीचा नसेल तर तोच निश्चित करावा. गैरसोयीचा असेल तर तारेनं कळवावं.

ता. ७ चा मुहूर्त निश्चित झाला असं समजून मी माझा कार्यक्रम कळवितों. मी, सौभाग्यवती व चि. बापूराव असे त्रिवर्ग रविवारीं सकाळीं साडेआठ वाजतां पोंचणाऱ्या गाडीनं तिथं येऊं व धर्मनिर्णय मंडळाच्या विवाहविधीप्रमाणं कार्य दीडदोन तासांत उरकून घेऊं. जनूभाऊंची हरकत नसेल तर आम्हीं त्यांच्याकडेच उतरूं. आम्हीं दुसऱ्याकडं उतरलं पाहिजे असं त्यांचं म्हणणं असेल तर आपणांकडं उतरूं. विवाह सशास्त्र, कायदेशीर

ठरण्यासाठीं जेवढे विधी करणं अवश्य, तेवढेच करायचे. रजिस्टर पद्धतीनं विवाह लावण्याची माझी इच्छा घरीं पसंत पडली नाहीं; आणि जनूभाऊंनाहि ती मानवणार नाहीं असं मला सांगण्यांत आलं. विवाह–समारंभापायीं वेळ आणि पैसा यांची मनस्वी उधळपट्टी होते. आतां या दोन्ही गोष्टी दुर्मिळ झाल्या आहेत. निदान मला तरी त्या जपून खर्च करायच्या आहेत म्हणून मीं हा मार्ग पत्करला आहे. सर्व विवाहविधि व भोजन उरकून आम्हीं रविवारीं संध्याकाळीं सव्वापांच वाजतां तेथून निघणाऱ्या गाडीनं परत निघूं.

श्रीयुत जनूभाऊंना, मुलीस घेऊन इकडं येणं अधिक सोयीचं होईल असं मला वाटतं. तसे ते आले तर माझी हरकत नाहीं. उलट मला आनंद वाटेल. पण ही गोष्ट मी त्यांच्या इच्छेवर सोंपवितों. मात्र विवाहविधि करावयाचा तो मीं वर लिहिल्याप्रमाणं अगदीं सुटसुटीतपणं, वेळ व खर्च यांची मुळींसुद्धां नासाडी न करतां करावयाचा. मिरवणुका, जेवणावळी, या गोष्टींना या कार्यांत मुळींच जागा नाहीं. याविषयीं माझे विचार अगदीं निश्चित असून मी ते बदलणार नाहीं. श्रीयुत जनूभाऊंना सर्व गोष्टी कळवून त्यांची अनुमति कळविण्यास विनंति आहे. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

*आपला*

दादा.

प्रेमादरपूर्वक नमस्कार. १७

*रविवार तारीख ७ रोजी आम्हीं उभयतांनी परस्परांचा पति-पत्नि म्हणून विधि-मान्य पद्धतीनं स्वीकार केला आहे. गृहस्थाश्रमांत पदार्पण करितांना आपले शुभाशीर्वाद आम्हांला असावे ही आमची मागणी आपण पूर्ण कराल ना ?*

*आपले*

**बापूराव**

**सौ. सुमन**

---

चिरंजीवांच्या या मागणीस मान्यता द्यावी व लोभाची वृद्धि व्हावी ही विज्ञापना.

**दादा**

**सौ. वैनीबाई**

नं. १८ चं दिनकरमामांचं पत्र मोडींत आहे आणि त्यांची जुन्या वळणाची भाषा जशी आहे तशीच ठेवली आहे. वृद्ध माणसांच्या मनाचा प्रेमळ-पणा व निर्भीडपणा यांचा गोड मिलाफ या पत्रांत पाहायला मिळतो.

श्रीसद्गुरु प्रसन्न.

*चिरंजीव विजयी भव.*

*राजेश्री दादाराव यांसी*

*प्रति दिनकरमामा मुक्काम जुनागांव*

*अनेक आशीर्वाद उपरी* १८

येथील श्रीकृपेंकरून क्षेम असो विशेष.

तुमचे चि. बापूचें लग्न जालेचें छापील कार्ड आलें तें पावलें. कार्य जालेनंतर तरी कलविणें जालें हें विशेषच मानिलें पाहिजे. कारण नव्या जमान्यांत कार्डाचा खर्चेही फालतु ठरावयाचा. लग्नकार्याचीं निमंत्रणें घरच्या वडील माणसानें आप्तपरिवारांस प्रथम धाडावयाची वाडवडिलीं घालून दिलेली रीत मोडणेंत सुधारणा कोणेप्रकारची होते हें आम्हां अशिक्षितांच्या बुद्धीस कलणें कठिणच. पूर्वापार वहिवाट गैर म्हणावी तर तेंही मनास पटत नाहीं. कार्यप्रसंगीं आप्तेष्ट जमले तर अनायासें गांठीभेटी होतात आणि सहजगत्या रिणानुबंद ताजा होतो. परंतु आतांच्या सुधारणेस आप्तेष्टांच्या एकत्र येणेची

आणि रिणानुबंदाची गरज वाटत नसावी. तुमचे घरच्या कार्यास आलों असतों तर तुमची भेट जाली असती आणि फारां दिवसांत तुमच्या मुलांमुलींना पाहिलें नाहीं तें पाहिलें असतें. तुमच्या सुनबाइ कस्या आहेत तेंही दिसलें असतें आणि तुम्हीं आतां पत्रानें मागतां तो आसिरवाद नवरानवरीच्या तोंडीं साखर घालून दिला असता. आमच्या चि. सौ. काशीच्या लगनास तुम्ही आला नाहीं आणि आतां आमचेंही येणें तुमचेकडे होऊं नये एणेंकरून तुमचे मनांत आमचे विशी अगत्य ओसरलेचें भय वाटतें. आम्हांस तुमचे सारखीं आप्तसंबंदी माणसें बहुत नाहींत आणि जीं थोडी आहेत तींच आम्हांस असे प्रकारें दूरदूर करूं लागलीं तर मनास खेद जालेशिवाय कसा राहील ? असो तुमची मर्जी.

तुमची सुनबाई आपलेमधीलच असलेली पाहून समाधान वाटलें. देशस्थ कराड्याची मुलगी करणेसही तुम्ही तयार असलेचें मागें बोललां होतां. पण तें केलें नाहीं हें ठीक केलें. अलीकडे कोणास कसी विपरीत बुद्धि होईल याचा नेम नाहीसा जाला आहे. तुमचेविशीं भीति वाटत होती ती दूर जाली ही श्रीची कृपा.

हेंच पत्रीं चि. सौ. सूनबाईस आशिर्वाद. त्या आतां सासूबाई जाल्या. परक्याच्या लेकीसी संबंद जपून करणेविशीं त्यांना सांगितलें पाहिजे असें नाहीं. ती. आकाची आठवण ठेवून ती सूनबाईसी जसी वागली तसेंच सुनबाईनीं आपले सुनबाईसी वागणें. सुनेस ढीगभर केलेलें दिसत नाहीं पण कणभर चुकलेल्याचा बोभाटा होतो. लोकांत चांगलें म्हणवून घेणें असेल तर सासूनें सुनेची सून होऊन राहिलें पाहिजे. घरांतून असें मुद्दाम सांगणें जालेवरून लिहिलें आहे. चि. बापूरावास आणि त्याच्या सौ. सुमनबाईस अनेक उत्तम आसिरवाद. लोभ असो दीजे हे आसिरवाद.

**दिनकरमामा.**

वँडिलांचे सेवेसीं. १९

आपलं कृपापत्र पोंचलं. चि. बापूरावाच्या विवाहाचं निमंत्रण आपणांस अगाऊ दिलं असतं आणि आपण व ती. सौ. मामी कार्यास आलां असतां तर आपल्या भेटीचा आनंद आम्हां सर्वांना खचित झाला असता. पण विवाहांतील समारंभ कमी करून विवाहाचे धर्मविधीच तेवढे करावयाचे असं मीं योजिलं असल्यामुळं आप्तस्वकीयांस निमंत्रणपत्रिका न पाठवितां विवाह झाल्याची निवेदनपत्रिका पाठविली. यांत पूर्वापार चालीरीती-विषयीं अनादराची बुद्धि नसून आज कशा प्रकारें वागणं सोयीचं आहे तेवढंच मीं पाहिलं.

कार्याच्या प्रसंगानं आप्तेष्ट एकत्र येतात आणि त्यामुळं पोटामागं लागून पांगलेल्या मंडळींचं संमेलन भरतं हा फायदा पहिल्या पद्धतींत आहे. पूर्वीच्या दिवसांत भाऊबंद आणि स्नेहीसोबती दहापांच कोसांच्या आंत-बाहेर असत आणि चार दिवस एकत्र राहून आपुलकीच्या गांठी घट्ट करीत.

पण आतां प्रवास पहिल्याप्रमाणं दुर्घट राहिला नाहीं. त्यांत वेळहि मोडत नाहीं. मुंबईसारख्या दोनशें कोसांवरला माणूस बारा तासांच्या आंत इथं येऊं शकतो. पुष्कळदां केवळ गमतीखातरहि येतो. त्यामुळं आप्तेष्टांच्या गांठीभेटी, ज्या पूर्वी लग्नकार्याच्या निमित्तानंच व्हायच्या, त्या आतां गमतीनं आणि वरचेवर होऊं शकतात. त्यासाठीं लग्नकार्याच्या निमित्ताची वाट पहात कोणी बसत नाहीं.

त्यांतूनहि अलीकडे आपल्या पांढरपेशा वर्गांत लग्नसमारंभांना जें स्वरूप आलेलं आहे, त्याचा विचार केल्यास त्यांत संमेलनांतील मौज अनुभवणं जवळजवळ अशक्यप्रायच होतं. चि. सौ. ताईच्या लग्नास आपण आलां होतां आणि आमची दुसरीहि बरीच नातलगमंडळी जमली होती. पण या मंडळींना घटकाभर एकत्र बसून स्वस्थपणें गप्पागोष्टी करायला मिळाल्या नाहींत. वरपक्षाची तब्बेत संभळण्यांत आणि कार्याची सामुग्री जमविण्यांत मी गुंतलेला. मिरवणुकी आणि जेवणावळीच्या उसाभरींत बाकीची मंडळी अडकलेली ! विहिणींचीं रुसणीं फुगणीं संभाळण्यांत आणि आंबोण रुखवतांत बायका मंडळींना घटकेची फुरसत नाहीं. पाहुणे आले आणि गेले. सर्व मिळून आपण घटकाभर तरी मौजेनं बोलत बसलों काय ? आपल्या लग्न-समारंभांत वेळेची आणि पैशाचीहि नासाडी होते आणि दगदगीला तर सुमारच रहात नाहीं याचं मला मनस्वी जाईट वाटतं. प्रत्येकासच असं वाटत असलं पाहिजे, पण वहिवाटीबाहेर गेल्यास लोक नांवं ठेवतील या भयानं, मागील अंकांवरून पुढें चालू असा प्रकार होत राहतो. आपली सोय ज्यांत आहे, तेंच करायचं अशी हिंमत कुणी करीत नाहीं. लग्नांत वरपक्ष हा मुख्या-धिकारी असतो व त्याच्या तंत्रानं चालणं वधूपक्षास भाग पडतं. म्हणून मजकडे वरपक्षाचा अधिकार आल्यावर मी ही गोष्ट प्रत्यक्षांत आणूं शकलों. कायद्याच्या दृष्टीनं आवश्यक तेवढे धर्मविधि मात्र करून अर्ध्या दिवसांत मी

कृतकार्य झालों. माझा हा प्रयोग यशस्वी होण्यास सौ. नं आणि सूनबाईच्या वडील मातोश्रींनीं आनंदानं दिलेलं सहकार्य कारणीभूत आहे. रूढीला चिकटून रहायचाच त्यांचा आग्रह असता तर मला नमतं तरी घ्यावं लागलं असतं, नाहींतर हुकुमशाही तरी गाजवावी लागली असती. पण तसं कांहीं न होतां सर्व गोष्टी अगदीं हंसत खेळत पार पडल्या आणि खर्चाच्या फिकीरींत न पडतां, वेळ न मोडतां, थोडीहि दगदग न होतां आम्ही आमची सूनबाई घरीं घेऊन आलों.

आपल्या पत्रांत मी आप्तेष्टांस दूरदूर करूं पाहतों असा माझ्याविषयींचा संशय प्रकट झालेला दिसतो ! परंतु आपण तसं मुळीहि समजूं नये. मी यावेळीं माझ्याप्रमाणं त्यांचीहि सोय पाहिली असंच मला वाटतं. आपली एक गोष्ट सोडली तर माझे बहुतेक आप्तस्वकीय माझ्यासारखे सामान्य परिस्थितीचे आहेत. लग्नाचं बोलावणं गेल्यावर गेलं पाहिजे आणि थोडा तरी अहेर केला पाहिजे. म्हणजे २०।३० रुपयांना तरी खार लागणार. याचा त्यांच्यावर ताण पडणारच. बोलावणं येऊन न जाणं लौकिकांत बरं दिसणार नाहीं या धाकांत प्रत्येकजण असणार. यांतून आपली आणि त्यांची सोडवणूक करायचा एकच मार्ग मला दिसला आणि तो म्हणजे निमंत्रण न करण हा ! मजकडून दोष घडला आहे असं आपणांस वाटत असेल तर तो मला पतकरलाच पाहिजे.

ती. सौ. मामींचा निरोप घरीं कळविला. आतां चि. सौ. सुनबाई सासूच्या हातांखालीं राहिली तर चारदोन दिवसांपुरतीच रहायची. आपलं घर सजविण्यासाठीं ती चि. बापूरावासह पुण्यास जाईल. त्यामुळं सासुरवास करण्याचं मनांत आणलं तरी, सवड मिळणं शक्य नाहीं. कारणपरत्वें सासूसुनेचा एकत्र सहवास होईल त्यांत आपल्याकडून कांहीं चूक झालेली

आढळली तर सासूबाईनीं ( ती. सौ. मामींनीं ) खुशाल आपले कान उपटा-वेत असं त्यांना कळविण्याबद्दल मला घरांतून सांगण्यांत आलं आहे.

चि. रा. बापूराव सूनबाईसह फिरतीवर गेला आहे. त्याच्या लग्नास आप्तस्वकीयांना बोलावलं नाहीं म्हणून त्यानं आपल्या पत्नीसह सर्वांना भेटून यावं अशी योजना मीं केली आहे. त्यास एक महिन्याची रजा आहे· तेवढ्या मुदतींत शक्य तितक्या मंडळींना तो भेटून जाईल. आपलेकडेहि तो येईलच. दहा घरच्या दहा माणसांना प्रवासाचा शीण देण्यापेक्षां एका नव्या जोडप्याला सहलीचा आनंद उपभोगावयास देणं मला बरं वाटलं. जाणत्या तरुण मंडळींस प्रारंभींच एकटं हिंडूं फिरूं दिलं तर परस्परांची चांगली ओळख करून घेतां येईल व आपलं हृद्गत आपल्या जोडीदारास समजून देतां येईल असं मला वाटतं. ती. सौ. मामी म्हणतील, " नव्या नवरानवरीनं दोन रोजांत हातांत हात घालून फिरायचं म्हणजे कलियुगाचेच खेळ ! " पण माझी खात्री आहे कीं, त्यांनासुद्धां हे खेळ बघून रागाऐवजीं कौतुकच वाटेल, आणि आपल्या आयुष्यांत अशी मौज करायला मिळाली असती तर किती छान झालं असतं असं त्यांच्या मनांत आल्यावांचूनहि राहणार नाहीं.

चि. बापूराव आपल्याकडे येईल त्यावेळीं त्यानं आखला असेल तो कार्यक्रम चुकणार नाहीं, असं करण्याबद्दल विनंति आहे. मी आपल्या घरां-तून ठरलेल्या दिवशीं कधींच निघूं शकत नाहीं. कारण ती. सौ. मामींचं कांहींतरीं निघतं आणि त्यांच्यापुढं आमचं कांहींच चालत नाहीं.

आमची सूनबाई चित्तपावनाचीच कन्या असावयास पाहिजे हा माझा आग्रह नव्हता. ती निकोप प्रकृतीची आणि दिसायला बऱ्यापैकीं असावी. थोडीफार शिकलेली, आणि गृहकृत्यांत सराईत असावी आणि मुख्य म्हणजे चिरंजीवांच्या पसंतीस उतरावी व तिलाहि आमचे चिरंजीव पसंत असावेत

एवढंच मी पहात होतों. पोटजातीचा प्रश्न मी माझ्या मतें कधींच काढून टाकला आहे. आणि म्हणून मीं वधूसंशोधन करतांना देशस्थ कऱ्हाड्यांच्या कन्याहि पाहिल्या होत्या. त्यांतील याच मुलीची निवड चि. बापूनं केली हा केवळ योगायोग. आपल्या दृष्टीनं यांत चांगुलपणा असलाच तर तो माझा नसून योगायोगाचाच आहे. चि. अप्पाचं विवाहकार्य मजपर्यंत आलं तर मी पोटजातीकडं मुळींच लक्ष न देतां मुलगी अनुरूप आहे कीं नाहीं एवढं पाहीन. माझी दुसरी सून कदाचित् देशस्थाची, कऱ्हाड्याची, किंवा देशस्थ पतीच्या कऱ्हाडे पत्नीची कन्याहि असेल. वराला अनुरूप वधू मिळवून देणं ही मला विपरीत बुद्धि वाटत नाहीं.

चि. बापूरावाचा असा खोळंबा न व्हावा. त्यास थोडक्या वेळांत पुष्कळांच्या गांठीभेटी घ्यायच्या आहेत व ठरलेल्या तारखेस कामावर हजर व्हायचं आहे. या दृष्टीनंच त्याचा कार्यक्रम चुकूं देऊं नये अशी विनंति मी आपणांस करीत आहे.

हेंच पत्रीं ती. सौ. मामींस शिरसाष्टांग नमस्कार. आपल्या उभयतांच्या भेटीबद्दल आम्ही नेहमींच उत्कंठित असतों आणि कार्याच्या गर्दीत येण्यापेक्षां आतां आपण दोघें आलां तर निवांतपणें बसायला बोलायला मिळेल. आपलेकडील मळणी गुऱ्हाळ वगैरे कामं आतां आवरलीं असतील किंवा आवरत आलीं असतील. तरी एकवार सत्वर यावं अशी आग्रहाची विनंति आहे. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

*आपला*

**दादा.**

*ती. दादांस शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना.* २०

चि. सौ. ताईच्या घरीं दोन दिवस मुक्काम करून मीं परवां सकाळीं पुण्यास आलों. माझ्या मित्रानं घेऊन ठेवलेल्या नव्या जागेंतच त्यानं आम्हांस आणून सोडलं. तीन खोल्या खालीं व माडीवर दोन खणांची एक खोली अशी जागा आहे. संडास, नळ, सार्वजनिक न्हाणीची एक लहानशी खोली, प्रत्येक बिऱ्हाडास वेगळी आहे. एकंदरींत जागा भाड्याच्या मानानं ( दरमहा १८ रुपये ) बरी वाटते. दिव्याच्या विजेचा खर्च साधारणपणं दरमहा दोन रुपये येतो असं म्हणतात.

आमच्या शेजारीं सरकारी कचेरींत मुख्य कारकून असलेले पाटील नांवचे एक गृहस्थ रहातात. पाटील म्हणजे ब्राह्मणेतर असं एकदम वाटतं, पण आबासाहेब पाटील हे ब्राह्मण गृहस्थ आहेत. मोठे अगत्यशील दिसतात. " नवीन बिऱ्हाड थाटतां आहां; कांहीं लागलंसवरलं तर संकोच न करितां मागा " असं त्यांनीं पहिल्याच भेटींत सांगितलं. आबासाहेबांच्या पत्नी

गिरजाकाकूंचा प्रकार याहीपलीकडचा. परवां दोन्हीं वेळां आणि काल दुपारीं त्यांनीं आम्हांस घरीं जेवूं दिलं नाहीं. सुमन स्टोव्ह पेटवून चहाचं आधण ठेवूं लागली, इतक्यांत गिरिजाकाकू आल्या आणि आपणच आमची ओळख करून घेऊन बिऱ्हाडाची मांडामांड नीट होईपर्यंत आम्हीं दोघांनीं त्यांच्याकडेच चहा, जेवण सर्व कांहीं करावं, असं आम्हांस त्यांनीं निमंत्रण दिलं! निमंत्रण कसलं...हुकुमच होता तो! "आपल्याला कशाला उगीच त्रास?" असं मीं म्हटलं तर, "चार मुलांचे संसार मांडून दिलेत मीं. ते तसेच तुम्ही. तुमच्यासाठीं एक वेळ कांहीं करून मी झिजलें तर द्या म्हणे मला एकादं टानिक माझी झीज भरून काढायला!" असं त्या म्हणाल्या, आणि सुमननं पेटविलेला स्टोव्ह त्यानीं विझवून टाकला. दुपारीं जेवून मी कामाला गेलों. संध्याकाळीं परत आलों तेव्हां गिरिजाकाकूंनीं स्वयंपाकघर, माजघर आणि सोपा अशी सामानाची व्यवस्थित मांडणी सुमनकडून करून घेतलेली दिसली. खिळे, तार, काढणी इत्यादि पंचवीसांहून अधिक वस्तूंची यादी त्यांनीं मजपुढें ठेविली असून उद्यां सकाळीं या वस्तू मीं खरेदी करून आणल्याच पाहिजेत अशी त्यांची ताकीद आहे. गिरिजाकाकूंना पाहून मला वैनीची आठवण होते. सुमन म्हणते त्या अगदीं आपल्या आईची प्रतिमा आहेत म्हणून!

काल मी सुमनच्या हातचं पहिलं जेवण जेवलों. ती. सौ. वैनीनं थोडे दिवस येऊन तालीम देणं अवश्य वाटतं! आपल्या आईची लाडकी लेक असल्यामुळं स्वयंपाकाचा सराव तितपतच असायचा. चि. सौ. ताईच्या मामंजींची आणि त्यांच्या हरीभाऊंची आमच्या विवाहावर झकासपैकीं एक चकमक झडली. आमच्या लग्नास "भाडोत्री" असा ताईच्या मामंजींनीं शेरा मारला; तर हरिभाऊंनीं तुमच्या समजूतदारपणाला धन्यवाद देऊन "अनुकरणीय" असं शिफारसपत्र दिलं! पण कांहीं असलं तरी आमचं

तेथील स्वागत व आतिथ्य अत्यंत जिव्हाळ्याचं झालं. ताई किंचित् दुश्शांत होती. पण सुमनशीं तिचं सख्य सुरेख जमलं ! वैनीनं दिलेलीं लुगडीं व खण ताईच्या सासूबाईनां पावते केले. मला एक झरणी आणि सुमनला कोइमतुरी पातळ आणि रेशमी ब्लाउझ अशी देणगी मिळाली. घेण्यावांचून गत्यंतरच उरलं नाहीं. आहेराची देवाण घेवाण बंद करण्याचा आपला मनोदय आपणच कसा बिघडवितों याचं हें चांगलं प्रत्यंतर नाहीं काय ?

आमची प्रकृति ठीक आहे. ती. सौ. वैनीस नमस्कार.

श्रुत होय ही विज्ञापना.

*आपला*

**बापू**

## अनेक आशीर्वाद.

२१

तुझं पत्र पोंचलं. नव्या घरांत तुमचा संसार व्यवस्थितपणें थाटला जात असल्याचं वाचून समाधान वाटलं! शेजार चांगला मिळणं हें भाग्याचं लक्षण आहे. पाटील पतिपत्नींसारखीं प्रेमळ आणि दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यांत आनंद मानणारीं माणसं जगांत थोडीं असतात. विशेषतः शहरांत तर जो तो आपल्यापुरतं पहात असतो. आणि त्यांत त्यांचा दोष असतो असंहि नाहीं. रोजगाराच्या कामांतून वेळ मिळत नाहीं आणि प्राप्तीहि मोजकी असल्यानं इच्छा असली तरी, दुसऱ्यास मदत करण्याची शक्यता नसते. अशा स्थितींत आजूबाजूस नजर न टाकतां पायांखालीं बघून चालणं भाग पडतं. पण पाटील मंडळीसारखीं कांहीं माणसं अशीं असतात, कीं त्यांना अडल्यानडल्यास हातभार लावण्यावांचून आणि कोणा ना कोणांशीं ममत्व जोडल्यावांचून चैनच पडत नाहीं. नशीब तुझं म्हणून तुला असे गोड शेजारी लाभले.

---

परंतु या बाबतींत मला एक सूचना तुला द्यावीशी वाटते. माझी ही सूचना वाचून तूं मला शंकेखोर म्हणशील, पण जगांतील अनुभवानं मी थोडासा तसा झालों आहे खरा. पाटील पतिपत्नींचा प्रथमदर्शनीं अनुभवास आलेला गोडवा चिरकाल टिकून राहीलच असा भरंवसा धरूं नको आणि त्यांत तूं वाहूनहि जाऊं नको. कांहीं माणसांचं प्रेम हें वळवाच्या पावसासारखं असतं. तें आकस्मिकपणें जडतं आणि तें मंदावतंहि तसंच ! आज एकदम गळ्यांत गळा घालणारी ही मंडळी उद्यां कदाचित् ओळखदेख नसल्यासारखी फटकूनहि वागूं लागतील. तेवढ्यावर थांबली तरी ठीक. पण तीं हेवादावा करूं लागणंहि असंभवनीय नाहीं. म्हणून तूं आपल्या नव्या शेजारी मंडळींशीं जपून वागावंस हें बरं. तीं गोड बोललीं, आपण बोलावं. तीं आपल्या उपयोगी पडतात, त्यांहून आपण अधिक उपयोगी पडण्याची दक्षता घ्यावी. शेजारीसुद्धां चतुर असतात. देवबा कोण, घेवबा कोण, हें ते चटकन् ओळखतात; आणि घेवबाला दोन हात दूर ठेवण्याची सावधगिरी ठेवतात. म्हणून कसल्याहि उपकारांचं ओझं आपल्या शिरावर न पडेल याची तुम्हीं उभयतांनीं सावधगिरी ठेवावी. आपल्यासाठी लोकांनीं कारणपरत्वें जें केलें असेल, त्याहून आपण त्याच्यासाठीं काडीभरतरी अधिक केलं असं समाधान तुमच्या मनाला वाटत असलं पाहिजे.

चि. सौ. सुमनला सांगावयाची गोष्ट इतकीच कीं, तिनं कोणत्याहि निमित्तानं ' उसन्याला जायचं नाहीं ' हा नियम कटाक्षानं पाळला पाहिजे. उधारीइतकीच उसनवारीहि तापदायक होते. पाटलांच्या मंडळीशीं घरोबा वाढेल, गिरिजाकाकू अगदीं आईसारखी ममता आणि वाटेल तें देण्याची सिद्धता दाखवतील, म्हणून त्यांच्याकडं उठल्या सुटल्या मागायला जाणं इष्ट नाहीं. संसारांत कांहीं प्रसंग असे येतात कीं, त्यावेळीं शेजाऱ्याकडून एकादी वस्तू मागितल्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. अशा बिनतोड प्रसंगीं

उसनवारी करावी लागली तरी तिची फेड न विसरतां आणि ताबडतोब केली पाहिजे आणि जेवढं घेतलं असेल त्यापेक्षां टाकभर जास्त परत दिलं पाहिजे. आपण उसनवारी न करण्याचं व्रत पाळतांना दुसऱ्याच्या उसनवारीस प्रोत्साहन न देण्याची सावधगिरी ठेवावयास हवी. " ऊठबस जा उसन्याला " अशी खोड पुष्कळ बायकांत दिसते. दुर्दैवानं अशा एकाद्या शेजारणीचा उपद्रव सुमनला होऊं लागला तर तिला थारा देतां नये. मात्र ही गोष्ट चातुर्यानं केली पाहिजे. तोंड गोड ठेवून हात आखडता घ्यायचा.

माझ्या लिहिण्याचा अर्थ, तुम्हीं आपल्या शेजारी मंडळीशीं फटकून आणि तुसडेपणानं वागा असा मात्र नव्हे. तुम्हीं ' भिडस्त आहां ' असं वाटलं तर त्यांनीं म्हणावं पण 'माणुसघाणीं' असा तुमच्याविषयीं कोणाचाहि गैरसमज न व्हावा.

चि. सौ. सुमन आतां स्वयंपाकांत तरबेज झाली असेल. आतांपर्यंत दहा जणांच्या रमण्यांतलं अन्न तुला जेवावं लागत असे, त्या ऐवजीं आपल्या आवडीचे स्वादिष्ट जिन्नस आतां तुला चाखायाला मिळतील. तुझ्या आवडीनिवडी तूं तिला समजावून दे. त्याप्रमाणं ती तुला जेवूं घालील आणि तुझ्या आळणी जिभेंत वेगळी चव निर्माण करण्याचं कौशल्य ती प्रगट केल्यावांचून रहाणार नाहीं. आई मुलाला जेवूं घालतेच. पण जेवायला खरोखर शिकवणारं कोणी असेल तर ती बायको, हें मी स्वानुभवानं सांगतों. या कामांतहि तूं सुमनशीं सहानुभूतीनं वागायला पाहिजे. ती अद्यापि चुलीशीं सरावलेली नाहीं आणि पहिल्यानं तिचे पदार्थ बिघडतीलहि. शाळेंतून निघून तूं कचेरींत जाऊन बसलास त्यावेळीं तुझ्या हातूनहि कामांत चुका झाल्या असतीलच. त्यावेळीं तुझ्या जोडीदारांनीं आणि वरिष्ठांनीं तुला जसं सांभाळून घेतलं, तसंच तूंहि सुमनच्या चुकांविषयीं धोरण ठेवलं पाहिजे. " आईची लाडकी लेक " म्हणून तिच्या तिखट भाजीबद्दल तूं टिंगल करूं

नयेस. टिंगल झाल्यामुळं चूक सुधारण्याऐवजीं नवशिकं माणूस बावरून अधिक चुका करण्याचाच संभव अधिक. पतिपत्नीनीं हास्यविनोद आणि थट्टा-मस्करी करून एकमेकांस रिझवलंच पाहिजे ! मात्र कुचेष्टेनं डोळ्यांतून टिपं गाळायला लावणं हा माझ्या मतें महामूर्खपणा आहे. थट्टा आणि कुचेष्टा यांतलं अंतर सूक्ष्म असतं. पण तें ओळखून आपले शब्द मर्यादेबाहेर न जातील अशी दक्षता तूं घेतली पाहिजे.

इकडील सर्व ठीक. हे आशिर्वाद.

तुझा
दादा

तुमचा निरोप घेऊन निघालों तों काल संध्याकाळीं घरीं सुखरूप येऊन पोंचलों. आठ दिवस तुमच्या सहवासांत आनंदांत गेले. घरीं एकलकोंडं वाटत आहे.

तुमचा संसार सुखांत चाललेला पाहून धन्यता वाटली. तुमचे शेजारी खरोखरीचीं सज्जन माणसं आहेत आणि त्यांनीं तुमच्याशीं जो घरोबा उत्पन्न केला आहे, तो खरोखरच आल्हाददायक आहे. प्रारंभीं मीं त्यांच्याविषयीं संशयी दृष्टि ठेवली, ती चूक होती अशी माझी खात्री पटली. आतां सांगा-यचं एवढंच कीं, जुळलेला हा स्नेहसंबंध टिकवायची–दृढ करण्याची–दक्षता तुम्हीं घेतली पाहिजे.

तुमच्याकडे वरचेवर येतात त्या वसंतरावांविषयीं मात्र माझा फारसा बरा ग्रह झाला नाहीं. त्यांचा डामडौल, आपल्या श्रीमंतीचं प्रदर्शन कर-ण्याची हौस, कोणापुढं किती आणि कसं बोलावं याचा सुमार नाहीं इत्यादि

वसंतरावांचं वर्तन मला आचरटपणाचं तर वाटलंच पण तें सोज्वळ मनाचं तरी असेल कां अशी मला शंका आली. अशीं माणसं आपण मोकळ्या मनाचे आहों असं भासवतां भासवतां अतिप्रसंग करण्यापर्यंत पल्ला पोंचवितात म्हणून सावध असावं.

सौ. गिरजाकाकूंनीं थट्टेनं कां होईना पण तूं आणि सुमन वरचेवर भांडतां आणि मग दोन दोन दिवस घरांत अबोला असतो असं सांगितलं. तुमचीं भांडणं होतात, हें एकून मला मौज वाटली. कारण, मी भांडण सर्वस्वीं निषिद्ध मानीत नाहीं. पतिपत्नींनीं भांडलंच पाहिजे. पण तें भांडण जेवढ्यास तेवढं राहील, या सावधगिरीनं भांडलं पाहिजे. आमचीं दोघांचीं भांडणं रोज चालूं असतात पण आम्ही एकमेकांवर रुसून अबोला धरण्यापर्यंत त्याची मजल जाऊं देत नाहीं. फावला वेळ संपवण्याचं एक मौजेचं साधन म्हणून थोडा वाद, थोडं तूं मी करावं. त्यायोगानं जीवनांतल्या दोन घटका मजेंत जातात. पण भाजल्यावर वण राहतो तसं भांडल्यावर वितुष्ट उत्पन्न होईल असलं भांडण मला अत्यंत त्याज्य वाटतं. तीं भांडणं सुखविघातक होत.

चि. सौ. सुमननं छापील पातळ घ्यायचा बेत केला आणि तो तूं सिद्धीस जाऊं दिला नाहींस यामुळं सुमन दोन दिवस जेवली नाहीं असं सांगून गिरिजाकाकू तिची थट्टा करतांनाहि मीं ऐकलं ! एखादी गोष्ट मनासारखी मिळाली नाहीं, तर असा त्रागा करण्याइतकी ती संतापी मुलगी असेल असं मला वाटत नाहीं; पण ज्याअर्थी तिनं तो केला, त्या अर्थी त्याला दुसरं कांहीतरी निमित्त असलं पाहिजे. तूं आपली हौस हवीतशी पुरवून घेतोस आणि तिच्या इच्छेकडं दुर्लक्ष करितोस अशी तिला तक्रार करितां येईल काय ? तशी तिची तक्रार असेल, तर मात्र तुझं वर्तन रास्त नाहीं असं म्हणावं लागेल. तुझी प्राप्ती मर्यादित आहे आणि त्यांत हौसामौजांना वाव

मिळणार नाहीं ही गोष्ट स्पष्टच आहे. तरी देखील आहे त्यांत आनंद लुटण्यासाठीं माणूस धडपडतो. तुझ्या घरांतील फोनो, टेबलावरील दिवा, बॅडमिंटनचीं फुलं, बॅटी—इत्यादि जिन्नस मी म्हणतों त्याची साक्ष देतील. या वस्तू फारकरून तुझ्या हौसेमुळंच घरीं आल्या असाव्या. आपली हौस पुरवून घेतांना सुमनची हौस पुरविण्याची जबाबदारीहि तुझ्यावर पडते हा विचार कधीं तुझ्या मनांत आला आहे का ?

चि. सुमन तुझ्याहून कशी झाली तरी लहान आहे; आणि तुझ्याहून तिला शिक्षणहि कमी मिळालं आहे. त्यामुळं तिची एकादी मागणी अडाणी-पणाची असण्याचाहि संभव आहे. पण त्या अडाणीपणाबद्दल तूं तिला हिडिस-फिडिस करणं किंवा गुरकावणं श्रेयस्कर नाहीं. तिला तिची चूक प्रेमळ शब्दांनीं समजून द्यावी आणि समजूत नाहींच पटली तर तिची अडाणी हौसहि तूं पुरवावी. त्यापायीं तुझ्या खिशावर थोडा ताण पडला आणि तुझी थोडी कुतरओढ झाली तरी पर्वा करूं नये. त्या कुतरओढीच्या त्रासापेक्षां आपल्या पत्नीचा हंसतमुख चेहरा जास्त किंमतीचा आहे. नवऱ्यानं आटा-पीट करून मिळवण्यासारखं कोणतं सुख असेल तर बायकोची प्रसन्न चर्या, असं आयुष्याचं तत्त्वज्ञान मला तरी पटलेलं आहे.

आपण संसार मांडतों, त्यांत सामाईक स्वरूपाच्या कांहीं वस्तू असतात आणि त्यांच्या खरेदीनं कुटुंबांतील सर्वांचीच हौस पुरविली जाते. उदा-हरणार्थ ग्रामोफोन घे ! तो जरी तूं आपल्या हौसेखातर घेतला असलास तरी सुमनलाहि आनंद देण्याचं सामर्थ्य त्यांत आहे. पण कांहीं वस्तू मात्र व्यक्तिगत आवडीच्या असतात; व त्याहि क्रमाक्रमानं कां होईना, पण खरीदल्याच पाहिजेत. मोजक्या मिळकतीच्या माणसाला अशा वेगवेगळ्या हौसा पुरवणं अवघड आहे. हा अवघडपणा त्या माणसानं आपल्या कुटुंबी-यांना पटवून दिला तर भलतीच हौस कोणी बाळगणार नाहीं आणि जरी

एकाद्यानं बाळगली, तरी ती अपूर्त राहिल्याबद्दल त्याला फारशा वेदना होणार नाहींत. यासाठीं मीं अवलंबिलेला एक मार्ग तुला सांगतों. वास्तविक तो तुला ठाऊकच आहे. तो मार्ग म्हणजे, दरमहाचा पगार झाला म्हणजे तो बायकोच्या स्वाधीन करून मोकळं होणं हा ! त्यामुळं आपण कोणी भाडोत्री बाई नसून घरची मालकीण आहों, अशी तिची भावना होते. आणि आपला प्रपंच नेटका करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, या जाणीवेनं ती अवश्य तेवढाच खर्च करते. नवऱ्यानं आपल्या गरजा आणि आवडी बोलून ठेवाव्या, त्या हमखास पुऱ्या झाल्याच म्हणून समजावं ! बायकांना हौस अमर्याद असते हें खरं, पण सर्वांना असंतुष्ट टेवून, आपल्याच हौसा पुरवून घेण्याचा हांवरेपणा त्यांच्या ठिकाणीं नसतो; उलट सर्वांचं झाल्यावर मग आपलं, अशी त्यांची निःस्वार्थी बुद्धि असते. तुला ठाऊक आहेच कीं, तुझ्या वैनीला चांदीचा ताट तांब्या करायचा आहे, पण अद्यापि तिची ती हौस पुरलेली नाहीं. बरं, सर्व खर्च तिच्या हातूनच होत असल्यामुळं मीं पैसे दिले नाहींत, अशी तक्रार करायला तिला जागा नाहीं. तिची हौस अपुरी राहिली असली तरी माझी कोणतीच इच्छा अपुरी राहिलेली नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखं आहे. टेबल, खुर्च्या, कपाटं नि त्यांत ठेवायचीं पुस्तकं, जें जें म्हणून मला हवं किंवा आवडतं, तें तें आज ना उद्यां माझ्यापुढं येतं हें तूं पहात आला आहेस. या बाबतींत माझं अनुकरण केलंस, तर घरांत कुरबुरीला जागा रहाणार नाहीं. पगार येतांच तू सुमनच्या हातीं दे, आणि " त्यांत कसं भागवायचं हें तुझं तूं पहा " अशी मुखत्यारी तिला तूं देऊन टाक. " गृहिणी सचिवः " हें सुभाषित स्त्री खरं करून दाखवील, पण तिला पुरुषानं वाव दिला तर !

माझं हें पत्र म्हणजे निबंधासारखं वाटेल तुला ! पण आयुष्याच्या सुरवातीला प्रत्येकास असे निबंध वाचले पाहिजेत, अभ्यासले पाहिजेत.

आणि आम्हा वृद्धांना, आपण जमवलेलं अनुभवाचं भांडार तुमच्यापुढं उघडं केल्यावांचून चैन तरी कसं पडणार ?

हेच पत्रीं चि. सौ. सुमनला अनेक आशीर्वाद. खुशालीचीं पत्रें वरचेवर यावींत. सुमनवर पत्रलेखनाचं काम सोपवून आपला जन्मसिद्ध लेखनद्वेष तुला वृद्धिंगत करतां येईल. मात्र यांत दोन घरच्या पाहुण्याप्रमाणं आमची उपासमार न व्हावी. लोभ असावा हे आशीर्वाद.

*तुझा*

**दादा**

*चि. सौ. सुमनताईस अनेक आशीर्वाद.* २३

चि. बाळ सुखरूप येऊन पोंचला. त्यानं तुला पत्र लिहिलंच आहे. त्याच्याबरोबर पाठविलेलं मेतकूट आणि लिंबाचं लोणचं तुला आणि बापूरावांनाहि आवडल्याचं तो सांगत होता. तूं पापड मागितले आहेस ते कोणाबरोबर तरी पाठवीन.

असले बारीक सारीक जिन्नस पाठवणं मला किंवा तुझ्या सासूबाईंनाहि कठिण नाहीं. उलट मुलांना कांहीं लागलं सवरलं तर तें पाठविण्यांत आम्हांला आनंदच वाटतो. आणि तुम्हीं मागितलं नाहीं तरी देखील आम्ही तें पाठवूंच! पण तुला सांगून ठेवतें, असले पदार्थ आपले आपण करण्याचा सराव असावा. माझ्या लहानपणीं, पापड, सांडगे नि लोणचीं, बेळगांवच्या मावस सासूबाई होत्या त्या पाठवायच्या. मला त्यांची कधींहि वाण पडली नाहीं. आणि आपण हे पदार्थ करायच्या भरीस मीं कधीं पडलें नाहीं. पण आमची बदली कऱ्हाडहून एकदम धुळ्याला झाली नि बेळगांवचीं पार्सलं

यायचीं बंद झालीं तेव्हां मला माझी चूक उमगली. किती दिवस या पदार्थां-वांचूनच काढले. किती हिणवणं झालं तेव्हां. मग माझे मीं करायचा प्रयत्न केला. पहिल्या दोन खेपा नीटसं जमलं नाहीं. त्याबद्दलसुद्धां चेष्टा करून घ्यावी लागली; पण मग लागलं जमायला. म्हणून म्हणतें—साऱ्या गोष्टी आपल्याला करायला आल्या पाहिजेत असा तूं प्रयत्न करीत रहा. पुरुषांना कांहीं पक्वान्नंच लागत नाहींत. पण नित्य नवी चटणी, कोशिंबीर त्यांना चाखायला मिळाली तरी त्यांची तब्बेत खूष असते. पण तेवढंसुद्धां होत नाहीं कांहींजणींकडून ! तुझ्या बापूरावांना असले पदार्थ लागत नाहींत म्हणे ! पण तूंच केलेस म्हणून ते चाखून पाहतील आणि एकदां चव कळल्यावर त्यांना ते आवडूंहि लागतील. शिवाय आपली बायको आपल्या खाण्या-जेवण्याची काळजी घेते, हें त्यांना दिसून येईल आणि तूं त्यांना अधिका-धिक आवडूं लागशील !

बाळाच्या सांगण्यावरून तूं भगिनीमंडळांत नांव घातलं आहेस आणि रोज संध्याकाळीं तूं तिथं फुलानं खेळायला जातेस हें कळलं. बापूराव हपीसां-तून घरीं येतात आणि आपला आपण चहा करून घेतात असं बाळ म्हणत होता. हें मात्र मला बरं वाटलं नाहीं. पुरुषांना खूष ठेवायची एक मख्खी सांगतें ! ते बाहेरून यायच्या वेळेला बायकोनं घरीं असावं ! ते बाहेरून येतात ते दमूनभागून येतात. त्यांना कंटाळा आलेला असतो आणि अशा वेळीं आपली बायको हंसतमुखानं त्यांना सामोरी गेली, आणि तिनं त्यांना पेला-भर गार पाणी जरी दिलं तरी त्यांचा शीण भागोटा नाहींसा होतो आणि त्यांची कळी खुलते. त्यांच्याकडून आपल्या मनासारखी कांहीं गोष्ट करून घ्यायची असेल तर अशा वेळीं घेतां येते.

सकाळीं तुझा स्वैंपाक वेळेवर होतो ना ? कीं घड्याळावर डोळे ठेवून आणि भराभरा अन्न भरून घेऊन बापूरावांना कचेरीला पळावं लागतं ? हपी-

सला निघायची जी वेळ असेल, त्याच्या आधीं तासभर तरी स्वयंपाक तयार करून ठेवीत जा. जेवण अगदीं व्यवस्थिपणानं व्हायला हवं. आणि जेवतांना नवऱ्याला राग येईल किंवा कंटाळा वाटेल, अशा गोष्टी मुळींसुद्धां काढूं नयेत. पुष्कळ बायकांना, पुरुष पानावर येऊन बसले कीं, "तांदूळ सरलेत, गहूं आणायला झालेत, आपलीं पातळं जुनीं झालीं आहेत आणि पोलकीं शिवायला टाकायचीं आहेत" अशी जिकीर सुरू करायची संवय असते. पानावर बसला आहे. आतां घटकाभर तरी तो आपल्या तावडींत आहे, अशा समजुतीनं त्या नवऱ्यावर मारा करायला लागतात किंवा 'रमाबाईचा नवरा किती पातळं नि पोलकीं घेतो नि गंगाबाईचे यजमान त्यांच्या कसे मुठींत आहेत' अशा उदाहरणांनीं आपल्या नवऱ्याचा कमीपणा त्या दाखवीत सुटतात; त्यामुळं नवरा जेवणानं खूष होण्याएवजीं संतापनो मात्र ! या चुका दिसायला साध्या दिसतात पण त्यांचे परिणाम बायकांना भोंवल्याशिवाय रहात नाहींत. तुझ्या हातून अशा चुका न घडतील याबद्दल सावधगिरी ठेव.

वरचेवर खुशालीचं पत्र येऊं दे. चि. बापूरावांस अनेक आशीर्वाद.

*तुझी आई*

**जान्हवीबाई**

ती. सौ. वैनींना कृतानेक साष्टांग नमस्कार. २४

वकीलीणबाईबरोबर पाठविलेल्या वड्या आणि गुळांबा मिळाला. मीं येथून शिवून पाठविलेल्या चोळ्या आवडल्याचं त्यानीं सांगितलं तें ऐकून आनंद वाटला. मी ती. दादांच्यासाठीं एक लोंकरीचा स्वेटर विणायला घेतला आहे. पंधरा दिवसांत विणून होईल. मग कोणाबरोबर तरी पाठवीन.

आम्ही खुशाल आहों. त्याबद्दल काळजी करूं नये. तुम्हीं येथून जातांना सांगितलेल्या गोष्टी मीं नीट ध्यानांत ठेविल्या आहेत. सोमवारीं शिवलीलामृताचा अकरावा अध्याय नेमानं वाचतें आणि रोज तुळशीला नि बाळकृष्णाला पाणी घालून हळदकुंकू आणि गंधफूल वाहतें. मला शिवलीलामृताची पोथी आणि बाळकृष्ण किती दिवस आणून देणं होईना ! मग मीच सौ. गिरिजाकाकूंबरोबर तुळशीबागेंत गेलें होतें तेथून आणलं. तुळसहि आणून लावली आहे. मला हंसायला होतं पण मी तिकडं लक्ष देत नाहीं. दहाजणांत रहायचं तर दहाजणांसारखं वागलं पाहिजे, असं सांगितलेलंहि

माझ्या लक्षांत आहे. गिरिजाकाकूंची भाची कमलताई परवां आली होती. तिचं डोहाळेजेवण झालं. मला बोलावणं आलं होतं नि मी गेलेंहि होतें. मींहि कमलाबाईला आमच्या घरीं जेवायला बोलावलं आणि जरीचा खण नारळ देऊन ओटी भरली. त्याबद्दल केवढं तरी व्याख्यान झालं ! डोहाळे-जेवणं, केळवणं, वाढपं, या गोष्टी अडाणीपणाच्या आहेत आणि त्या बंद केल्या पाहिजेत हें म्हणणं मला का पटत नाहीं ? पण लोकांनीं हंसूं नये म्हणून कांहीं गोष्टी कराव्या लागतात त्यांतल्याच या, असं मी म्हटलं तर, " गाढवपणा करून बरं म्हणवून घेण्यापेक्षां शहाणपणानं वागून नांवं ठेवून घेतलीं तरी बरं " असा वाद घातला ! पुरुषांचं आपलं बरं असतं. त्यांना कोणी कांहीं म्हणत नाहीं. आणि म्हटलं तरी ते त्याची पर्वा करीत नाहींत. पण आमचं तसं कुठं आहे ? मंगळागौरीदिवशीं मी आमच्या वाड्यांतल्या मालकांच्या घरीं गेलें होतें. दुपारीं लाडवाचं जेवण झालं म्हणून मी रात्रींच्या फराळाला गेलें नाहीं आणि अकरा वाजायच्या पुढं जागायला राहिलें नाहीं. तर अजूनपर्यंत टोमणे खावे लागताहेत. पण हें कांहीं लक्षांत घेत नाहींत. मी ती. दादांना नि तुम्हांला 'मामंजी' नि 'सासूबाई' म्हणत नाहीं, याबद्दल देखील 'अलीककडच्या मुलींना रीत राहिली नाहीं' म्हणून रंगू मावशी ओरडत होत्या; पण गिरिजाकाकूंनीं त्यांची चांगली रेवडी उडविली. "सुमनचीं सासू–सासरा नाहींना आलीं तुमच्याकडं तिच्यावर फिर्याद करायला ? मग तुम्ही कशाला फुकट ओरडतां ?" असं चक्क विचारिलं गिरिजाकाकूंनीं ! त्यांच्यापुढं कुणाची मात्रा चालायची नाहीं. तुमच्याबद्दल गिरिजाकाकूंना भारी वाटतं !

ती. दादांच्या सांगण्याप्रमाणं मी इंग्रजीचा आणि संस्कृतचा अभ्यास चालूं केला आहे. रोज रात्री ९ ते १० पर्यंत शिकवणी चालते. एखादे दिवशीं कुरकुर होते शिकवायची ! पण मी ती चालूं देत नाहीं. समजून घेतलेला

धडा मी दुसरे दिवशीं दुपारीं पाठ करितें. अक्षर नियमानं घटवितें. हें पत्र पाहून त्यांत कांहीं सुधारणा झाली असेल तर त्यांना दिसेलच.

या महिन्यापासून दर सोमवारीं मधू नांवाचा एक गरीब विद्यार्थी आमचेकडे जेवायला येऊं लागलाय्. आमच्या बाळएवढा आहे. आणि दिसतो सुद्धां थोडासा त्याच्यागत. सहामाही परीक्षेंत दोनशें मुलांत त्याचा पहिला नंबर आला आहे. त्याचे कपडे फाटलेले पाहून या पहिल्या तारखेला, त्याला दोन शर्ट आणि एक कोट शिवायचा बेत झालाय. आपला कोट शिवायचा बेत पुढल्या महिन्यावर गेला आहे.

आमच्या भगिनीमंडळाचा वार्षिक उत्सव दोन महिन्यांनीं व्हायचा आहे. त्यावेळीं मंडळांतील बायका " विदुषी " नाटक बसविणार आहेत. त्यांत वीराचं काम घेतलंय् मी. शाळेंत आम्हीं तें नाटक केलं होतं आणि मीं हेंच काम केलं होतं.

ती. दादांना कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार.

*तुमची*
**सौ. सुमनताई**

२

तुमच्यावर ओढवलेल्या आपत्तीचा विचार करितां मन अगदीं गोंधळून जातं. जनरीत म्हणून मी त्यावेळीं तुम्हांला ' जगरहाटीकडं लक्ष देऊन दुःख आवरावं ' असं लिहिलं, पण तें लिहितांनासुद्धां माझं मन मला सांगत होतं कीं हें तुमचं दुःख आवरतां येण्यासारखं नाहीं. सौ. राधाबाईच्या अकालीं निधनानं तुमच्या संसाराची सर्वस्वीं वाताहात झाली आहे. विशेषतः तुमचा वसंत आणि कुसुम हीं उघडीं पडलीं आहेत. तुमच्या जन्माचा जोडीदार, संसाराचा गाडा ऐन अर्ध्या रस्त्यावर सोडून निघून गेल्यामुळं तुमची स्वतःची अवस्था केविलवाणी झाली असेलच. पण आपल्या आईवेगळ्या झालेल्या लेकरांची दीनवाणी चर्या पाहून तुम्हांला आपल्या दुःखाचा विचार करण्याइतकी सवडहि देवानं ठेवलेली नाहीं.

तथापि या आपत्तींतून देखील कांहींतरी मार्ग काढायलाच पाहिजे. तुमचा पुढं काय विचार आहे याची मला कांहींच कल्पना नव्हती, पण परवां तुमची

मथूताई भेटली. तिच्या सांगण्यावरून मुलांना त्यांच्या मामांकडं पोंचतीं करून, तुम्हीं एकटे हातानं करून दिवस ढकलीत आहां असं कळलं. तुम्हांस कांहीं मुली सांगून आल्या होत्या पण 'यापुढं लग्नाच्या फंदांत पडायचं नाहीं' असा तुम्हीं निश्चय केल्याचंहि मथूताई सांगत होती. सौ. राधाबाई-सारखी प्रेमळ व प्रपंचकुशल पत्नी गेल्यावर तिच्या जागीं कसल्यातरी बायकोची स्थापना करण्याची कल्पना तुम्हांला नकोशी वाटणं अगदीं स्वाभाविक आहे. परंतु विधुरावस्थेंत उरलेलं आयुष्य कंठणं तुम्हांला सुलभ होईल कीं काय याचाहि विचार तुम्हीं करायला पाहिजे असं मला वाटतं. आणि मला असंहि वाटतं कीं तुम्हांला कायमची विधुरावस्था हितकारक ठरणार नाहीं.

सौ. राधाबाईशीं जें सहजीवन तुम्हीं आतांपर्यंत उपभोगलं त्याच्या तुलनेनं तुम्ही यापुढील जीवनाचा विचार करूं नये. त्याची सर कशालाच येणार नाहीं. ह्या जीवनांत आनंद घेणं आणि आनंद देणं एवढं एकच कार्य तुमच्या दोघांच्याहि डोळ्यापुढं होतं. आतां आनंदापेक्षां सोयीवर दृष्टि ठेवून जें काय करायचं तें केलं पाहिजे. आणि ती सोय पहातांना तुम्हाला आपल्या एकट्याचा विचार करून भागणार नाहीं. आपल्याबरोबर तुम्हांला आपल्या मुलांच्या दृष्टीनंहि विचार करावा लागेल.

प्रथम तुमच्या स्वतःपुरता विचार करूं. तुम्हांला आतां माझ्या अंदाजा-प्रमाणं चाळीस वर्षं झालीं आहेत. म्हणजे तुम्ही तरुण आहां असं म्हणतां येणार नाहीं. तरीपण तुम्ही म्हातारे झालां असं म्हणणंहि बरोबर होणार नाहीं. तारुण्याची स्त्रीसहवासाची उसळी तुमच्या ठिकाणीं आतां नसली, तरी तुमची पुरुषी भूक अजिबात मेली आहे असं म्हणणं ही फसवणूक होईल. ही भूक तुम्ही दडपूनहि ठेवूं शकाल; पण त्यांत त्रास होणार नाहीं असं मात्र नाहीं. आपल्या जीवनांत ही एक प्रकारची उपासमार होत असतांना

तुमचं मन वैतागलं तर नवल नाहीं. आणि मन वैतागल्यावर प्राप्त कर्तव्याची हेळसांड होणार हें ओघानंच आलं. नैसर्गिक भुकेशीं केलेली ही जबरदस्ती या ना त्या स्वरूपांत तुम्हाला आणि तुमच्या परिवारासहि उपद्रवकारक ठरण्याची भीति मला तरी वाटते.

ज्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी आतां सर्वस्वीं तुमच्याकडं आली आहे, त्या तुमच्या मुलांच्या दृष्टीनंहि विचार करावयास हवा. आज तीं आपल्या मामाकडं आहेत, पण तीं निरंतर तिथंच राहणं मला धोक्याचं वाटतं. आपल्या बहिणीचीं निराधार लेकरं म्हणून मामा त्यांच्याकडं ममतेनं आणि कनवाळूपणानं पाहतील कदाचित्. पण मामींच्याकडून याच सहानुभूतीची अपेक्षा करणं चुकीचं ठरेल. मामींच्या चांगुलपणाबद्दल मी शंका घेतों असा याचा अर्थ नव्हे. आपल्या चार मुलांच्याबरोबर तुमच्या दोन मुलांचं संगोपन त्या व्यवस्थितपणें करतीलहि. स्त्रीजातीच्या स्वाभाविक कनवाळूपणावर माझा भरपूर विश्वास आहे. तरी पण तो कनवाळूपणाहि परिस्थितीमुळं तडकतो हें लक्षांत घेतलं पाहिजे. आपल्या पतीची आणि प्रपंचाची काळजी वहायची, आपल्या मुलांची उस्तवारी करायची; यांतच पुरे पुरे होत असतांना अधिक दोन मुलांची जबाबदारी त्यांच्यावर टाकणं निष्ठुरपणाचं ठरेल. स्त्रियांच्या काबाडकष्टाला झाली तरी मर्यादा हवी. त्यांची शक्ति मर्यादित असणार हें ओळखूनच त्यांच्यावर जबाबदारी टाकली पाहिजे. ' माझं मला झालं थोडं आणि पाहुण्याचं घोडं माझ्यापुढं ' अशी अवस्था झाल्यावर मामींकडून तुमच्या मुलांची थोडीफार हेळसांड होणार हें संभवनीय आहे, आणि तशी झाली तर त्यांना दोष देणं उचित होणार नाहीं.

आपण मुलांच्या चरितार्थाला पुरेसे पैसे देतों एवढ्यावर तुम्हांला बिनघोर राहतां येणार नाहीं. पैशानं विकत घेतां येत नाहींत अशा गोष्टीहि मुलांसाठीं कराव्या लागतात, व त्या घरच्या मालकिणीनंच करणं भाग

असतं ! लोकांच्या मुलांसाठीं त्या करणं म्हणजे जुलुमाचा रामराम, असं तुमच्या मुलांच्या मामीस वाटणं अशक्य आहे का ?

लोकाघरच्या वास्तव्यांत वांव्यास येणाऱ्या उपेक्षेचा, मुलांच्या मनोविकासाच्या दृष्टीनं, अनिष्ट परिणाम होतो ही गोष्ट विचारांत घेतली पाहिजे. गैरनिगा झाली आणि त्यामुळं वाईट वाटलं तरी मुलांना बोलण्याची चोरी होते. याचा परिणाम म्हणजे तीं कुढीं आणि निराशावृत्तीचीं बनतात. मुलांना जन्मभर भोंवणारी अशी ही हानि आहे आणि ती मुळींच होऊं देतां कामा नये.

तुम्ही स्वतः यापुढं सपत्निक जीवनापेक्षां विधुरावस्थाच अधिक बरी असं मानण्याइतके उदासीन आणि ती निरपवाद रीतीनं कंठण्याइतके निग्रही आहां, असं मानलं तरी एक कुटुंबवत्सल आणि कामकरी गृहस्थ या नात्यानं गृहिणीविना तुमची जीवनयात्रा सुलभ व सुसाध्य होईल का, याचाहि तुम्हीं विचार केला पाहिजे. खानावळींतला गलिच्छपणा तुम्हांला मानवत नाहीं म्हणून तुम्हीं स्वतः स्वयंपाक करून जेवतां असं मला कळलं. नोकरीची आठ तासांची दगदग करून दुवक्तां चुलीपुढं बसणं, घरचे केरवारे, धुणीपाणीं आणि भांडीं घासणं, या गोष्टी निखालस त्रासाच्या आहेत. एक तर यांत चालढकल केली पाहिजे किंवा ही यातायात केल्यावर नोकरींत कुचराई तरी केली पाहिजे. दोन्ही जबाबदाऱ्या उत्साहानं आणि चोख रीतीनं पार पाडणारा माणूस असमान्य असला पाहिजे. तुमची जी मला माहिती आहे त्यावरून तुम्ही सामान्य वर्गातले आहांत असं मला वाटतं. आपला चरितार्थाचा धंदा चोख होऊन आपल्या मुलांच्या संगोपनाची सोय व्यवस्थित व्हावी, यासाठीं तुम्हांला फिरून विवाहित व्हायला पाहिजे हा एकच मार्ग मला दिसतो.

म्हणजे तुम्हीं शारदा नाटकाची नवी आवृत्ति काढावी असं मला

म्हणायचं नाहीं. कसलं तरी व्यंग असलेली, बापाच्या गरीबीमुळं लग्न जमत नसलेली, अशी एकादी विशीच्या पुढली कुमारिकाहि तुम्हांला मिळेल. निदान अशी कुमारिका तुम्ही पैसे देऊन मिळवूं शकाल. पण असा संबंध देखील तुम्हांला सौख्यदायक होणार नाहीं असं मला वाटतं. अशा कुमारिकांची शारिरिक आणि मानसिक भूक मोठी असणार आणि ती तृप्त करण्याइतकी तुमची परिस्थिति भक्कम नाहीं. त्यामुळं अशी नव्या दमाची पत्नी असंतुष्ट राहील आणि असंतुष्ट पत्नीकडून सुखाची अपेक्षा करणं वेडेपणाचं ठरेल.

दुसरी गोष्ट; मूलवाल्या वयस्क बिजवराची बायको होण्यांत आपण त्याच्यावर मोठी मेहरबानी केली असा एक उच्चगंड अशा मुलींत असतो, त्या त्यांच्या तोऱ्यामुळं नवऱ्याला एक प्रकारची लाचारी येते. ती त्याला विधुरावस्थेपेक्षांहि दुस्सह वाटूं लागते. ही लाचारी नको असेल तर सोटेशाही पत्करणं हा एकच मार्ग उरतो. तो पत्करला तर दुसरीकडून रडारड सुरू होते; आणि " भीक नको, पण कुत्रं आवर " अशी बिचाऱ्या नवऱ्याची शोचनीय स्थिति होते. कोणत्याहि दृष्टींनं पाहिलं तरी शिळा नवरा आणि ताजी बायको ही जोडी निर्भेळ सुखाचा आस्वाद घेऊं शकत नाहीं. म्हणून मी म्हणतों:—

( १ ) तुम्ही तुमच्या स्वतःसाठीं आणि तुमच्या मुलांसाठीं ताबडतोब विवाहित व्हा.

( २ ) तुम्ही आतां जी वधू निवडाल ती तुमच्या जीवनांतील आणि स्वतःच्याहि जीवनांतील उणीव भरून काढणारी असावी. आपली सोय पहातांना आपण दुसऱ्याचीहि सोय केली असं समाधान दोघांनाहि असावं. उपकार केल्याचा अहंभाव कोणालाच नसावा. उलट, दुसऱ्यानं आपल्यावर उपकार केले अशी कृतज्ञता दोघांच्या अंतर्यामीं जागृत व्हावी. तिसाऱ्या

सुमाराची एकादी निराश्रित गतधवा—एकादी मूल असलेली कां असेना—तुमची नवी जोडीदारीण होईल तर उभयपक्षीं इष्ट.

माझ्या पत्राचा शांतपणें विचार करा, आणि माझं म्हणणं तुम्हांला पटल्यावर माझ्या सह्यकाची आवश्यकता असेल तर संकोच न करितां कळवा. पंधरा वर्षांपूर्वी तुमच्या लग्नांत माझाच पुढाकार होता, नाहीं कां ?

लोभ असावा, हे आशीर्वाद.

*तुमचा*
**दादा**

पुराणिककाकूंच्या हातीं पाठविलेला तिळगूळ आणि खण-कुंकू मिळालं, फार फार आनंद वाटला. इतका कीं, डोळ्यांत पाणी आलं माझ्या त्यामुळं! संक्रांत रथसप्तमीचीं हळदीकुंकू घरोघर गर्दीनं झालीं. आमच्या अलीकडल्या पलीकडल्या सवाष्णींना ओढ ओढून नेऊन ओट्या भरण्याचा धूमधडाका उडालेला मी घरांत बसून पहात होतें. मला मात्र कुणी बोलावलं नाहीं. माझी जात ब्राह्मणाहून वेगळी असेल, नाहींतर माझं सवाष्णपण त्यांना पटत नसेल! कसं का असेना, मला इतर बायकांनीं वगळलं आणि त्याचं मला वाईट वाटल्यावांचून राहिलं नाहीं. वर्षामागं मला, हळदीकुंकवाची आशाच नव्हती. आणि त्यावेळीं सणासमारंभाला चाललेले सवाष्णींचे घोळके पाहून मला माझ्या नशीबाचा राग येई. दुसऱ्या सवाष्णींचा राग मात्र मला कधीं आला नाहीं. आतां या सवाष्णी मला तोडून टाकतांना बघून मात्र मला त्यांचा राग येतो.

— ८९ —

ती. दादांच्या कृपेनं माझ्या गळ्यांत नवं मंगळसूत्र आलं आणि माझं पुसलेलं कुंकू तुमच्या पुण्यवान हातानं पुनः लागलं. आज दुसऱ्यांदा तुमच्या हातची खणकुंकवाची ओटी मला प्राप्त झाली. माझी आई असती तर तिनं आतां मला इतक्या ममतेनं वागविलं असतं कीं नाहीं, याची शंकाच वाटते. तिच्या अंतर्यामीं माझ्यावरील ममता भरलेली असली तरी जुन्या रूढीच्या दडपणांतून ती तिला तुमच्याइतक्या निर्भयपणानं प्रकट करतां आली असती कीं नाहीं कुणास ठाऊक ! पण करायचं काय हे नसते तर्क करून ! तुमच्या रूपानं खरंखुरं प्रेम करणारी धर्माची माउली मला लाभली आहे आणि ती मला जन्मभर लाभावी एवढंच माझं देवापाशीं मागणं आहे.

आतां आमचं चांगलं चाललं आहे. प्रथम प्रथम मला आणि यांनाहि बाचकल्यासारखं झालं पण तो बाऊ दूर व्हायला फार वेळ लागला नाहीं. लोकांचीं घालूनपाडून बोलणीं आम्हां दोघांनाहि अजूनसुद्धां ऐकून घ्यावीं लागतात. पुण्यामुंबईसारख्या शहरगांवांत पुनर्विवाहाचं कुणाला कांहीं वाटत नाहीं म्हणतात. पण इथल्यासारख्या धड खेडं ना शहर अशा गांवांत जुन्या आचारविचाराचंच प्रस्थ दिसतं आणि कोणी कांहीं नवं केलं कीं, सर्वांचे डोळे त्यांच्याकडं टवकारून बघायला लागतात. पण हें सगळं व्हायचंच, असं ती. दादांनीं आधीं सांगून ठेवलं असल्यामुळं आम्हीं दोघंहि भोंवतालच्या कुरबुरण्याकडं लक्षच नाहीं असं दाखविण्याचं नाटक तरी करतों.

मुलांचं छान जमलं आहे. चि. वसंत, कुसुम हीं खरोखर गोड आणि समजूतदार मुलं आहेत. खेळकर आहेत पण व्रात्य नाहींत. त्यांना असं वळण लावणारी त्यांची आई खरोखरच धन्य होय. बिचारीं मुलं तिला मुकलीं आणि मी त्यांच्या वांट्याला आलें. ज्यांच्या जागेला मी आज बसलें आहे, त्या जागेची जबाबदारी माझ्या हातून कशी काय पार पडेल याची

धास्ती वाटल्यावांचून रहात नाहीं. एकाची सर दुसऱ्याला येणं हें कठीण असलं तरी, माझ्याकडून माझं काम चांगल्या प्रकारे करण्याची मी शिकस्त करीन.

वसंत थोडासा दूरदूर रहातोसा वाटतो, पण कुसुम चांगली लाघवी आहे. माझ्या मालीशीं ती अगदीं खेळीमेळीनं वागते. मालीनं त्यांच्यावरहि चांगली छाप बसविली आहे. माझ्या स्वतःच्या सुखापेक्षां मालीचा पोरकेपणा सरला याचं मला समाधान वाटतं. उघड्या पडलेल्या घरांत घरपणा आला याबद्दल यांनाहि आनंद वाटलेला दिसतो. माझ्याशीं यांचं वर्तन अगदीं खेळीमेळीचं आहे. मला कोणाकडून कसला त्रास होत नाहीं ना, याबद्दल दक्षतेनं पहायचं होतं. एकीकडून माझ्या सुखासाठीं अशी जपणूक चाललेली असली, तरी वसंत कुसुमशीं मी सापत्नभावानं वागतें कीं काय, याबद्दल साशंकताहि कधीं कधीं दिसून येते. चार दिवसांमागं ऑफिसांतून घरीं येणं झाल्यावर कुसुमला विचारायला झालं, " आज माईनं मधल्या सुटींत खायला काय दिलं ? " " जरदाळू ! " असं तिनं उत्तर दिलं. त्यावर विचारलं " किती दिले ? " ती म्हणाली " पांच. " आणि अंमळ थांबून पुनः विचारलं " आणि मालीलाहि जरदाळूच दिले कां ? आणि तिला किती दिले ? " " तिलाहि जरदाळूच दिले होते आणि तेसुद्धां चारच ! " हें कुसुमचं उत्तर ऐकून काय वाटलं असेल कुणास ठाऊक ? संध्याकाळीं कुसुमकडून मला हीं प्रश्नोत्तरं कळलीं तेव्हां मी मनांत चरकलेंच ! माझ्या मुलीला चांगला आणि भरपूर खाऊ देऊन त्यांच्या मुलीला सुमार आणि कमी खाऊ मीं दिला असेल, असा संशय कां आला असेल यांना ? कीं माझी आपली वेडी शंका असेल ही ! स्नेह्यांसोबत्याला सांगितलं कीं, माझ्या कानांवर येतंच कीं तें. कै. राधाबाई सर्वगुणसंपन्न असतील. त्यांच्या मोठेपणाविषयीं मी मुळींसुद्धा शंका घेत नाहीं. फार काय, आपल्या माघारीं आपलं असं नांव ठेवून

जाणारी स्त्री म्हणून मला त्यांच्याविषयीं आदरच वाटतो. आणि मी मनांतल्या मनांत देवाची प्रार्थना करितें कीं, मलाहि त्यांच्यासारखं व्हायची शक्ति आणि बुद्धि दे म्हणून ! पण इतकं असलं तरी त्यांच्या तोंडून त्यांची एकसारखी प्रशंसा ऐकली कीं मनांत येतं, राधाबाईनीं यांचं मन कायमचं जिंकून नेलं, मग मला तिथं थारा आहे कीं नाहीं ? मीं हें सगळं तक्रार म्हणून नाहीं बरं का लिहिलं. तक्रार करायला खरोखर जागा नाहीं अशी स्थिति मला आतां लाभली आणि ती ती. दादांच्या आणि तुमच्या कृपेनं !

हेंच पत्रीं ती. दादांना माझे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. तुम्हांला दोघांना चार दिवस इकडं रहायला बोलवावं असं मीं परवां म्हटलं तर सांगायचं झालं, " दादांना घरांतून बाहेर पडणं म्हणजे अश्वमेध करण्याइतकं बिकट वाटतं ! त्यांना ' या ' म्हटलं कीं त्यांचं उत्तर येईल ' तुम्हीच या ' म्हणून ! " खरं आहे कां हें बोलणं ? तें एकदां खोटं ठरवायला लावा दादांना.

लोभ असावा ही विज्ञापना.

*तुमची*
सौ. गंगूताई

आमचा अश्वमेध निर्विघ्नपणें पार पडला. म्हणजे मीं घर सोडलं आणि आप्तेष्टांचा पाहुणचार झोडून घरीं सुखरूप येऊन पोहोंचलों. तुमच्या घरचं आमचं वास्तव्यं अत्यंत आनंदपूर्ण झालं. चि. सौ. गंगूताईनं पत्करलेली राधाबाईची भूमिका ती कुशलपणें पार पाडीत आहे हें पाहून समाधान झालं ! तुम्ही आणि तुमचीं मुलं, आज जें सुखसमाधान उपभोगतां आहांत तें पाहून तुमचा आधींचा बेत सर्वस्वीं चुकीचा होता हें तुम्हांलाहि पटलं असेल असं वाटतं. तुमच्या आणि गंगूताईच्या जीवनांतली भयाणता जाणून तिथं रमणीयता आली ती कशी, याचा विचार केला तर माणूस म्हणजे नशीबाच्या हातांतलं नुसतं खेळणं नसून स्वतःचं सुख निर्माण करण्याची कळ त्याच्या हातांत आहे असं वाटतं ! नुसता कपाळाला हात लावून बसेल त्याला मात्र सुखाची आशा नाहीं. असो.

तुमच्या घरच्या मुक्कामांत तुमच्या मनाचा एक मोठेपणा दिसून आला

आणि त्यामुळं मला धन्यता वाटली. सौ. राधाबाईवर तुम्ही अमर्याद प्रेम करीत होतां आणि त्याबद्दल आम्ही तुमची कधीं कधीं थट्टाहि करीत असूं. आपल्या पत्नीविषयींची ही आदरबुद्धि तिच्या पश्चात्‌हि टिकून आहे हा मला तुमच्या मनाचा मोठेपणा वाटतो. नव्या बायकोच्या नादांत पहिलीचा विसर पडावा हें स्वाभाविक. आणि नव्या जीवनांत गुंगून गेलेले बिजवर मीं कितीतरी पाहिले आहेत. तुम्हीं गंगूताईच्या सान्निध्यांत राधाबाईला विसरलां असतां तर मला नवल वाटलं नसतं. पण तुमचा प्रकार उलट दिसतो. नवी जोडीदारीण आली तरी तुमची पहिलीशींच अधिक गट्टी आहे असा माझा समज झाला. राधाबाई अमुक प्रसंगीं असं म्हणाली, तमुक प्रसंगीं तिनं तसं केलं, तुमची अडचण तिनं अशा अशा रीतीनं निवारली, तुमच्या आणि मुलांच्यासाठीं तिनं असे असे कष्ट सोसले, याबद्दल दिवसांतून एकदां-तरी तुम्ही बोलत होतां. राधाबाईच्या आठवणीनं तुमचे डोळे एकदोनदां पाणावल्यासारखेहि मला दिसले आणि तुमची ती प्रेमळ कृतज्ञता बघून मलाहि गहिवरल्यासारखं झालं! राधाबाई म्हणजे एक नमुनेदार स्त्री होऊन गेली याबद्दल कोणाचंहि दुमत व्हायचं नाहीं. तिच्या थोरवीइतकाच तुमच्या मनाचा हा थोरपणा मला कौतुकास्पद वाटतो.

पण हा तुमचा थोरपणा तुमच्या नव्या जीवनांतलं स्वारस्य कमी करील असं मला भय वाटतं. चि. सौ. गंगूताईस राधाबाईचं गुणवर्णन सतत ऐकण्यांत आनंद वाटेल काय, याचाहि विचार तुम्हीं करायला पाहिजे. राधाबाईचा चांगुलपणा गंगूताईला मान्य आहे आणि तिला राधाबाईविषयीं भरपूर आदर वाटतो हें आम्हांला दिसून आलं आहे. असं असलं तरी गंगूताई आज राधाबाईच्या बैठकीवर बसली आहे आणि म्हणूनच राधा-बाईची प्रशंसा म्हणजे आपली नालस्ती असा विकल्प तिच्या मनांत येणं संभवनीय आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीनं ही गोष्ट विचारांत घ्यावी. पहिल्या

अधिकाऱ्याचं गुणवर्णन नवीन अधिकाऱ्यास रुचत नाहीं हा अनुभव तुम्हांला तुमच्या कचेरींत येतोच. आणि तुम्हीं रागावूं मात्र नका, अशा प्रसंगीं तुमची मनःस्थिति कशी होईल याचाहि तुम्हीं विचार करण्यासारखा आहे. चि. सौ. गंगूताईनंहि तुमच्याप्रमाणं कांहीं काळ वैवाहिक जीवन अनुभवलेलं आहे. तिचा पहिला जोडीदार सद्गुणी नसेलच असं नाहीं, आणि त्याची आठवण तिला प्रसंगविशेषीं होणार नाहीं असंहि नाहीं! समजा, तुम्हीं वसंत कुसुमच्या आईची प्रशंसा गातां, तशीच गंगूताई मालीच्या वडिलांची स्तुति तुमच्या देखत करूं लागली तर तुम्हांला काय वाटेल? शेजारणींच्या नवऱ्यांचा चांगुलपणा आपली बायको वर्णूं लागली, तरी नवऱ्याचं पित्त भडकतं. मग आपलीच बायको आपल्या दुसऱ्या नवऱ्याचे गोडवे गातांना ऐकून कोणता नवरा संतापल्यावांचून राहील? आपल्यावरून दुसऱ्याचं मन ओळखावं लागतं ही गोष्ट ध्यानांत धरून वागलांत, तर दुसऱ्याला सुखी करून तुम्हींहि सुखी रहाल. कित्येक खऱ्या गोष्टीहि कांहीं ठिकाणीं बोलणं अनिष्ट असतं. कोणती गोष्ट कुठं बोलूं नये, हें तारतम्य ठेवलं तर माणसाच्या वांट्यास येणारा कितीतरी मनस्ताप नाहींसा होईल. तुम्ही सुज्ञ आहांत. सर्व कांहीं तुम्हांला कळतंच. चिरंजीव मंडळींस आशीर्वाद. क्षेमसमाचार वारंवार कळवीत जाणें हे आशीर्वाद.

*तुमचा*

**दादा**

३

## चि. रावजीस अनेक आशीर्वाद. २८

परवां तुझ्यादेखतच तीं. मातुश्रींनीं तुझा लग्न करून घेण्याचा विचार नाहीं असं सांगितलं व तूं हंसून त्यास संमति दिल्यासारखं केलंस, म्हणून हें पत्र लिहिण्यास मी उद्युक्त झालों आहे.

तरुण स्त्री–पुरुषांना अविवाहित जीवन अशक्य नसलं, तरी अस्वाभाविक खचित आहे असं मला वाटतं. आणि कोणतीहि अडचण वा गैरसोय नसतांना अस्वाभाविक जीवन स्वतःवर लादून घेणं हा वेडेपणा आहे. जीवनाला स्वास्थ्य व पूर्णता येण्याच्या दृष्टीनं, पुरुषाला स्त्री व स्त्रीला पुरुष आवश्यक आहे. जीवन स्थिर व सुखमय होण्यास स्त्रीपुरुषांना अशा जोडीदाराचं सख्य संपादन केलंच पाहिजे. अविवाहित जीवन म्हणजे स्वतःवर स्वतःच केलेला बलात्कार होय, असं शारीर व मानस–शास्त्रज्ञ म्हणतात.

पोषणाच्या दृष्टीनं पत्नी भारभूत होईल, असा बाऊ तुला वाटतो कीं काय

कळत नाहीं. तसा वाटत असेल तर तो तूं मनांतून तावडतोब दूर केला पाहिजेस. तुझी आजची कमाई तुझ्या दृष्टीनं अपुरी असेल तर, जबाबदारी पडल्यावर ती अवश्य तेवढी वाढविण्याची प्रेरणा तुला आपोआप होईल. जबाबदारी टाळून आहे त्यांत आराम करण्यापेक्षां जबाबदारी घेऊन ती पार पाडण्यासाठीं धडपडणं हें बाणेदारपणाचं व गौरवास्पद आहे, असं मला वाटतं. बायकोला बोजा मानणं हा एकांगी विचार आहे. निसर्गानं निर्माण केलेली शारीरिक भूक भागविण्यासाठींच केवळ हा बोजा घ्यावा काय, अशा हिशेबी दृष्टीनं या गोष्टीकडं पाहणं उचित नाहीं. कारण, केवळ शरीरसुखा-साठींच पुरुषाला पत्नीची गरज असते असं नाहीं. संसार म्हणजे जीविताची लढाई. ही लढाई लढतांना सहानुभूति आणि सहकार्य द्यायला पत्नीसारखा दुसरा कोणी स्नेही लाभूं शकत नाहीं.

आपणांस लाभेल ती पत्नी, आपल्या स्वभावाशीं समरस होणारी आणि जीवनक्रमांत सहानुभूति व सहकार्य देणारी अशीच असेल याची खात्री काय ? कदाचित् सर्वस्वीं विरुद्ध विचाराची आणि आपमतलबी आचारांची घोरपड गळ्यांत पडण्याचाहि संभव आहे. ही भीति निराधार नाहीं. अशा तऱ्हेच्या बायका आपल्याला कुठं कुठं दिसतात व त्यांनीं आपल्या नव-ऱ्याच्या जन्माचा केलेला खेळखंडोबा आपण पाहतों. विवाहाला सोडत किंवा पत्त्यांचा डाव मानण्यांत येतं. घेतलेलं तिकिट अपेक्षित बक्षीस मिळवीलच असं नाहीं. व आपल्या वांट्यास आलेल्या पानांत हुकुमाचा एक्का असेलच असं नाहीं. पण म्हणून सगळाच डाव टाकाऊ असत नाहीं. हुकुमाचा एक्का एकाच्याच वाटणीला जातो. पण दुसरीं जड पानं व उताऱ्या घेऊन डाव खेळला जातोच. खरा खेळाडू अशा दुय्यम पानांवरहि आपली सरशी करून दाखवितो. वैवाहिक जीवनांत हीच दृष्टि ठेवली पाहिजे. पुरुष काय किंवा स्त्री काय, शंभर टक्के निर्दोष कोणीच असूं

शकत नाहीं. एकांत एक, तर दुसऱ्यांत दुसरं वैगुण्य असतं, आणि मौज ही कीं, स्वतःचं वैगुण्य कोणालाच दिसत नाहीं. दुसऱ्याचं मात्र नेमकं दिसतं ! तेंच उगाळत बसलं तर कुणालाहि सुखी होतां यायचं नाहीं. पण परस्परांचीं वैगुण्यं काढून टाकण्याचा प्रयत्न करून किंवा त्यांकडं डोळेझांक करून गुण्यागोविंदानं नांदतां येणं शक्य आहे. अशीं घरं तुला विपुल दिसतील. त्यासाठीं तुला दूरहि जायला नको. तुझ्या आप्तेष्टांत देखील तुला हें दृश्य पहायला मिळेल. वाङ्मयप्रेमी नवरा व जवळ जवळ अशिक्षित बायको आणि संचारचतुर बायको व प्रपंचमूर्ख नवरा अशी आमचीच जोडी, आनंदपूर्ण सहजीवन उपभोगीत आहे. मला सांगायचं आहे तें एवढंच कीं, जबाबदारी वाढते या भयानं, किंवा विषम मनोवृत्तीचा जोडीदार मिळेल या शंकेनं, विवाहविन्मुख होणं समंजसपणाचं नाहीं. जबाबदारी घेतली म्हणजे ती पार पाडण्याची हिंमत येईल, मार्गहि सांपडेल. लाभेल तो जोडीदार आपल्या सांच्यांत बसवून घेतां येईल. हकराठोकरी ऐवजीं तडजोडीचं धोरण ठेवलं म्हणजे सहजीवन सुखी होऊं शकतं.

अविवाहित जीवनाचा माणसाच्या वृत्तीवरहि अनिष्ट परिणाम होत असतो. निपुत्रिक माणसं तिरसट आणि माणूसघाणीं बनतात, तशींच अविवाहित माणसंहि कुढीं आणि बुझरीं होतात. अविवाहित राहूनहि आनंदी आणि सदैव हंसतमुख माणसं क्वचित् आढळतात पण ते अपवाद म्हणूनच मानले पाहिजेत. सामान्य माणसांनीं अपवाद होण्याचा अट्टाहास करणं श्रेयस्कर नाहीं. वैवाहिक जीवनांत इष्ट असा मनोविकास न कळत होत असतो. आपल्या जीवनाशीं दुसऱ्याचं जीवन संलग्न झालेलं आहे व आपण सुखी होतांना दुसऱ्यालाहि आपण सुखी केलं पाहिजे, ही जाणीव निर्माण होते व त्या जाणीवेबरोबर दुसऱ्यासाठीं थोडाफार त्याग करण्याची सिद्धता अंगीं बाणते. या त्यागांत विषाद न वाटतां आनंद होतो. आपण आपल्या

एकट्याचे नसून दुसऱ्यासाठींहि आपण झिजलं पाहिजे हें मनुष्याचं कर्तव्य मनुष्य प्रथम शिकतो व आचरतो, तें वैवाहिक जीवनांत, असं मला वाटतं.

तरुणपणीं जी स्वप्नांतहि येणार नाहीं, अशी उत्तर आयुष्यांत एक गरज निर्माण होते व ती भागविण्याची सोय विवाहानेंच होऊं शकते. आयुष्याच्या प्रथमार्धांत मनुष्य प्रपंचापेक्षांहि बाहेरच्या जगांत रमून जातो. पण उत्तरार्धांत त्याचा घरचा परिवार पसार होतो व बाहेरच्या परिवाराविषयींचं त्याचं आकर्षण मंदावतं! माझंच पहा. मला अनेक स्नेही लाभले आहेत. तरुणपणीं मी कांहींसा गृहपराङ्मुख व मित्रलोभी होतों. मित्रांची मैफल हें मला खरं सुखस्थान वाटे. पुढं मुलांलेंकरांनीं मला आकर्षित केलं व मी पुष्कळसा गृहलोभी बनलों. सृष्टिनियमानुसार मुली आपापल्या घरीं आणि मुलगे पोटामागं निघून गेले. हौसेनं सजविलेलं आणि पिलांच्या हंसण्याखेळण्यानं रंगलेलं घरकुल, सुनं वाटूं लागलं. बाहेरचे मित्र मन रमवीनात आणि घरचे मैतर घरांत दिसेनात. ही स्थिति किती अवघड आहे, याची तुला आतांच कल्पना यायची नाहीं. या अवघडपणाचा ठणका कमी करायला आम्हांला एकच एक उपाय आहे; तो म्हणजे आम्हां उभयतांचं सान्निध्य. आयुष्यांत—विशेषतः उत्तरार्धांत परस्परांच्या जीवनांत जीव घालणारे खरे स्नेही असूं शकतील तर पुरुषाला त्याची बायको व बायकोला तिचा नवरा हे दोघेच होत; असा मला तरी अनुभव आला आहे. उतारवयांतील अपरिहार्य अशी खऱ्या स्नेह्याची ही उणीव निवारायची असेल तर तरुणपणीं विवाह करणं हा एकच मार्ग मला तरी दिसतो.

विवाहविषयासंबंधीं तुझ्या अडचणी तूं सांगितल्या नाहींस, तरी कोणते प्रश्न तुझ्यापुढं उभे राहणं संभवनीय आहे याचा विचार करून जे सुचले तेवढ्यांचा खुलासा मीं केला आहे. मला सुचले नाहींत असे तुझे कांहीं

प्रश्न असण्याचाहि संभव आहे. ते तूं विचारलेस तर ते सोडविण्याचा प्रयत्न मला करतां येईल.

लोभ असावा हे आशीर्वाद. ती. मावशीस नमस्कार.

तुझा
दादा

आपलं पत्र पोंचलं; लग्नाच्या भानगडींत पडायचं नाहीं असं माझं जवळ जवळ ठरल्यासारखं होतं आणि आतांहि माझा हा बेत मीं बदलला असं नाहीं. पण तुमच्या पत्रानं मलाहि माझे विचार सांगायला हरकत नाहीं असं वाटूं लागलं.

लग्नाच्या भानगडींत न पडण्याचं कारण बायकोचा भार सोसण्याची कुवत माझ्या अंगीं नाहीं हें नव्हे. दोन वर्षांपूर्वी हें कारण सांगतां आलं असतं पण आतां साधेपणानं संसार करण्याइतकी प्राप्ती मला होऊं लागली आहे. पण मी जो व्यवसाय सध्यां करीत आहे त्याची वाढ होणं जसं शक्य आहे, तसंच तो बुडण्याचाहि संभव आहे. तो निरंतर चालेल आणि किफायतशीर होत राहील असा विश्वास अद्यापि मला वाटत नाहीं.

दुसरी गोष्ट; मीं जो व्यवसाय पत्करलेला आहे तो सरकारी नोकरीइतका मान्यता पावलेला नाहीं. कारकुनापेक्षां माझी प्राप्ती अधिक आहे; आणि मी

स्वतःच एक कारकून ठेवलेला आहे. तरी पण सरकारी कारकुनाची प्रतिष्ठा समाजांत मला मिळत नाहीं ! याला आणखीहि एक कारण असूं शकेल. तें म्हणजे मी शिकलेला नाहीं आणि माझी राहणी लोकांच्या दृष्टीनं गबाळे-पणाची आहे. बारा वर्षांचा असल्यापासून दुसऱ्यावर भार घालणं मला कसंसंच वाटूं लागलं आणि जें काय होईल तें आपलं आपण करायचं, अशी लहर येऊन मी घरांतून पळून गेलों. कांहीं दिवस हमालीसारखीं हलकीं कामं करून मी शाळा शिकलों, आणि दुकानं वखारीसारख्या ठिकाणीं चाकरी केली. मिळेल तेवढ्यांत जगायचं अशी संवय मीं लावून घेतली असल्या-मुळं, मीं कधीं कोट वापरला नाहीं व अजूनहि सदरा विजार एवढाच माझा पोषाख मीं कायम ठेवला आहे. मला यांत बदल करण्याची आवश्यकता अद्यापि भासत नाहीं.

माझा काळा वर्ण, आणि थोराड शरीरयष्टि यामुळं माझा गबाळेपणा उठून दिसतो कीं काय कळत नाहीं. पण मला पाहतांच लोकांना मी कोणी-तरी चमत्कारिक इसम आहे असं वाटत असावं, असा मला अनुभव येतो. माझा हा अवतार पाहून एकादी मुलगी खूष होईल ही शक्यता कमीच. एखाद्यानं मला मुलगी द्यायचं ठरवलंच तर तिला ती सक्ती वाटेल आणि मला हा सक्तीचा रामराम नकोसा वाटतो. या उपरहि स्वखुषीनं माझ्याशीं लग्न करण्यास तयार होणारी मुलगी आपणांस आढळल्यास, मी विचार करीन, पण मला ही शक्यता फारशी वाटत नाहीं.

आपणांस अशी मुलगी आढळल्यास मी तिला माझे गुणदोष स्वतः समजावून देईन. आणि त्यासाठीं तिची माझी एकांतांत भेट व्हावयास पाहिजे. अशा मुलीकडून मी कांहीं अपेक्षा करितों; ती व्ह. फा. पर्यंत तरी शिकलेली असावी. इंग्रजीची अक्षरओळख असेल तर अधिक बरं. मला पत्रव्यवहार आणि हिशेब ठिशेब नीटसा जमत नाहीं. त्यासाठीं मला कार-

कुनाची गरज भासते. ही गरज माझ्या बायकोनं भागवावी या इच्छेनंच मी स्वतः अशिक्षित असून शिकलेल्या बायकोची इच्छा करितों.

माझ्या रूपाबद्दल लिहायला नकोच. मी हा असा असलों तरी माझी बायको गोरी आणि देखणी असावी अशीहि माझी इच्छा आहे. आपणांस अशी मुलगी आढळली तर कळवावें.

लोभ असावा ही विनंति.

आपला
रावजी

*चि. रावजीस अनेक आशीर्वाद.* ३०

तुझें पत्र पोंचलें. तुझी अपेक्षा पूर्ण करूं शकेल अशी एक मुलगी माझ्या परिचयांतली आहे. मात्र ती गोरी नाहीं. तिच्या पालकांस तुझी सर्व परिस्थिति मीं सांगितली. ती त्यांना अनुकूल वाटली असावी असं दिसलं. मुलगी तूं इच्छितोस त्याहून अधिक शिकलेली आहे. शिवणकलेंतहि तिची चांगली गति आहे. स्वतंत्र जीवनाचं एक साधन म्हणून ही पात्रता तिनं मिळवून ठेवली असली, तरी विवाहित होऊन संसार करायचा हेंच तिचं खरं ध्येय आहे. ही मुलगी लहानपणींच मातृहीन झाल्यामुळं व गृहस्थिति मध्यम असल्यामुळं तिला गृहकृत्यांचा चांगला सराव आहे. तिच्या आवडीनावडी मी पाहतां, त्यावरून तिला श्रीमंतीचा व नखरेलपणाचा हव्यास नसावा असं वाटतं. नीटनेटकं व ठाकठीक रहायला मिळालं म्हणजे झालं, एवढीच तिची दृष्टि असावी. शिक्षणामुळं स्त्रीस्वातंत्र्याबद्दल ज्या भरमसाट समजुती कांहीं मुलींच्या डोकींत शिरलेल्या दिसतात त्या या मुलीच्या डोकींत

शिरलेल्या दिसत नाहींत. नवऱ्यानं संसारांत व व्यवसायांत आपलं शक्य तेवढं सहकार्य घ्यावं व आपण तें द्यावं असं तिला वाटतं आणि म्हणूनच तुझ्या संसाराप्रमाणं तुझ्या धंद्याच्या कामींहि तुला तिचा चांगला उपयोग होईल अशी माझी समजूत आहे. माझ्या मतानं ती तुला योग्य अशी जोडी-दारीण होईल.

पण माझं मत तूं स्वीकारलं पाहिजे असा माझा मुळींच आग्रह नाहीं. आपल्या आवडीप्रमाणं आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचा अधिकार वधूवरांना आहे आणि त्यांच्या या स्वातंत्र्यास वडील मंडळींनीं बाध आणतां कामा नये असं माझं मत आहे. मग मी तुझ्यावर माझं मत लादण्याचा खटाटोप कां करीन ? मी तुझ्या सोयीच्या दृष्टीनं जसा त्या मुलीकडं पाहतों, तसाच त्या मुलीच्या सोयीच्या दृष्टीनं तुझ्याकडं पाहतों. त्या मुलीच्या पाल-कांना मीं माझं मत स्पष्टपणें कळवलं आहे आणि आवश्यकता निर्माण झालीच तर मुलीलाहि मी सर्व परिस्थिति समजावून सांगेन. तिलाहि मी तुझ्याप्रमाणंच आपला निर्णय आपल्या आवडीप्रमाणं ठरवण्याचं स्वातंत्र्य देईन. समज, ती तुझ्या पसंतीस उतरली पण कांहीं कारणानं तूं तिच्या आवडीला जुळला नाहींस, तर मी तिला तुझ्यासाठीं भीड घालणार नाहीं.

परस्परांनीं परस्परांना रुकार अथवा नकार देण्यापूर्वी त्यांनीं एकमेकांस प्रत्यक्ष पहाणं मला अशक्य वाटतं. तुला गोरी बायको हवीशी वाटणं साहजिक आहे. कोणत्याहि तरुणाला सुंदर बायको हवीशी वाटणारच. आणि मुलीलासुद्धां देखण्या नवऱ्याचीच हौस असणार. तरीदेखील मुलीचा काळेपणा आणि मुलाचा देखणेपणा यांचं मोजमाप ठरलेलं नसतं. एखाद्या फाजील चोखंदळ माणसाला माझ्या इतपत गोरी बायकोहि काळी घूस दिसेल, तर एखाद्याच्या रसिक दृष्टीला तुझ्याइतकी सांवळी मुलगीहि तजेलदार भासण्याचा संभव आहे. प्रेमविवाह झालेल्या कांहीं जोडप्यांकडं पाहून

तिन्हाइताला वाटतं, कीं कोणता चांगुलपणा पाहून हीं एकमेकांवर भाळलीं असतील ? पण त्यांना एकमेकांतला सुंदरपणा दिसलेला असतो, रुचलेला असतो. कुणाच्या डोळ्यांत आणि मनांत कोण कशामुळं भरेल याचा नेम काय सांगावा ? म्हणून म्हणतों, मुलीच्या काळेपणाची एकच एक शंका मनांत न घोळवतां तूं तिला प्रत्यक्ष पहा व नंतर काय तें ठरव. तिलाहि ही संधि देणं उचित आहे. तूं इथं येऊन गेलास तर दोघांनाहि आपापलीं मतं निश्चित करतां येतील.

तूं येथें येशील तेव्हां तुला व मुलीला मनमोकळेपणानं बोलतां येईल असा एकांत मिळवून देतां येईल. मात्र आम्हां वडील मंडळींच्या नजरेच्या टापूंत राहूनच तुम्हांला आपली मुलाखत उरकून घ्यावी लागेल. तुझ्या आणि मुलीच्याहि शुद्धाचरणावर आमचा विश्वास असला, तरी आजूबाजूचे डोळे संशयखोर व छिद्रान्वेषी असतात. त्यांना भ्यालंच पाहिजे. यासाठीं वरील दक्षता घ्यावयाची. तुम्हां उभयतांना आमच्या नजरेखालीं जो एकांत मिळेल त्यांत आम्ही किंवा दुसरे कोणी लुडबूड करणार नाहीं अशी दक्षताहि मला घेतां येईल. केव्हां येणार तें कळवावें. लोभ असावा हे आशीर्वाद.

तुझा
दादा

*चि. रावजीस अनेक आशीर्वाद.* ३१

तुझं आजचं पत्र पाहून मनाला मोठा धक्का बसला. तुझं आणि चि. ताराताईचं मनमोकळेपणानं बोलणं होऊन, तुम्हीं दोघांनीं एकमेकांस पसंत केलं अशी जवळजवळ खात्री वाटत असतां, तुझं नकाराचं पत्र आश्चर्य-कारक वाटणं साहजिकच आहे.

चि. ताराताईच्या पालकांनीं तुझ्याबद्दल तुझ्या माघारीं चौकशी केली आणि ती तुला कळली हें नकार देण्याचं कारण वाचून मला विस्मय वाटला. " मी स्वतः माझी सर्व परिस्थिति अगदीं स्पष्टपणें सांगितली असून व पुढेंहि कांहीं शंका असल्यास तिचं निरसन करण्यास तयार असून मुलीच्या पालकांना इतरांकडे माझी चौकशी करण्याचं कारण काय ? त्यांनीं दाखविलेला हा अविश्वास मला अपमानास्पद वाटतो आणि अशा संशय-खोर लोकांशीं व्यवहार करण्याची माझी इच्छा नाहीं " हें तुझं म्हणणं मला शीघ्रकोपीपणाचं व असमंजसपणाचं वाटतं.

मुलांचे पालक हे संशयखोर म्हणण्यापेक्षां सावध असतात आणि तसं त्यांनीं असलंहि पाहिजे. माझ्याकडून व तुझ्या स्वतःकडून कळलेली तुझी माहिती ताराताईच्या पालकांना अविश्वसनीय वाटल्यामुळं त्यांनीं दुसऱ्या एका परिचितामार्फत ती खरीखोटी करून घेण्याचा प्रयत्न केला, असंच कां समजायचं ? या जन्माच्या गांठी आहेत. एकदां पडलेली गांठ सुटण्याची शक्यता नाहीं म्हणून ती गांठ बांधली जाण्यापूर्वी आपण शक्य ती सावध-गिरी ठेवली असं समाधान त्यांना वाटावयास पाहिजे. आपली खात्री करून घेण्यासाठीं त्यांनीं असा प्रयत्न केल्यास मला तरी त्यांत कांहीं वावगं दिसत नाहीं. आज तुझा तूं मुखत्यार आहेस. पण तुझे वडील हयात असते तर त्यांनींहि तुझ्या आणि माझ्या शब्दांवर भिस्त ठेवण्यापेक्षां मुलीच्या कुलशीलाची दुसऱ्या दहाजणांपाशीं चौकशी केली असती. हा व्यवहारच आहे. आणि एवढ्या निमित्तावर तूं हा निर्णय घेणं मला उचित वाटत नाहीं.

तूं स्वतःला उघड्या मनाचा व स्पष्टवक्ता म्हणवितोस. जें कांहीं करायचं तें कसलाहि आडपडदा न राखतां उघड आणि धीट मनानं करायचं असा आपला बाणा असल्याचं तूं प्रौढीनं सांगतोस. कोणतीहि गोष्ट असेल तशी सांगण्यांत तुला कमीपणा वाटत नाहीं. मग त्याच गोष्टीबद्दल दुसऱ्याकडं चौकशी करून त्यांनीं कांहीं सांगितल्यास तुला रागाचा झटका कां यावा ? याचा अर्थ, तुझा उघडा स्वभाव फक्त सांगण्यापुरताच आहे असा होणार नाहीं काय ?

दुसऱ्या इसमामार्फत तुझी चौकशी करण्यास ताराताईच्या पालकांना कांहीं कारण असूं शकेल असं तूं कां समजूं नयेस ? मला आतां जी माहिती कळली तीवरून त्यांना असं कारण आहे असं मला दिसून आलं. चारच महिन्यांपूर्वी त्यांच्या नातलगांतील एका मुलीचं लग्न एका प्रवासी-विक्रेत्याशीं

जमलं. त्या गृहस्थानं सांगितलेली स्वतःची माहिती खरी समजून त्या मुलीच्या पालकांनीं रुकार दिला आणि मुहूर्तनिश्चयहि झाला. पण लग्नाच्या आदल्याच दिवशीं तो गृहस्थ विजातीय आणि वेषांतर करून फिरणारा एक गुन्हेगार आहे असं उघडकीस आलं. घरांतलंच हें उदाहरण ताराताईंच्या पालकांच्या नजरेसमोर ताजं आहे. आणि एकदां तोंड पोळल्यावर ताकहि फुंकून प्यावं, असं त्यांना वाटल्यास त्यांना दोष देतां येणार नाहीं. ही हकीकत तुला कळल्यावर तुला आलेला त्यांचा राग नाहींसा होईल असं मला वाटतं आणि तसं झाल्यास तुझा निर्णय बदलणंहि शक्य आहे. तसा बदलल्यास मला आनंद वाटेल.

लोभ असावा हे आशीर्वाद.

तुझा
दादा

चि. रावजीस अनेक आशीर्वाद ३१

तुझं पत्र पोंचलं; एकदां दिलेला निर्णय बदलण्याची तुला आवश्यकता वाटत नाहीं, यामुळं माझा विरस झाल्यावांचून राहिला नाहीं. या प्रकरणांत ताराताईंचे पालक किंवा मी चुकलों असं मला मुळींसुद्धां वाटत नाहीं. मात्र, तुझ्या उघडेपणाच्या सोंगाला आम्ही चकलों असं मात्र वाटतं. ही तुझी खाजगी बाब आहे व त्यांत मनाप्रमाणं वागण्यास तूं स्वतंत्र आहेस. तुझ्यावर भिडेचं दडपण घालण्याची मला इच्छा नाहीं म्हणून या प्रकरणास मीं येथेंच पूर्णविराम देतों.

तुझ्या पत्रांतील "तुम्हीं माझा संबंध सोडाल" हे शब्द वाचून मला मनस्वी वेदना झाल्या. तुझा आणि माझा नात्याचा संबंध आहे ही गोष्ट जमेस धरली नाहीं, तरी तूं आणि मी आतांपर्यंत स्नेही म्हणून वागत आलों आहों. वयाची वडीलकी या स्नेहांत व्यत्यय न आणील अशी खबरदारी घेऊनच मी तुझ्याशीं वागलों. माझी स्नेहाची कल्पना तुला वाटते तशी

ठिसूळ नाहीं. मी जो स्नेह जोडतों तो तोडण्यासाठीं नव्हे. प्रत्येक मनुष्याच्या आवडीनावडी आणि मतं भिन्न असतात. स्नेही झाले तरी सर्व गोष्टींत ते सहमत होतीलच असं नाहीं. आणि जरी एखाद्या बाबतींत मतभेद होऊन एकजण आपल्या मताप्रमाणं वागला, तरी तेवढ्या निमित्तानं दुसऱ्यानं दिवसानुदिवस संभाळलेला स्नेहसंबंध तोडावा, ही गोष्ट मला तरी रास्त वाटत नाहीं. मी जमलेला स्नेह तोडण्यापेक्षां टिकवून धरण्याचा, दृढतर करण्याचा प्रयत्न करीत असतों, म्हणून मी तुझा संबंध सोडीन ही भीति तुला नको. दुसरी एखादी मुलगी तुझ्या आवडीशीं जुळणारी मला आढळली तर तुझं तिचं लग्न जमविण्याची मी फिरूनहि खटपट करीन. अधिक काय लिहूं?

स्नेह तुटल्याची भाषा फिरून लिहूं नये, बोलूं नये, हे आशीर्वाद.

तुझा

दादा

8

## चिरंजीव राजेश्री भय्यासाहेब यांस अनेक आशीर्वाद. २२

तुमचं पत्र पोंचलं. तुमच्या पत्रानं मला चांगलाच राग येईल अशी तुमची अटकळ असेल तर ती मात्र चुकली. मला राग तर आला नाहींच पण मौज मात्र वाटली. आणि अशीं पत्रं प्रत्येक जांवई प्रत्येक सासऱ्यास लिहीत असला पाहिजे अशी माझी समजूत पटली. मी तुमच्या अवस्थेंत होतों तेव्हां मीहि माझ्या श्वशुरांस अगदीं याच शब्दांत नसलं तरी याच आशयाचं पत्र लिहिलं होतं म्हणे ! असल्या किरकोळ गोष्टी पुरुषांच्या लक्षांत रहात नाहींत. बायकांना मात्र त्याची खडान्‌खडा आठवण असते. सौभाग्यवतीच्या स्मरणांत माझं तें पत्र होतं. आणि तुमचं आजचं पत्र मीं घरांत वाचून दाखविलं, तेव्हां ती हंसून म्हणाली ‘ अगदीं जशास तसं प्रायश्चित्त मिळतंय् ’ म्हणून.

चि. सौ. आक्कास वीस तारखेस महिना झाला माहेरीं येऊन आणि तुमच्या ताकिदीप्रमाणं त्याच दिवशीं तिनं तिथं येऊन हजर व्हायला

पाहिजे होतं. पण चोवीस तारखेपर्यंत ती आली नाहीं या रागानं तुम्हीं हें पत्र लिहिलं आहे. ‘ आपणास इकडच्या अडचणींची कल्पना कशी येणार ? ’ असा टोमणा तुम्हीं मला दिला आहे; त्याबद्दल एवढंच सांगावंसं वाटतं कीं, तुमच्याकडील असलेल्या व आहेत अशा भासणाऱ्या सर्व अडचणींचा विचार करून, त्या अडचणी फारशा बिकट नाहींत अशी खात्री झाल्यावरच मी चि. सौ. आक्कास इथं ठेवून घेतलं आहे. आणि ज्या कामासाठीं मीं माझ्या अधिकारांत तिची रजा वाढविली, तीं कामं उरकतांच पुढील रविवार-पर्यंत मी तिची तिकडं रवानगी करणार आहे. म्हणजे आणखी पांचसहा दिवस तुम्हांला ताटकळत रहावं लागणार.

‘ मंजूर झालेल्या रजेपेक्षां एक दिवसाची गैरहजेरीहि आम्हां नोकरांना दंडनीय ठरते,’ असं लिहिण्याचा उद्देश मंजुरीबिना चार दिवस गैरहजर राहिलेल्या तुमच्या बायकोचा अपराध जबर शिक्षा करण्यासारखा झाला, असं सुचविण्याचा असावा. तसं असेल तर तुम्हीं दिलेला नोकरांचा दाखला या ठिकाणीं लागू पडत नाहीं. पत्नी नोकरांपेक्षां अधिक दर्जाची आहे. म्हणून नोकराप्रमाणं तिच्याशीं कांटेकोर वागणं समंजसपणाचं ठरणार नाहीं. तुमच्या विद्यालयाच्या त्रैमासिकांत ‘ माणुसकी ’ या मथळ्याचा एक लेख मीं आजच वाचला. त्याचा लेखक कोण हें कळायला मार्ग नाहीं. कदाचित् तुम्हींहि तो लिहिला असेल. त्यांत ‘ पत्नीला चाकर–फार काय जनावर–मानण्याचा करंटेपणा करण्यापेक्षां, तिला आपल्या बरोबरीचा सोबती मानणं हें माणुसकीचं आहे ’ असं एक वाक्य आहे. या वाक्याशीं तुमचा नोकराचा दाखला विसंगत दिसेल. नाहीं कां ?

तें असो. पण चि. सौ. आक्कास आणखी पांचसहा दिवस कां पाठवितां येत नाहीं तें आतां सांगतों. तिची मावशी आजच इथं यायची आहे. आणि ती फार लांबून येणार आहे. लग्न झाल्यापासून आक्का तिला भेटलेली नाहीं.

आक्काला ठरल्याप्रमाणं वीस तारखेस पाठविलं असतं तर मावशी–भाचीची भेट होऊं शकली नसती आणि ती पुनः केव्हां होईल हेंहि सांगतां येण्यासारखं नव्हतं. दुसरं एक कारण असं कीं आक्काची बालमैत्रीण सुशीला बाळंत होऊन मुलगा झाला आहे आणि बारसं येत्या शुक्रवारीं आहे. सुशीलानं बारसं झाल्याशिवाय जाऊं नको असा आग्रह केल्यावर तो न जुमानतां आक्कानं निघून जावं, हें आम्हांला प्रशस्त वाटत नाहीं आणि आक्कालाहि आपल्या या नव्या भाच्याचा समारंभ पहायची हौस आहेच. फारा दिवसांनीं येणाऱ्या मावशीच्या भेटीसाठीं आणि तुमच्या मित्राच्या एकाद्या महोत्सवासाठीं तुम्हीं 'सिक–सर्टिफिकेट' ( खोटं ) पाठवून खचित चार दोन दिवसांची रजा वाढविली असती. पुढंहि केव्हांतरी वाढवाल.

'प्रकृति ठीक नाहीं, कसंसंच होतं, आणि खानावळींतलं जेवण मानवत नाहीं' अशा तक्रारी बायको माहेरीं गेल्यावर बहुतेक तरुणांच्या सुरू होतात. पण चार आठ दिवस त्यांना त्या चालवून घेतां येतात. तुम्हींहि या तक्रारींना थोडे दिवस दाद देणार नाहीं असा मला विश्वास आहे.

तुमच्या अडचणी तशा जबर असत्या तर चि. सौ. आक्काला मीं ठरलेल्या दिवशीं, फार काय त्याच्या आधींहि परत पाठविलं असतं. श्रावणमासीं तुमचे तात्या आजारी असल्याचं पत्र आल्यावर ठरविलेला मंगळागौरीचा बेत रहित करून मीं तिला नंदापुरीं तुमच्या घरीं पोंचविलं हें तुम्हांला आठवत असेलच. पण यावेळीं तुमची तशी कांहीं अडचण मला दिसत नाहीं.

बायकोच्या भेटीसाठीं आतुर होणारा तुमच्यासारखा नवरा माझ्या मुलीस लाभला हें तिचं भाग्य होय. आणि असा प्रेमळ जांवई लाभल्याबद्दल आम्हांलाहि धन्यता वाटते. बायकोवर लुब्ध असणं हें तरुण पतीला भूषणच

आहे. मात्र त्यानं लुब्ध आणि लंपट यांतील अंतर लक्षांत ठेवावं एवढंच आम्हां म्हाताऱ्या माणसांना सांगावंसं वाटतं.

आणखी एक सांगावंसं वाटतं तें हें कीं, मनांत येतील ते सर्वच शब्द पत्रांत लिहिण्यासारखे असत नाहींत. संतापाचा भर असतांना दहा अंक मोजल्यावांचून बोलूं नये तसं लिहूंहि नये.

सुज्ञास अधिक लिहिणें नलगे. लोभ असावा हे आशीर्वाद.

तुमचा

दादा

## चि. बळवंतराव यांस अनेक आशीर्वाद. ३४

सोबत तुमच्या गोपूकाकांचं आलेलं पत्र तुमच्या अवलोकनार्थ पाठवीत आहे. चि. सौ. ताईसह तुम्हांस दिवाळीला इकडं पाठवावं अशी घरचे वडील म्हणून मीं त्यांना विनंति केली होती, तिला हें उत्तर आलेलं आहे.

माझी विनंति त्यांनीं अमान्य केली म्हणून मला वाईट वाटलंच. पण या निमित्तानं माझ्याविषयींची त्यांच्या मनांतली मळमळ बाहेर पडली हें एक प्रकारे बरंच झालं. त्यांनीं कळविलं नसतं तर माझ्या हातून घडलेल्या चुकांबद्दल मी अंधारांतच राहिलों असतों.

चि. सौ. ताईच्या लग्नापासून आतांपर्यंत वरपक्षाशीं मी कशाकशा प्रकारे जनरीतीविरुद्ध वागलों याची गोपूकाकांनीं क्रमवार यादी दिली आहे. हुंडा-मानपानाबद्दल ठरलेले सातशें रुपये मीं दिले, हें त्यांना मान्य आहे. पण ठरलेलं नसतांनाहि कांहीं गोष्टी लग्नांत करायलाच हव्या होत्या, कारण तशी जनरीत आहे, असं त्यांचं म्हणणं आहे. रुखवताच्या वेळीं आम्हीं विड्यांत

रूपाया घातला नव्हता, विहीणबाईंना जरीचं पातळ अथवा शालू देण्या-ऐवजीं भिकाऱ्यासारखं टोपपदराचं इरकली लुगडंच दिलं; लग्नासाठीं नवरा मुलगा मिरवीत आणला तेव्हां बँड बोलावला नाहीं, मांडवपरतणी दिवशीं विहीणींना रामनाहणी घातलीं नाहींत आणि मेजवानी दिली ती नुसत्या मोतीचुराची दिली, इत्यादि अपराध त्यांनीं माझ्या पदरांत बांधले आहेत. संक्रांतीचा तिळगूळ चांदीच्या वाट्यांतून मीं पाठविला नाहीं आणि तिळ-गुळासोबत तुमच्या सौ. काकूंना व बहिणींना खणहि दिलेले नाहींत. इतर सणांनहि मीं वरपक्षीयांचा योग्य तो मान कसा ठेवला नाहीं याबद्दल गोपूकाकांची तक्रार तुम्हांला त्यांच्या पत्रावरून समजून येईल.

पण त्यांनीं माझ्यावर कितीहि दोषारोप केलेले असले तरी मी पूर्णपणें निर्दोषी आहे असं माझं मन आहे, गोपूकाका माझ्याच वयाचे असले तरी ते पन्नास वर्षांपूर्वींच्याच जगांत वावरत आहेत. मला परिस्थितीनं आजच्या जगांत खेंचीत आणलेलं आहे, आणि आजच्या जगाचे विचार मला परिचित झाले आहेत, पटलेहि आहेत. स्वाधीनचं असेल तेवढ्यापुरतं मी आजच्या विचारानं चालतों.

लग्नकार्यांत देण्याघेण्याचा प्रश्नहि निघूं नये अशी माझी मनापासूनची इच्छा. या इच्छेला विरोध होईल तर कार्यच करायचं नाहीं असा खंबीरपणा मात्र बाळगतां आला नाहीं. कारण माझ्यासारख्या सामान्य परिस्थितीच्या माणसाला योग्य वयांत मुलीला उजवणं हें तत्त्वनिष्ठेपेक्षां आवश्यक असतं. आणि वरपक्षाच्या आवडीनावडीपुढं आपलीं मतं व इच्छा नमवावी लागते. चि. सौ. ताईस तुमच्यासारखा पदवीधर, मिळवता आणि उमदा जोडीदार मिळतो या लाभाखातर मीं तुमच्या गोपूकाकांच्या मागण्या मान्य केल्या, माझ्या सामर्थ्याबाहेरच्या असल्या तरीहि मान्य केल्या आणि जो ठराव झाला त्याबरहुकूम मी वागलों. रोख पैसे दिल्यावर वेगळे मानपान करा-

यला नको असं यादींत चक्क लिहिलेलं असतांना फिरून हीं कुसपटं निघावीं याचा विषाद वाटतो. एकदां करार आणि ठराव असं म्हटल्यावर त्याबर-हुकूम वागणं हें उभयपक्षीं बंधनकारक असलं पाहिजे असं मला वाटतं. ठरावाबाहेर कोणी कोणास अधिक देऊं नये, कोणी अधिक घेऊं नये आणि कोणी अधिक मागूं नयेच नये. पण होतो प्रकार तो असा !

वधूपक्ष हा आपल्या तावडींत सांपडलेला बळी या दृष्टीनं वरपक्षानं त्याच्याकडं पहाणं हें हितपरिणामी होईल कीं काय याचा विचार लोकांनीं अजूनहि करूं नये ही खेदाची गोष्ट आहे. विवाहसंबंधानं एकत्र आलेलीं दोन कुटुंबं स्नेही म्हणून सुखानं रहावीं हें योग्य. पण स्नेह निर्माण व्हायला, तो टिकायला, आणि वाढायला, दोन्हीं कुटुंबांनीं समानतेची भावना ठेवली पाहिजे. आम्हो श्रेष्ठ, दुसरे कनिष्ठ, हुकूम फर्मावण्याचा अधिकार आमचा, ते मुकाट्यानं पाळायचं काम दुसऱ्याचं, अशा विषमतेच्या वातावरणांत एकत्र आलेलीं दोन कुटुंबं स्नेही बनण्यापेक्षां, वैरी म्हणून दूर होण्याची शक्यताच अधिक आहे. तुमच्या कुटुंबीयांच्या बाबतींत मला असा कटु अनुभव न यावा अशी माझी प्रभूपाशीं प्रार्थना आहे.

मानपान करायचं, हौसा पुरवायच्या या गोष्टी करणाऱ्याच्या विचारांवर आणि परिस्थितीवर अवलंबून असतात. बँड वाजवीत मिरवणं हें मला मौजेचं वाटत नाहीं आणि तासाभराकरितां त्यापायीं दहा बारा रुपये खर्चणं, माझ्या शक्तीबाहेरचंहि होतं. मी ज्या गोष्टी केल्या नाहींत असं गोपूकाका म्हणतात त्या मला जमल्या नाहींत म्हणून केल्या नाहींत असा सरळ हिशेब करण्याऐवजीं, त्या मीं त्यांचा उपमर्द करण्यासाठींच केल्या नाहींत असा आरोप ते माझ्यावर कशासाठीं लादतात ? योग्य असेल व शक्य असेल तें आपल्या माणसासाठीं माणूस आनंदानं करतो. आपल्या

जांवयाचं कोडकौतुक करण्यांत कोणत्या सासऱ्याला आनंद वाटणार नाहीं ? पण जांवयाची हौसहि तशी कौतुकास्पद असायला पाहिजे, नाहीं का ?

गोपूकाकांचं पत्र तुमचेकडं पहायला पाठविलं आणि त्याबाबतचे माझे विचार मीं तुम्हांला कळविले, ते काकांविरुद्ध तुमच्याकडं फिर्याद म्हणून कळविले नाहींत. तुम्ही या बाबतींत त्यांच्याकडं माझ्याबद्दल रदबदली करूं नका आणि त्यांचे विचार तुम्हांला रुचले नाहींत तर वादहि घालूं नका. तुमच्या घरांतला एकोपा व गोडवा बिघडेल अशी कोणतीहि गोष्ट तुम्ही करूं नका. काका-काकूंना धाब्यावर बसवून तुम्हीं ताईला घेऊन दिवाळीस इकडं यावं अशी माझी इच्छा नाहीं. तुम्हांला हें पत्र लिहिण्याचा हेतु एवढाच कीं, माझ्याविषयीं तुमचा कांहीं गैरसमज असूं नये. माझे विचार मीं तुम्हांला कळविले. तुम्ही सुविद्य व सुसंस्कृत आहां. आजचं जग पहातां आहां. तुम्हांला माझे विचार पटले तरी पुष्कळ झालं.

लोभ असावा हे आशीर्वाद.

तुमचा

दादा.

तुमचा निरोप घेऊन निघालों तों काल संध्याकाळीं सुखरूप घरीं येऊन पोंचलों. गाडींत जागा चांगली मिळाली होती आणि घरीं येईपर्यंत माझं एक पुस्तक वाचून झालं. भावे आडनांवाचे एक गृहस्थ सहकुटुंब प्रवासाला निघालेले आमच्या डब्यांत होते. सौ. भावे यांची आणि तुझ्या वैनीची ओळख होऊन गट्टी जमण्यासहि वेळ लागला नाहीं. ' परत जातांना आमच्याकडे थांबल्याशिवाय जावयाचं नाहीं ' अशी हिनं भावीणबाईंना ताकीद दिली आहे, आणि त्यांनीं येण्याचं वचन दिलं आहे. इतकं झाल्यावर मींहि श्री. भावे यांना आमंत्रण दिलं आणि त्यांनींहि तोंडांतल्या तोंडांत हंसून त्याचा स्वीकार केला. घरधनीणींनीं कार्यक्रम निश्चित केल्यावर या आमंत्रणाची जरुरी काय, असा त्यांच्या हंसण्याचा अभिप्राय असावा. बायकांना भांडकुदळ म्हणतात पण सख्य जमविण्याची त्यांची चतुराईहि पुष्कळदां पहायला सांपडते. असो.

चार दिवस तुझ्या घरीं मोठ्या आनंदांत गेले. त्यांतल्या त्यांत खरा आनंद झाला आहे तो तुझ्या वैनीला. तूं इथं होतीस .आणि आतांहि इकडं अधूनमधून येतेस त्यावेळीं आम्हांला आनंद होतोच पण त्या वेळेपेक्षां या खेपेच्या आनंदांत वेगळी गोडी वाटली. ही वेगळी गोडी कां वाटली, याचा मी मनांशीं विचार करूं लागलों तेव्हां मला समजून आलं कीं, या वेळचा आनंद नुसत्या सहवासामुळं निर्माण झालेला नाहीं; तर आईबापांच्या सांवलीबाहेर पडून तूं जें नवीन जीवन स्वीकारलं आहेस त्यांतहि तूं सुखी आहेस म्हणून झालेला आहे. मुलं दूर गेलीं म्हणजे तीं सुखांत असतील का, अशी हुरहूर आईबापांच्या अंतर्यामीं सतत सलत असते. आणि भीतीचं कारण नाहीं असं प्रत्यंतर आलं म्हणजे त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाहीं. चि. भय्यासाहेबांचं आणि तुझं जीवन सुखपूर्ण झालेलं आहे हें पाहिल्यामुळंच मी म्हणतों तसा नवा आनंद मला झाला.

तुझ्या वैनीला खरा आनंद वाटला असं मीं म्हटलं त्यालाहि कारण आहे. आईची खरी कसोटी मुलीच्या सासरीं लागते म्हणतात. सासरचीं सहानुभूति सगळ्याच मुलींना लाभते असं नाहीं. पुष्कळदां तिचं चुकतं कुठं आणि आपण तिची टर केव्हां उडवतों अशी त्यांना उत्कंठा लागलेली असते. नव्या जागेंत आणि नव्या परिवारांत मुलगी प्रारंभीं थोडीफार गांगरणार आणि तिच्या हातून थोड्या चुका घडणार हा विचारच सासरच्या मंडळींच्या डोक्यांत येत नाहीं. त्यामुळं क्षुल्लक चुकांचं अवडंबर होतं आणि 'या साध्या गोष्टीदेखील नाहीं कां आईनं शिकविल्या ?' असा शेरा मारण्यांत येतो. मुलीच्या दोषावरून आईची अक्कल निघते आणि म्हणूनच आईला मुलीच्या सासरचा खुद्द मुलीपेक्षांहि अधिक बाऊ वाटतो. तुझं सासर असं भीतिदायक नाहीं किंवा तूं आपल्या सासरच्या परीक्षेस उत्तम प्रकारें

उतरलीस या गोष्टीनं तिच्या मनावरलं मोठं दडपण दूर झालं. मग कां होऊं नये तिला खराखुरा आनंद ?

मी तुला आज पत्र लिहायला बसलों आहे, तें केवळ आम्ही सुखरूप पोंचलों व तुझ्या घरचा मुक्काम आनंददायक झाला एवढंच कळविण्यासाठीं नाहीं; तर तुझा आजचा संसार सदैव आनंदमय रहावा किंवा तो अधिकाधिक आनंदमय व्हावा यासाठीं मनांत आलेल्या एकदोन गोष्टी विसरल्या नाहींत तोंवरच तुला लिहून टाकाव्या हा आजच्या पत्राचा खरा उद्देश आहे.

चि. भय्यासाहेब तुला आज कुठं ठेवूं नि कुठं नको असं करतात. आणि आज तुलाहि भय्यासाहेबांपलीकडलं जग फारसं दिसत नाहीं. नवराबायको अशीं तद्रूप बनल्यावर सुखाला कमतरता कुठली ? पण, तुमची ही गट्टी एकमेकांच्या गुणांवर लुब्ध झाल्यामुळं झालेली नसून, केवळ नव्याच्या नवलाईमुळं तुम्ही बेहोष झालां आहां असं मला वाटतं. एकमेकांचे गुण पहाण्यास आणि पारखण्यास तुम्हांला अवधि मिळालेला नाहीं. आणखी कांहीं दिवसांनीं तारुण्याची सुरसुरी आणि नव्याची नवलाई मंदावेल आणि मग परस्परांतील गुणदोष तुम्ही पाहूं लागाल त्यावेळींहि तुझ्या ठिकाणीं भय्यासाहेबांना दोषारोप करतां येणार नाहीं अशी सावधगिरी तुला घ्यायला पाहिजे.

पहिली धुंदी ओसरल्यावर नवरा सांसारिक मनुष्य या नात्यानं बायकोकडं पहायला लागला कीं त्याला दिसून आलं पाहिजे तें हें कीं, आपली बायको उधळी नाहीं, ऐदी नाहीं आणि आपल्या सुखाविषयीं गाफीलहि नाहीं. आपली बायको आपल्या सुखासाठीं तळमळ बाळगते, आहे त्यांतच समाधान मानणारी आहे आणि नुसती सुखलोलुप नाहीं, असा विश्वास पुरुषाला हवा असतो. तसा विश्वास तुझ्याविषयीं भय्यासाहेबांना वाटला पाहिजे. त्यांच्या मनांत असा विश्वास उत्पन्न झाला म्हणजे तुझ्यावरील त्यांच्या प्रेमाला उतरती कळा लागण्याची धास्ती नाहीं.

असं वागतांना तूं अगदी लाचार होऊन राहिलं पाहिजेस असंहि नाहीं. योग्य त्या ठिकाणीं भय्यासाहेबांना दटकण्याची धमकहि तुझ्या अंगीं असली पाहिजे. परवां मित्रमंडळींच्या आग्रहामुळं भय्यासाहेबांनीं सिगारेट ओढली आणि त्याबद्दल तूं माडीवर त्यांचा निषेध केलास तो माझ्या कानांवर आला. मला तो आवडला. पण याबद्दलहि तुला सांगायला पाहिजे. निषेध करितांना कर्कश शब्द तोंडांतून निघणार नाहींत अशी सावधगिरी तूं घेतली पाहिजेस. ' तुम्हींच काय पण तेहि इथं सिगारेट ओढतील, तर त्यांना माझ्याकडून चहा मुळींच मिळणार नाहीं' असं तूं म्हणालीस, पण असं ताड् का फाड् बोलूं नये. त्याचा कदाचित् विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो. याबाबत तूं आपल्या वैनीचा कित्ता गिरव. माझ्या चुकीबद्दल ती माझे कान कसे खुबीनं उपटते तें तूं समजून घे. माझ्या अंगीं वागणुकींतला व्यवस्थितपणा आलेला आहे असं नव्हे. पण मी वाहवलों नाहीं, तो तिच्या खुबीदार विरोधामुळं हें खोटं नाहीं.

संसारदक्षतेप्रमाणं नवं आणि उपयुक्त असं कांहीतरी शिकण्याचा तूं प्रयत्न करीत रहावंस. सध्यांतरी तुला मोकळा वेळ बराच मिळूं शकेल. शिवणकाम तुला थोडंसं येतं त्याचा अधिक अभ्यास कर. काय शिकायचं तें इथं बसून सांगणं सोपं नाहीं, परंतु ज्यांत मन रमेल व ज्यापासून प्रपंच-खर्चांत थोडीतरी बचत करतां येईल अशी कोणतीहि गोष्ट तूं साध्य करून घ्यावीस.

प्रकृतीस जपून राहून वरचेवर क्षेमसमाचार कळवीत असावें. चि. रा. भय्यासाहेबांस आशीर्वाद.

*तुझा*
**दादा**

तूझय वंस भांडण करून गेल्या आस आइकल तुझ्यावरन भांडण झाल आस तूझ्या शेजरच्या वीठाबाई वाडील्या भेटल्या त्यांनी सांगितलीनी. चरंजिव बळवतरावनी भैणीस राघ भरलं आणिक संध्याकाळच्या गाडीनं दारकूआक्का चालत्या झल्या आस त्या म्हणाल्या. तेवापासन माला काळजी वाटती. तूं आपल्या वनसबरोबर भांडलीस कीं काय आषी षंका एती सासरच्या माणसांच आयकून घ्यावं त्यानी काय म्हटल तरी त्येच्या तोंडाला तोंड देऊ नवे आपलाकडून चूकल नसल मंजे झल. मूखस्थंब म्हटल तरी चालल पण त्यानि भांडखोर म्हणु नवे आस आमची आई म्हणती ते तु लक्शांत ठेव. तुझ्या पायावर वरवंठा पडला नि मुजला आस विठाबाई म्हणत होती रगतचंदन नि बिबा उघाळुन लेप लावाबा मंजे सूज बसती तुझी जिथतिथ धांदल नि गडबड आसती विळी पाटावर्वंटा पाहार असला जीनसाशी जपुन वागायला हाव चुलीजवळ आणि ष्टोजवळसुद्धा संभाळुन

*अनेक आशीर्वाद*

न्हायला पायजे माझ पत्र कुणाला दाखवु नको हासतील फाडून टाक. वाचुन झाल मंजे.

*तुझी*
वयनी

## चिरंजीव राजश्री हरिभाऊ यास अनेक आशीर्वाद. ३७

तुमचं पत्र वाचून वाईट वाटलं. तुम्हाला गृहसौख्य मनाजोगं मिळत नाहीं तें कां, याचीं तुम्हीं लिहिलेलीं कारणं मात्र मला पटलीं नाहींत. तुमची बायको उर्मट आहे आणि ती तुम्हाला उलट उत्तरं देते ही तुमची मुख्य तक्रार आहे. चि. सौ. कुसुम ही माझ्या मित्राची मुलगी असल्यानं तिच्या या उर्मटपणाबद्दल मी माझ्या मित्राला म्हणजे कुसूमच्या वडिलांना कळवावं असा मला लिहिण्यांत तुमचा उद्देश असावा. पण तो साध्य होण्यासारखा नाहीं. केवळ तुम्ही म्हणतां म्हणून मी कुसुमला दोषी ठरवायला तयार नाहीं.

रा. गोविंदराव हे माझे मित्र आहेत आणि माझ्या मध्यस्थीनं तुम्हीं त्यांचे जामात झालां आहां, मध्यस्थीचं प्रायश्चित्त म्हणूनहि हें काम माझ्या माथीं मारणार असाल, तर तें मारून घ्यायला माझी तयारी नाहीं. तुमचं लग्न जमवितांना मीं फक्त एकमेकांची एकमेकांना ओळख करून द्यायचं ठरविलं होतं आणि तुम्ही वधूपसंती आपल्या इच्छेप्रमाणं करावी व

गोविंदरावांनीं आपल्या दृष्टीनं जांवयाची निवड करावी असं स्पष्ट बजावलं होतं. तुम्ही दोघांनीं आपआपली पसंती नापसंती आपल्या जबाबदारीनं करावी असं मीं त्याचवेळीं सांगून टाकलेलं असल्यानं आतां त्या बाबतींत माझ्याकडं तक्रार करायला तुम्हांला जागा नाहीं. गोविंदरावांनीं तुमच्याविषयीं माझ्याकडं तक्रार आणली तरी त्यांनाहि मी हेंच उत्तर देईन.

या बाबतींत मला स्वतःला काय वाटतं हें मात्र मी तुम्हांला सांगणार आहे. मला गोविंदरावांच्या घरची पूर्ण माहिती आहे. आणि चि. कुसुमला मी तिच्या बाल्यावस्थेपासून पाहात आलों आहे. त्यावरून तिच्यावरील उर्मटपणाचा आरोप मान्य करायला माझं मन तयार होत नाहीं. गोविंदराव आपल्या बायकोशीं व मुलांमुलींशीं अगदीं मनमोकळेपणानं वागणारे गृहस्थ आहेत. मुलांनींहि योग्य दिसेल ते स्पष्टपणानं बोलून मोकळं व्हावं, अशी त्यांच्या घरीं पद्धत आहे. गोविंदरावांचा एखादा दोष दिसला तर तो बोलून दाखवायला सौ. रमावैनींना किंवा किशा–कुसुमला मुभा असते. क्रिकेटपेक्षां किशानं अभ्यासाकडं अधिक लक्ष द्यावं असा गोविंदरावांनीं त्याला लकडा लावला तेव्हां 'तुम्ही डॉक्टरनीं सांगितल्याप्रमाणं फिरायला जाण्याऐवजीं क्लबांत ब्रिज खेळत कां बसतां' असं त्यानं विचारलं आणि कुसुमनंहि गोविंदरावांच्या धूम्रपानाबद्दल खरमरीत टीका केलेली मीं ऐकली आहे. दुसरे कोणी मुलांच्या या स्पष्टवक्तेपणाला उर्मटपणा म्हणतील, पण मला आणि गोविंदरावांना तसं वाटत नाहीं. वडीलपणाच्या धाकानं मतप्रदर्शनाचं इतरांचं स्वातंत्र्य आणि धीटपणा मारून टाकणं इष्ट नाहीं असं आमचं मत असल्यानं त्यांच्या स्पष्टोद्गारांचें आम्हीं कौतुक केलं आहे. लहानपणापासून मुरलेला हा गुण तुमच्यापुढंहि कुसुम प्रकट करीत असेल आणि त्यालाच तुम्ही उर्मटपणा म्हणत असाल. अयोग्य दिसेल तें स्पष्ट बोलणं आणि त्याचा निषेध करणं या बायकोच्या गुणाचा तुम्हाला तरी विषाद कां वाटावा ?

तुम्ही ' करूं नको ' असं सांगितलं असूनहि ती एकादी अयोग्य गोष्ट ' करणार ' म्हणत असेल तर मात्र तो तिचा उर्मटपणा होईल. तुमची आज्ञा धाब्यावर बसवून ती चैनीच्या वस्तू विकत घेते काय ? तुम्ही नको म्हणून सांगितलं असतांहि ती चावट बायकांच्या मैफलींत गप्पा छाटीत बसते काय ? तुम्ही मज्जाव केला असतांहि ती नाटकसिनेमा पाहाते काय ? तुमचा हुकूम मोडून ती तुमच्या घरच्या कागाळ्या इतरांना सांगत सुटते काय ? असं जोंपर्यंत ती करीत नाहीं, तोंपर्यंत तिच्यावर उर्मटपणाचा आरोप तुम्हांला करतां येणार नाहीं.

ती आपल्या नणंदा–जावांना आणि बहिणी–मैत्रिणींना वरचेवर पत्रं लिहिते आणि तुमची इच्छा नसतांना भगिनी–समाजांत जाऊन तिथल्या ग्रंथालयांतून कादंबऱ्या वाचायला आणते ह्या गोष्टी तुम्ही तिच्या उर्मट-पणाच्या म्हणून सांगितल्या आहेत. पण ह्या दोन्ही गोष्टी निषेधार्ह नाहींत.. बरोबरीच्या मैत्रिणींना आणि प्रियजनांना पत्रं लिहिणं हा अपराध ठरणार नाहीं. आणि वाचनाची हौस हीसुद्धां निंद्य ठरूं शकणार नाहीं. बायकोनं नवऱ्याची आज्ञा वंद्य मानावी हें ठीक आहे. पण नवऱ्यानंसुद्धां भलतीसलती आज्ञा न करण्याची दक्षता घ्यायला नको काय ? ' मी दारू पिणार आणि तूं पेला भरून दिला पाहिजे ' असा नवऱ्यानं हुकूम फर्मावल्यास ' मी पेला तर भरून देत नाहींच, पण तुम्हाला दारूहि पिऊं देणार नाहीं ' असं बायकोनं उत्तर दिलं तर तो तिचा उर्मटपणा न ठरतां, चुकणाऱ्या नवऱ्याला सावरून घेण्यासाठीं स्वीकारलेला खंबीरपणाच ठरेल. म्हणून मला सांगावसं वाटतं कीं कुसुमवर उर्मटपणाचा आरोप करण्यापूर्वी तुम्ही स्वतः अयोग्य अशा ताकिदी तिला देतां कीं काय हें पाहिलं पाहिजे. आपण चुकणं शक्य नाहीं आणि जरी आपण चुकलों असलों तरी बायकोनं त्याविरुद्ध ब्रहि काढतां कामा नये, अशी नवरेशाही तुम्ही गाजवूं लागलां, तर तुम्हांला

सुखाची आशा नाहीं. समजा, कुसुमऐवजीं तुमच्या हो ला हो देणारी बायको तुम्हांला मिळाली असती तरी तुम्ही सुखी होऊं शकलां नसतां. ती अगदीं शेळपट आहे, तिला स्वतःची अशी अक्कलच नाहीं असं रडगाणं तुम्ही गायिलं असतं. दोषैक दृष्टीनं पाहाणाऱ्याला कोणतंच मनुष्य चांगलं दिसत नाहीं; तुम्हांला तुमची बायको समाधानकारक दिसत नाहीं. याचं कारण माझ्या मतें हें आहे. बायकोचं सुख तुम्हांला मनमुराद पाहिजे असेल तर तिच्याकडं पाहायची तुमची दृष्टी निवळली पाहिजे. जोडीदाराचे गुण पाहून त्यांचा जास्तींत जास्त फायदा घ्यायचा असं धोरण ठेवलं तर तुम्हांला कुसुमसारखी बायको लाभल्याबद्दल धन्यता वाटेल. तुम्हाला तशी वाटावी असं मी इच्छितों.

चिरंजीव सौ. कुसुमताईस आशीर्वाद.

तुमचा

दादा

## चि. सौ. ताईस अनेक आशीर्वाद. ३८

तुझं पत्र पोंचलं. चि. राजेश्री बळवंतराव महिनाभराच्या फिरतीवर गेले आहेत. आणि तिथं एकटं राहण्यापेक्षां, या मुदतींत इकडे येण्याची तुझी विनंती त्यांनीं मान्य केली नाहीं, यामुळं तूं रंजीस झालेली दिसतेस. तुला एकटीला करमत नाहीं म्हणून आम्हीं दोघांनीं तुझ्याकडं रहायला यावं अशी तुझी इच्छा आहे. पण आम्हांला यावेळीं तिकडं येतां येण्यासारखं नाहीं.

इथं आमचं कांहीं काम आहे, त्यामुळं आम्ही इथं अडकून पडलों आहे असं नव्हे. कुठंहि जायला यायला आम्हांला मोकळीक आहे; तरीदेखील ज्या कारणासाठीं तूं आम्हांला बोलावलं आहेस त्या कारणासाठीं आम्हीं तिकडं येणं मला प्रशस्त वाटत नाहीं. एकटं रहाणं कंटाळवाणं वाटणारच. पण हा कंटाळा टाळण्यासाठीं दुसऱ्या माणसांना गोळा करणं, हाच एक उपाय आहे असं नाहीं. दुसरीं माणसं, हांका मारलीं कीं धांवून यावं,

इतकीं मोकळीं नेहमींच असतील असं नाहीं. म्हणून त्यांच्यावांचूनहि आपलं मन रमवतां आलं पाहिजे.

रिकामपणांत एकटेपणा त्रासदायक होतो म्हणून सहसा रिकामं रहायचं नाहीं अशी खबरदारी तूं घे. कसच्या ना कसल्या कामांत स्वतःला गुरफटून घे. त्या कामाच्या नादांत तुला आपल्या एकटेपणाची आठवणच रहायची नाहीं. याचं एक उत्तम उदाहरण तुला सांगतां येईल. पण सांगायला पाहिजेच कशाला? तुला तें माहीत आहे. मी फिरतीवर गेल्यावर तुझी वैनी काय करीत असे, याची आठवण कर. सांडगे, पापड, गव्हले, शेवया असलीं कामं अशा वेळीं निघायचीं. प्रपंचांत प्रसंगोपात लागणाऱ्या गोष्टी, फुरसतीच्या वेळी तयार करून ठेवायची जुन्या बायकांची ही रीत तुम्हीं आजच्या मुलींनींहि शिकण्यासारखी आहे. यांत प्रापंचिक सोय तर आहेच, पण एकटेपणा नाहींसा करण्याचं कामहि आयतं साधतं. या कामानिमित्त शेजारपाजारणी आणि मैत्रिणी एकत्र येतात आणि सुखदुःखाच्या गोष्टींत मन रमवितां येतं. आमच्या आईच्या वेळची मला आठवण आहे. अशा कारणांनीं एकत्र आलेल्या बायकांचा गाणीं म्हणायचा एक कार्यक्रम हमखास असे. हातानं काम चालूं असतांना त्या गाणीं म्हणत. एकेक बायको वेळेला पांचपांच गाणीं म्हणून त्या सभेला रंग आणीत असे. तुम्हां अलीकडल्या मुलींत संगीताची आवड वाढत्या प्रमाणावर आहे असं म्हणतात, पण 'म्हण' म्हटल्यावर एखादीच मुलगी एखादं गाणं म्हणते. बाकीच्या 'आम्हांला नाहीं येत' असं उत्तर देतात. जुन्या बायका एकत्र जमल्यावर प्रत्येकजण एक तरी गाणं म्हटल्यावांचून रहायची नाहीं. पण गाण्याबद्दल लिहायचं हा माझ्या पत्राचा खरा उद्देश नाहीं. प्रेमाचं कुणीतरी माणूस जवळ असल्यावांचून आनंदांत राहतां येत नाहीं ही समजूत तूं मनांतून ताबडतोब काढून टाकावीस यासाठीं मीं हें पत्र लिहायला घेतलं आहे. दहा माणसांच्या

समुदायांत कोणाचाहि वेळ मजेंत जाईल; पण एकटं रहायची वेळ आली तरीहि आनंदांत राहतां आलं पाहिजे. तूं, आपल्या घरीं जातांना वाटेंत बारीक स्टेशनं लागतात, कित्येक स्टेशनं डोंगरांत असतात आणि तिथं स्टेशनमास्तर आणि पोर्टर यांच्यावांचून कुणाचंच घर नसतं. अशा स्टेशनवर कोणी मद्रासी स्टेशनमास्तर असतो. त्याच्या बायकोचा एकलकोंडेपणा लक्षांत आण. परमुलुखांत आलेली ती मुलगी. इथली भाषा समजत नाहीं, नवरा बारा तास स्टेशनांत अडकलेला. कसा जात असेल तिचा वेळ? पण अशा स्थितींतहि ती आनंदानं कालक्रमणा करितांना दिसते. आमच्याच स्टेशनवर कांहीं दिवसांपूर्वी अशी एक मद्रासी मुलगी आलेली मला आठवते. आपल्या कोठडीच्या दारांत ती हंसतमुखानं उभी असलेली पुष्कळदां दिसायची. वर्षभरच असेल ती इथं, पण तेवढ्या अवधींत ती मराठी छान बोलायला शिकली, इकडच्या पांचचार मैत्रिणीहि तिनं जोडल्या. त्या मुलीपेक्षां तरी तुझी स्थिति अवघड नाहीं ना? आहे त्या परिस्थितींत आनंद उत्पन्न करतां आला पाहिजे हेंच माझं मुख्य सांगणं.

चि. बळवंतराव परत येतील तेव्हां तुझ्या घरांत त्यांना कांहींतरी नवं दिसलं पाहिजे. त्यांना तसं काय दिसणार आहे हें सवडीप्रमाणं लिही

आम्ही खुशाल आहों. तुझं खुशालीचं पत्र नेहमींप्रमाणं येईल हे आशीर्वाद.

*तुझा*

**दादा**

*चिरंजीव सौ. माईस अनेक आशीर्वाद.* ३१

तुझं पत्र पोचलं. तुमची खुशाली कळल्यानं आनंद वाटला. तुझे थोरले भाऊजी आणि जाऊबाई येऊन गेल्यामुळं तुमचे चार आठ दिवस आनंदांत गेले आणि त्यांच्या छोट्या लताला तुझा भारी लळा लागला, इत्यादि मजकूर वाचून आम्हांला फार आनंद झाला. लताला तूं पायमोजे विणून दिलेस आणि जातांना ती तुझ्याकडून आपल्या आईकडंहि जाईना, त्या वेळचा देखावा पाहाण्यास आम्ही तिथं असतों तर किती बरं झालं असतं असं मला वाटलं. या एकंदर हकीकतीवरून सासरच्या परिवारांत तुला एक ममताळू मैत्रीण तूं पैदा केलीस असं मला समजून चुकलं. ही मैत्रीण म्हणजे तुझ्या जाऊबाई. त्या लेकुरवाळ्या आहेत आणि कोणत्याहि लेकुरवाळ्या बाईला आपल्या मुलाचं कोडकौतुक करणारीं माणसं आवडतात. तुझ्या जाऊबाईंना तूं सिनेमाला घेऊन गेलीस, तुझ्या रावजींनीं आपल्या वैनीला ब्लाऊजचं रेशमी कापड घेतलं या गोष्टींनीं जितका आनंद वाटला

असेल, त्याहून दसपट आनंद रावजींनीं आणि त्यांच्यापेक्षांहि तूं लताचे खूप लाड केले त्यामुळं झाला असेल. वडील जावा सासूनणंदांप्रमाणंच नव्या जावेकडं संशयित नजरेनं पाहात असतात. आणि तिच्याबद्दल त्यांचं एकदां झालेलं चांगलं किंवा वाईट मत दीर्घकाल टिकून राहतं. तूं पहिल्याच गांठीभेटींत आपल्या वडील बाईचा लोभ संपादन केलास यामुळं तुझ्या घरांत तुझी पाठराखण करणारी एक खात्रीची मैत्रीण निर्माण झाली. आतां त्या तुझं अनेक प्रकारें कसंकसं कौतुक करतील तें पहा.

चि. रावजीना बढती मिळाली आणि दोन महिन्यांच्या पगाराइतका बोनस मिळाला ही आनंदाची गोष्ट आहे. पण या आनंदाबरोबर मला माझी पूजाहि बांधून घ्यावी लागली. रावजींनीं या जादा प्राप्तीचा विनियोग तुला नव्या फॅशनचे मोत्याचे बिलवर घेण्याकडं केला, हें पाहून तुझी वैनी आनंदानं बेहोष झाली. जांवयानं केलेलं लेकीचं कौतुक यापेक्षां आईच्या अंतःकरणाला आल्हाद देणारी दुसरी कोणतीच गोष्ट नसेल. विश्वविद्याल-यांच्या परीक्षकांनीं रावजींना कोणता वर्ग दिला असेल तो असो, पण त्यांना सासूबाईकडून अगदीं फर्स्टक्लास फर्स्ट मिळाला याबद्दल त्यांचं अभि-नंदन केलं पाहिजे. जांवयाला फर्स्टक्लासांत पास केल्याबद्दल मी सासू-बाईना नांवं ठेवीत नाहीं. परंतु याच वेळीं त्यांनीं मला फडतुसांत काढलं याबद्दल माझी तक्रार आहे. रावजींप्रमाणं मला हौस नाहीं आणि शक्य होतं तेव्हांसुद्धां मीं तिच्या हौसेची कधीं विचारपूस केली नाहीं, असा तिनं माझ्यावर शेरा मारला आहे. असले शेरे आतां माझ्या पूर्णपणें अंगवळणीं पडले आहेत, आणि एका कानानं ऐकून दुसऱ्या कानानं ते बाहेर सोडा-यची मला संवयहि झालेली आहे. पहिल्या खेपेस टोंचलेल्या देवी फुगतात, ठणकतात, पण वारंवार त्या टोंचल्यावर त्या वेळेपुरतं कातडं खरवडल्या-सारखं होण्यापलीकडं कसलाच त्रास होत नाहीं. त्यांतलंच हें.

तुझ्या पत्रांतली तिसरी गोष्ट मात्र बरोबर झाली नाहीं असं मला वाटतं. चि. लताच्या बोटांतली दोन माशाची अंगठी हरवली आणि ती तुझ्या घरीं कामास असलेल्या रंगूबाईनंच काढून घेतली असेल या संशयामुळं तुम्ही तिला कामावरून काढली, यांत तुमची घाई झाली आणि कदाचित् एका गरीब स्त्रीवर अन्याय झाला असण्याचाहि संभव आहे. आपल्या हौसेखातर आया अजाण लेंकरांच्या अंगावर दागदागिने घालतात. ते सांभाळण्याची अक्कल आणि शक्ति त्यांना नसते. अंगावरल्या दागिन्यांची त्यांना दखलहि नसते. ते अंगावर असले म्हणून जसा त्यांना आनंद नाहीं, तशी ते अंगावरून दूर झाल्याबद्दल खंतहि नाहीं. दागिन्यांच्या जपणुकीसाठीं मुलं आपली धांवपळ आणि हिसडाहिसडी कधींच थांबविणार नाहींत. अगदीं छोट्या बालकांच्या हालचाली ठेवल्या जागेपुरत्या मर्यादित असतात असं वाटतं पण तसं नसतं. लहानापासून थोरांच्या कडेखांद्यावरून तीं मुलुखभर मिरवून येतात. अशा वेळीं त्यांच्या गळ्यांतले आणि हातापायांतले दागिने गळून पडतात. ' लहान मुलाचा एक दागिना सांपडला आहे. ओळख पटवून घेऊन जावें ' अशा सूचना इथल्या प्रसिद्धीफलकावर वारंवार लागतात, हें तूंहि पाहिलं आहेस. मला सांगायचं आहे तें इतकंच कीं, मुलांचे अलंकार नाहींसे होतात ते चोरीमुळंच होतात असं नाहीं. बहुतेक वेळीं ते सहजगत्या आणि न कळत गळून पडत असतात. तुमच्या लतेची अंगठीहि अशी गळून पडली नसेल कशावरून ? ती रंगूनंच काढून घेतली याबद्दल तुझी खात्री कशावरून झाली ? तुझी खात्री झालेली नाहीं. कारण संशयावरून कमी केल्याचं तूंच लिहिलं आहेस.

गडीमाणसांत कांहींजण हातचलाखी करणारीं असतात. परंतु पुष्कळ प्रामाणिक माणसंहि असतात. माझा अनुभव असा आहे कीं, अशा माणसांत प्रामाणिक माणसांचं प्रमाण लबाडांपेक्षां कितीतरी मोठं असतं. मनुष्य सहसा

लुच्चेगिरी करीत नाहीं. त्याला अब्रूची चाड असते आणि थोडक्याशा फायद्यासाठीं अब्रू गमावून बसायची त्याची छाती होत नाहीं. आमच्या कचेरींत मागं भिवा नांवाचा एक कामाठी होता. एकदां आमच्या बरोबरीच्या एका कारकुनाचं पाकीट हरवलं. आपण तें आदले दिवशीं कचेरींतच विसरून गेलों आणि तें सकाळीं झाडलोट करणाऱ्या भिवा कामाठ्यानं लांबविलं, असा त्यांनीं वहीम घेतला. भिवानं शपथेवर आपल्याला माहीत नसल्याचं सांगितलं पण गरीबाच्या शब्दांवर विश्वास ठेवायला ते कारकून व आमचे मुख्य कारकूनहि तयार होईनात. भिवानं पाकीट तावडतोब आणून दिलं नाहीं तर त्याला पोलीसच्या स्वाधीन करण्याची धमकी देण्यांत आली. आपण निष्कारण चोर ठरणार या धास्तीनं भिवाला ताप भरला आणि 'देवाशपथ मीं चोरी केली नाहीं' असं तो वातांत बडबडत होता. पुढं चार दिवसांनीं कारकूनसाहेबांचं पाकीट त्यांच्याच घरीं सांपडलं. कपडे परटाकडं देतांना त्यांनींच तें काढून ठेवलं होतं आणि कुठं ठेवलं तें त्यांना आठवत नव्हतं. शेल्फावरील दोन पुस्तकांच्या मधें तें त्यांच्या सौभाग्यवतीला दिसलं. असंच पुष्कळदां होतं. म्हणून लोकांवर गुन्हेगारी लादण्यापूर्वीं खात्री करून घ्यायला पाहिजे. तुझ्या रंगू मोलकरिणीनं यापूर्वीं कधीं चोरी केली होती का? आणि ती तुम्हीं धरली होती का? तसं असेल तर तिच्यावर तुम्हीं घेतलेला संशय क्षम्य ठरेल. पण तिच्या वर्तनाबद्दल यापूर्वीं तुम्हांला नांव ठेवायला जागा नसतांना आजच तिला चोरीच्या संशयामुळं शासन करणं मला तरी रास्त वाटत नाहीं. गरीब नोकरमाणसांशीं ममतेनं आणि सहानुभूतीनं वागायला शिकलं पाहिजे. त्यांचा अपराध निर्विवाद सिद्ध झाला तरी क्षमा केली पाहिजे. क्षमेचा दुरुपयोग झाला आणि अपराधाची उजळणी झाली तर शासन खुशाल करावं. पण केवळ त्यांची गरीबी हीच गुन्हेगारी समजून त्यांच्यावर हात उगारणं हा मला तरी शुद्ध क्रूरपणा

वाटतो. तुमच्याकरवीं असा क्रूरपणा घडला असेल तर तुम्हीं तो धुवून काढला पाहिजे. योग्य असेल तें तुम्ही कराळच. तुम्ही आपल्याकडून निरपवाद रहाणें हे आशीर्वाद.

*तुमचा*
दादा

## चिरंजीव रावजींस अनेक आशीर्वाद. ४०

तुमचं पत्र पोहचलं. चि. सौ. माईस बापूरावानं बोलावलं होतं. परंतु तुम्हीं त्यांना नकार दिला असं त्याच्या पत्रावरून कळलं. बापूरावानं माईस बोलावलं याबद्दल तुम्ही त्याला अप्रत्यक्षपणें दोषच दिला आहे. आणि बायकांना वरचेवर माहेरीं बोलावून नेलं तर त्यांना आपल्या घरची आस्था कशी निर्माण होईल, असं पोक्तपणानं विचारलं आहे, असंहि त्यानं लिहिलं आहे.

तुमच्या या पत्राला चि. बापूरावानं उत्तर 'दिलं कीं नाहीं आणि दिलं असेल तर काय दिलं आहे याची मला कल्पना नाहीं. तोहि तुमच्यासारखाच तरुण आहे व तुमच्यासारखाच तापटपणा त्याच्याहि अंगीं असल्यास आश्चर्य नाहीं. त्याच्या उत्तरांत एकादा चिमटा तुम्हांला काढलेला असेल तर तुम्ही त्यास फिरून दोन चिमटे काढायला सिद्ध व्हाल, पण असं होणं इष्ट नाहीं. तुम्हांला कांहीं भलतंसलतं लिहूं नये असं मीं तुमच्याप्रमाणं त्यालाहि सुच-

वून ठेवलं आहे. शब्दानं शब्द वाढतो व त्यांतूनच स्नेहसंबंधांत बिघाड निर्माण होतो. यासाठीं वेळींच सावध राहिलं पाहिजे.

चि. सौ. माईनं वरचेवर माहेरीं जाऊं नये असं तुम्हांला वाटलं तर तें स्वाभाविकच आहे. पण खरोखरीच कां ती माहेरीं फार जाते? तुमचं लग्न होऊन आतां दोन वर्षं होत आलीं. या मुदतींत ती फक्त दोनदांच इकडं आली आणि तीहि एकदां पंधरा दिवस आणि एकदां महिनाभर इथं राहिली. गेल्या नवरात्राच्या वेळीहि ती पंधरा दिवस इथं राहिली, पण तिची ही खेप माहेरांत जमा होऊं शकणार नाहीं. तुम्हांला फिरतीवर जायचं होतं आणि तिनं तिथं एकटं राहणं तुम्हांला ठीक वाटलं नाहीं म्हणून तुम्हींच तिची इकडं रवानगी केली. परंतु ही बाब सोडली तरी दोन वर्षांत जास्तींत जास्त दोन महिने ती माहेरीं राहिली. आणि बावीस महिने ती आपल्याच घरीं होती. बावीस महिन्यांच्या वास्तव्यानं आपल्या घराविषयीं तिच्या मनांत जी आस्था उत्पन्न झाली असेल, ती दोन महिन्यांच्या गैरहजेरीमुळं नाहींशी होईल अशी भीति मला तरी वाटत नाहीं. तुमच्या मनांतहि ही भीति खरो-खर नसावी. दुसरें कांहीं निमित्त तिला न पाठविण्यास असावं पण लिहितां येत नसल्यामुळं तुम्हीं हें आस्थाप्रकरण पुढं केलं असावं.

तुमचा खरा उद्देश तुम्हांला सांगतां येण्यासारखा नसला तरी मला तो हेरतां येतो. आपली बायको आपल्यापासून होतां होईतों दूर जाऊं नये ही तुमच्या मनाची खरी इच्छा आहे. तरुणपणीं अशी ओढ असायचीच. नसेल तरच आश्चर्य. स्त्रीसहवासाचा तुमचा हा हव्यास कौतुकास्पद वाटतो. तरी पण तुम्हांला एक गोष्ट सांगावीशी वाटते. परस्पर सहवासांतलं स्वारस्य टिकवून ठेवायचं असेल, तर मधुन मधुन त्यांत खंड पाडला पाहिजे. रोजचं मिष्टान्नभोजनहि कंटाळवाणं होतं. दिवाळी चार दिवसांचीच, पण तेव-ढ्यांतसुद्धां झुणका–भाकरी कधीं मिळेल असं होऊन जातं एकेकांना. आप-

ल्यांत उपास करण्याची पद्धत आहे, त्यांतला धार्मिकपणा आपण सोडून देऊं. उपवासानं पचनशक्तीवर बसलेला ताण कमी होतो आणि क्षुधा प्रदीप्त होते, हा लाभ लक्षांत घेण्यासारखा खचित आहे. कोणत्याहि सुखाचं असंच नाहीं कां ? तें रोज रोज मिळालं म्हणजे त्याची मातबरी वाटेनाशी होते. अतिपरिचयादवज्ञा ही म्हण तुम्ही जाणतांच. म्हणून म्हणतों कारण-परत्वें होत नसेल तर मुद्दामसुद्धां पतिपत्नींनीं थोडासा विरह अधुनमधुन जुळवून आणावा.

माझ्या म्हणण्याचा अनुभव घेऊन पहा म्हणजे सत्यता तुम्हांला पटेल. जास्ती नको, फक्त आठच दिवस चि. सौ. माईला बापूरावाकडं पाठवावी आणि नववे दिवशीं तिला उतरून घ्यायला स्टेशनवर जातांना तुमचं मन किती उल्हसित होतं तें पाहावं. माझे मानसशास्त्राचा अभ्यास केलेले एक मित्र आहेत. ते म्हणतात, तरुण प्रेमिकांना प्रत्यक्ष सहवासांत जितका आनंद अनुभवतां येतो, त्याहून परस्परांच्या वाटेकडं डोळे लावून बसण्यांत होतो. प्रत्यक्ष प्राप्तीपेक्षां उत्कंठा अधिक रुचकर असते असं त्यांचं म्हणणं आहे.

चि. सौ. माईची रवानगी कोणते दिवशीं करणार तें चि. बापूरावास कळवा म्हणजे तो स्टेशनवर हजर राहून तिला उतरून घेण्याची व्यवस्था करील. आणखी एक गोष्ट तुम्हांला सांगतों. बापूरावानं तुम्हांला ही शिक्षा दिली आहे असं तुम्हांला वाटत असेल, तर तुम्हीहि एकदां अशीच शिक्षा त्याला द्या म्हणजे फिटंफाट होईल.

चि. सौ. माईस आशीर्वाद.

तुमचा
दादा

तुझं पत्र वाचून अतिशय आनंद वाटला. आपल्या लोकांत, विशेषतः तुम्हा बायकामंडळींत अजूनसुद्धां व्रतवैकल्याविषयीं बरंच प्रेम दिसतं. चातुर्मासांत तुम्ही कसला ना कसला नेम करतां. या व्रतवैकल्यापासून कोणतं पुण्य लागत असेल तें असो. पण त्याचं प्रत्यक्ष फळ कांहीं दिसत नाहीं. शरीरकष्ट आणि द्रव्यदंड तेवढा थोडाफार सोसावा लागतो. पण आतां तूं जें हें नवं व्रत स्वीकारलं आहेस, त्याची फलप्राप्ति स्पष्ट दिसते आहे. तुझं पत्र तुझ्या सखू मोलकरणीच्या हस्ताक्षरांत वाचतांना मला किती समाधान वाटत होतं म्हणून सांगूं? सखू चांगली तिशी उलटून गेलेली पोक्त बाई आहे, हें वाचून तर मला मनस्वी कौतुक वाटलं. एवढी मोठी बाई आधीं शिकायला तयार झाली हेंच आश्चर्य! पाटीपेणसल घेऊन अ आ गिरवायला बसतांना ती लाजली असेल, तिनं आढेवेढे घेतले असतील. "काय करायचंय मला लिवायला शिकून, आमासारख्यास्नी काय

येनार दगड " असं ती म्हणाली असेल. सखू आतां पत्र लिहिण्याइतकी तयार झाली याचं आश्चर्य वाटण्यापेक्षां तूं तिला शिकायला तयार केलंस याचं मला खरं आश्चर्य वाटतं. कसंहि असो, तूं एका निरक्षर बाईला साक्षर केलंस आणि साक्षरताप्रसाराचं देशकार्य अल्पांशानं कां होईना तुझ्या हातून घडलं याबद्दल मी तुला मनापासून धन्यवाद देतों.

आतां तुझं हें व्रत अखंडपणें पुढंहि चालू राहावं अशी माझी इच्छा आहे. सखू लिहायला वाचायला शिकली. पण तिला वाचायची गोडी लावायचं कामहि तुला केलं पाहिजे. ही गोडी लागली तरच तिनं पैदा केलेली ही विद्या शाबूत राहील. नाहींतर शिकलेली विसरून जायचाहि संभव आहे. करतां सखूकडून तूं नियमानं वाचून आणि लिहून घेत राहा. पांच दहा मनोरंजक पुस्तकं तूं तिच्याकडून वाचून घे. मग तीच तुझ्याकडं नव्या पुस्तकाची मागणी करायला लागेल आणि मगच तूं लावलेला दिवा नंदादीपासारखा सतत तेवत राहील. नाहींतर सांजवातीसारखा घटकाभर लुकलुकून विझून जाईल. आज मीं तुझ्या नांवें पांच रुपयांची मनीऑर्डर केली आहे. त्याचीं छोटीं छोटीं गोष्टींचीं पुस्तकं घे आणि तीं सखूकडून वाचून घे. मीं पैसे पाठविले ते तुझ्यापाशीं पैसे नाहींत आणि तूं ते खर्च केले नसतेस म्हणून पाठविले नाहींत. पण पंढरपूरला चाललेल्या माणसा-पाशीं, ज्यांना जातां येत नाहीं अशीं माणसं दोन दिडक्या देऊन आपला माळबुक्का पांडुरंगाला व्हायला सांगतात, त्यांतलंच हें. दुसऱ्यानं महापूजा बांधली असली तरी आपलं तुळशीपत्र देवाला वहायची इतरांची इच्छा असतेच. तूं चालविलेल्या विद्यादानांत आपलं असं चिमुटभर असावं याहून पैसे पाठविण्यांत माझा दुसरा हेतु नाहीं.

तूं हें काम अखंडपणें चालूं ठेवावंस असं मीं म्हटलं, यावर तूं म्हणशील, " माझी एक मोलकरीण तिला शिकवलं पुष्कळ झालं. नव्या विद्यार्थिनी

हुडकायला कुठं जाऊं मी ? पण तुला विद्यार्थिनींचा तुटवडा कधींच पडणार नाहीं. सखू तुझी जाहिरात उत्तम प्रकारे करील आणि सखूला झालेला फायदा प्रत्यक्ष दिसल्यावर तिच्या सोबतिणी आपण होऊन "आम्हाला शिकवा" म्हणून येतील.

सखूचं हें उदाहरण पाहून माझ्या मनांत एक कल्पना येत आहे. तूं आपल्या भगिनीसमाजांत हा विषय काढ आणि तुझा अनुभव समाजांतील सर्व भगिनींना सांग. आणि सर्व भगिनींनीं आपल्या घरच्या मोलकरणीला, दूधवालणींना, कोणा ना कोणा एका तरी बाईला साक्षर करावं असा ठराव करून घे. घरांघरांतून असा साक्षरताप्रसार होऊं लागला तर केवढं देशकार्य होईल. बघ प्रयत्न करून. सर्व भगिनींना तुझी ही सूचना पटेलच असं नाहीं. कांहीं जणी तुझं हें वेड आहे असं म्हणून त्याची टिंगलहि करतील. पण असं झालं तरी तूं नाउमेद होऊं नको. कांहींनीं टिंगल केली तरी कांहीं कौतुकहि करतील. पन्नास सभासदांतल्या पंचवीस जणी कौतुक करतील पण स्वतः कांहीं काम करायचं त्यांना जमणार नाहीं. त्यांतल्या पांच जणीच तें करायला सिद्ध होतील. तरी देखील थोडं नाहीं. पांच जणींनीं पांच निरक्षर बायकांना साक्षर केलं तरीहि पुष्कळ झालं.

मात्र हें काम करतांना आपल्या संसाराकडं दुर्लक्ष होतां कामा नये, असं तुला आधींच सांगून ठेवावंसं वाटतं. सार्वजनिक कार्याची गोडी लागली कीं त्यांतच वाहून जायला होतं. अगदीं न कळत होते ही गोष्ट. आणि तसं झालं म्हणजे आवश्यक अशा प्रापंचिक गोष्टी मागं पडतात. तुझी मुख्य भूमिका गृहिणीची आहे. ती चोखपणें पार पाडून मग इतर उपयुक्त कार्याकडं वेळ व शक्ति खर्च केल्यास त्याचं कौतुक होईल. नाहींतर उलट प्रकार होईल. तुझं घर सोज्वळ, नीटनेटकं राहिलं पाहिजे आणि चीजवस्त व्यवस्थित व ददात न भासेल अशी सज्ज ठेवली पाहिजे. कामावर जातांना

भय्यासाहेबांनीं प्रसन्न मनानं गेलं पाहिजे व कामावरून दमून भागून परत आल्यावर त्यांना घरचं वातावरण प्रसन्न दिसलं पाहिजे. अद्यापि तुझ्या संसारांत आणखी कोणाचा समावेश झालेला नाहीं म्हणून त्यांच्याबद्दल लिहिण्याची आवश्यकता नाहीं. आपण सार्वजनिक कार्यकर्त्या पुष्कळ पाहातों. परंतु त्यांतल्या बऱ्याच जणींचे संसार यथा तथाच चाललेले दिसतात. त्यांच्या नवऱ्याला आणि मुलांलेकरांना संपन्नता असूनदेखील दैन्य भोगावं लागतं. नवऱ्याला वेळेवर जेवण मिळत नाहीं आणि मुलांची खाण्यापिण्याच्या अनियमितपणामुळं व औषधपाण्याच्या हेळसांडीमुळं केविलवाणी अवस्था होते. अशा समाजसेविकांच्या समाजसेवेचं कौतुक होण्याऐवजीं हसंच होतं. आपली मुख्य भूमिका कोणती आणि दुय्यम कामं कोणती याची अचूक जाणीव नसल्यामुळं हें असं होतं. “आधीं नेटका प्रपंच आणि नंतर परमार्थ” हा उपदेश प्रापंचिकांनीं सदैव स्मरणांत ठेवला पाहिजे.

चि. रा. भय्यासाहेबांस आशीर्वाद.

तुझा
दादा

## चि. सौ. ताईस अनेक आशीर्वाद. ४२

सौभाग्यवतीस तुझं पत्र पोचलं. मींहि तें वाचलं. तिचं तूं विचारलेल्या प्रश्नाला काय उत्तर आहे तें सांगण्यासाठीं मी हें पत्र लिहीत असलों तरी या बाबतींत मला काय वाटतं तेंहि मी सांगणार आहे. तूं मला प्रश्न विचारला नसतांना मी उत्तर कशासाठीं द्यावं असं तुला वाटलं तर वाटूं दे.

तुझ्या मामेसासूबाई परवां येऊन गेल्या आणि त्यांनीं तुला चातुर्मासांत कसला तरी नेम करायला बजावून सांगितलं आहे, कोणता नेम धरावा याबद्दल तूं आपल्या वैनीचा सल्ला विचारला आहेस. तिचं म्हणणं एवढंच आहे कीं, घरच्या माणसांच्या डोळ्यावर न येईल व आपल्या प्रकृतीला मानवेल असा कोणताहि नेम करावा. त्या नियमाच्या पूर्ततेसाठीं यजमानाकडं खर्चाची मागणी करावी लागूं नये आणि उपासतापासानं किंवा अमुक खायचं नाहीं नि तमुक खायचं अशा प्रकारानं अंगांतली तरतरी गमावून बसूं नये. एकाद्या पोथींतला रोज एक अध्याय वाचावा, तुळशीला अष्टोदशें

प्रदक्षिणा घालाव्या, मुद्दाम बाजारांत जावं न लागतां रोजच्या शिधासामुग्रींतून जमेल त्या पदार्थाचा वाटेल तर देवाला नैवेद्य दाखवावा अशा तिच्या सूचना आहेत.

माझं मत मात्र यांपैकीं एकादी गोष्ट तूं करावीस असं नाहीं. अशा गोष्टी करून जें पुण्य लागतं त्यामुळं दुसऱ्या जन्मांत सुख मिळतं, किंवा मनकामना सफल होतात अशी पुष्कळांची भोळी समजूत असते. माझी तशी नाहीं. म्हणून आपण सध्यां जो जन्म उपभोगीत आहों, तोच आनंदमय कसा होईल या दृष्टीनं जें कांहीं करायचं असेल तें करावं असं माझं मत आहे.

नेमधर्मानं पाप नाहींसं होतं, आत्मशुद्धि होते ही गोष्ट खरी आहे. मनुष्य हा स्वैर वृत्तीचा प्राणी आहे. त्याला कसलंहि बंधन नको. यामुळं निरुपाय झाला तरच तो हातपाय हालवतो. इच्छा असूनदेखील त्याच्या हातून सत्कार्य घडत नाहीं. पण नेमाचा लकडा लागल्यावर पाप लागेल या भयानं तरी तो एकादी गोष्ट अखंडपणें करीत राहतो. संवयीनं ती अंगवळणी पडते आणि सुरवातीस तिचा बाऊ वाटला तरी पुढं तिचं कांहीं वाटेनासं होतं. माझ्या मतें नेमाचा खरा उपयोग हा आहे. म्हणून तूं नेम अवश्य कर. पण तो नेम असा असूं दे कीं त्यामुळं एकाद्या सत्कार्याची तुला कायमची चटक लागावी.

पोथींतला अध्याय वाचण्यापासून तुझा वाचायचा सराव वाढेल आणि त्यांतल्या अद्भुत चमत्कारांनीं तुला घटकाभर गंमत वाटेल. लहानपणीं तुमच्याकडून मीं बहुतेक पोथ्या वाचून घेतल्या असल्यानं या वाचनांत तुला नावीन्य वाटणार नाहीं. म्हणजे या वाचनापासून तुला कांहीं लाभ होईल असं म्हणतां येणार नाहीं. देव आणि भक्तांच्या अद्भुत लीला रोज रोज वाचून तुझ्या अंतःकरणांत बावळट भाविकपणा निर्माण होण्याची भीतीच अधिक आहे. वाचनावर माझा मुळींच आक्षेप नाहीं. पण वाचन

हें मार्गदर्शक आणि ज्ञानवर्धक असावं. ज्यामुळं आपण नवीन कांहींतरी शिकलों असं समाधान वाटेल असं वाचन तूं अवश्य करावंस. वाचलेल्या भागांत जें नवं शिकायला मिळेल त्याचं टिपण करावं आणि फिरून उजळणी करावी.

स्वतःप्रमाणं दुसऱ्यासाठींहि वाचण्याचा नेम तुला करतां येण्यासारखा आहे. ज्यांना वाचनाची आवड आहे, पण ज्यांना कोणत्या ना कोणत्या कारणामुळं वाचतां येत नाहीं त्यांना वाचून दाखवायचं कामहि तुला करतां येईल. आपल्या शेजारीं बापटसाहेब राहात होते हें तुला आठवत असेल. वृद्धापकाळामुळं दृष्टि मंदावली पण त्यांची वाचनाची भूक शमली नाहीं. म्हणून एका विद्यार्थ्याला फी पुस्तकांपुरते पैसे देऊन ते रोजचीं वर्तमानपत्रं आणि मासिकं वाचवून घेत. तुझ्या आजूबाजूस अशीं माणसं असतील, त्यांच्या उपयोगी तुला पडतां येईल. भक्तिविजयाच्या अध्यायापेक्षां हें वाचन तुला आणि दुसऱ्यांनाहि आनंददायक वाटेल.

प्रदक्षिणांपासून लाभ काय होणार तेंच मला कळत नाहीं. एक मैलभर चालल्याचा व्यायाम होईल पण तुझ्यासारख्या तरण्याताठ्या मुलीला हा व्यायाम खिजगणितींतलाहि वाटणार नाहीं. चि. बळवंतराव पहाटे फिरायला जातात असं तूं एकदां लिहिलं होतंस. त्यांचा हा क्रम अद्यापि चालूं असेल तर तूंहि त्यांच्याबरोबर जाण्याचा नेम कर. त्यांचं फिरणं बंद पडलं असेल तर तें पुनः चालूं करायला लाव. तुझ्याबरोबर बळवंतरावांनाहि पुण्य मिळेल. चार मैलांचा फेरफटका केल्यावांचून तोंडांत पाणी घालायचं नाहीं अशी संवय तुम्हांला या नेमामुळं झाली तर ती आरोग्यदायक आणि आरोग्यरक्षक ठरेल.

नैवेद्याच्या नेमाची तिची सूचना मला मान्य आहे. पण नैवेद्य कशाचा दाखवायचा याबद्दल मला थोडं सांगायचं आहे. बाजारांत आयते मिळणारे

किंवा घरोघरीं नेहमीं होणारे जिन्नस नैवेद्याला वर्ज्य समजावेत. दर आठव· ड्याला नवा खाद्यप्रकार शोधून काढावा. रुचकर आणि पौष्टिक हे दोन मुख्य गुण त्यांत पाहायचे. साधनसामुग्री आणि मालमसाला नेहमींचा असला तरी त्यापासून बनवावयाचा पदार्थ नवा वाटला पाहिजे. नैवेद्य हा देवाला नुसता दाखवायचा असतो. त्याचा चट्टामट्टा तुमचा तुम्हीच करणार आहां. म्हणून नैवेद्य परोपरीचे तयार करण्यांत तुला मौज वाटेल. या नेमामुळं तुझी पाककुशलता वाढेल आणि ती तुला जन्मभर उपयोगी पडेल.

ज्यांच्यामुळं खर्चाचा बोजा पडणार नाहीं आणि ज्यामुळं तुझी प्रकृति बिघडणार नाहीं असेच नेम तूं पतकरावेस ही तुझ्या वैनीची सूचना लक्षांत घेऊनच मीं हे नेम तुला सुचविले आहेत. तुला आवडतील ते व साधतील ते नेम तूं धर. एकच नेम धरायचा असा कंजूषपणा कशासाठीं ! मीं सुचविलेले सर्वच नियम एकदम अमलांत आणले तरी बिघडणार नाहीं.

आणखी एक सांगायचं म्हणजे असं कीं करण्याचेच तेवढे नेम असतात असं नाहीं. न करण्याचेहि नेम धरतां येतील. आपल्या हातून गैर अशा कांहीं गोष्टी कळत वा न कळत होत असतील. आत्मपरीक्षण करून या गैर गोष्टींचा शोध घ्यावा व त्या करायच्या नाहींत असा नेम स्वीकारावा.

इकडील सर्व ठीक आहे. चि. रा. बळवंतरावांस आशीर्वाद. अलीकडं त्यांचं असं पत्र बरेच दिवसांत आलं नाहीं. अधूनमधून त्यांनींहि लिहावं हे आशीर्वाद.

तुझा
दादा.

आपली व माझी प्रत्यक्ष ओळख नाहीं. तरी पण तुमच्याविषयीं माझ्या कानावर आलेल्या गोष्टींवरून तुम्ही दिसायला शिष्ट पण मोठे उपद्व्यापी आणि विघ्नसंतोषी गृहस्थ दिसतां. आमचे चिरंजीव गजानन हे तुमच्या शेजारीं राहिले आणि तुम्ही त्यांच्या मनांत भलभलत्या गोष्टी भरवून त्यांच्या माझ्यांत वैमनस्य उत्पन्न करण्याची पाळी आणलीत.

चि. गजाननासाठीं आम्ही इकडं चारपांच मुली पाहून ठेवल्या. पत्रिका, गणगोत्र पाहिलीं. हुंडा भरपूर द्यायलाहि तयार आहेत. पण गजानन तिकडच्या एका कोंकणस्थ मुलीशींच लग्न करण्याचा हट्ट धरून बसला आहे. तुमची त्याला फूस आहे. आमच्यापेक्षां तुम्ही त्याला जवळचे वाटूं लागलां आहां. पण आपल्या जातीची आणि ती कदाचित् नात्यांतलीहि असेल. एक कारटी खपविण्यासाठीं आमच्या मुलाचे तुम्हीं बारा वाजवावे हा शुद्ध

नीचपणा आहे. आम्ही देशस्थ आणि वतनदार लोक आहों. आमच्या तोलाच्या आमच्या देशस्थांपैकीं मुलींना तोटा पडला आहे आणि म्हणून वाटेल त्या जातीच्या पोरीशीं आमच्या मुलानं लग्न लावून मोकळं व्हावं अशी गोष्ट नाहीं; आणि आपल्या सारख्याच्या चेतवणीनं त्यानं तसं कांहीं केलं तर तो आम्हांला मेला असं समजूं. आणि याचे परिणाम त्याला जन्मभर भोगावे लागतील. त्याला लावलेले हे भिकेचे डोहाळे दूर करण्याचा आपण प्रयत्न करावा अशी आपणांस हात जोडून विनंति आहे.

आपण स्वतःहि मुलांचे बाप असाल. तुमच्या मुलानं देशस्थ कऱ्हाड्याच्या मुलीशीं लग्न केलं तर तुम्हांला कसं वाटेल? लोकांच्या पोरांना भलत्या नादाला लावतांना आपल्या पोरांना तोच उपदेश आपण कराल का याचा विचार करा.

बहुत काय लिहिणें ही विनन्ति.

गोविंद कृष्णाजी कुलकर्णी

*श्रीयुत गोविंद कृष्णाजी कुलकर्णी यांसी सा. न. वि. वि.* ४४

पत्रद्वारें आपण आपला परिचय करून दिला याचं समाधान वाटतं. या परिचयाचं स्नेहांत रूपांतर झालं तर हें समाधान द्विगुणित होईल. आपले चिरंजीव गजाननराव हे माझे स्नेही झालेच आहेत. त्यांच्या निमित्तानं आपला स्नेहहि आज ना उद्यां मला लाभेल असा मला विश्वास वाटतो.

चि. गजाननराव यानीं केलेली आपल्या जोडीदारणीची निवड माझ्या मध्यस्थीमुळं आणि खटाटोपामुळं केली असा संशय आपण कशावरून घेतां हें माझ्या लक्षांत येत नाहीं. वस्तुस्थिति अगदीं वेगळी आहे. गजाननराव आणि मीनाक्षी यांनीं आपली निवड केली ती अगदीं स्वतंत्रपणें एकमेकांचे गुण आणि मतं समजून घेऊनच केली आहे. तीं दोघंहि माझ्या चांगल्या परिचयाचीं झालीं आहेत आणि त्यावरून त्यांनीं केलेली एकमेकांची निवड योग्य असून ती दोघांचंहि जीवन सुखी करील असा मला विश्वास वाटतो.

हा विवाह आपणांस पसंत नसणार आणि यामुळं बापलेकांत कायमचं वितुष्ट येईल ही गोष्ट गजाननरावांच्या निदर्शनास मीं आधींच आणली होती, आणि मीनाक्षी बरोबरची मैत्री वाढीस लागण्यापूर्वीच हा प्रश्न सोडविण्या-बद्दल बजावलं होतं. परंतु 'लग्नाच्या कामीं मला कोणाचीहि सक्ति सहन व्हायची नाहीं' असं त्यांनीं मला सांगून टाकलं.

मीं स्वतः गजानन–मीनाक्षी विवाहास आनंदानं संमति दिली आहे. मीनाक्षी कोंकणस्थाची मुलगी आहे हें खरं, पण ती माझ्या नात्यांतली मुळींच नाहीं. माझ्या मुलानं एकादी देशस्थ–कऱ्हाडे कन्या पसंत केली तर मी त्याला विरोध मुळींच करणार नाहीं. माझ्या मतें मुलीच्या अनुरूपतेपुढं गणगोत्राचं आणि हुंडापत्रिकांचं स्तोम बिलकूल माजवूं नये. मी तसं माजविणार नाहीं.

गजाननरावानं आतां मीनाक्षीला नकार द्यावा या बाबतींत मी मुळींच प्रयत्न करणार नाहीं. उलट कोणत्याहि परिस्थितींत त्या दोघांचा विवाह सिद्धीस जावा यासाठीं मात्र त्यांना लागेल तें सहाय्य आनंदानं करीन. त्यानं आपला विवाह नोंदविण्याची नोटीस दिल्याबद्दल आपणांस पत्र लिहिल्याचं आजच मला कळविलं. साक्ष घालण्यासाठीं आपणांस बोलावलं असल्याचंहि सांगत होता. आपण अवश्य यावं अशी त्याची इच्छा आहे आपण आणि आई आलां तर त्याला केवढी धन्यता वाटेल. आपला जन्माचा प्रश्न आपल्या मताप्रमाणं तो सोडवीत आहे. हा त्याचा अप-राध असं आपणांस कां वाटतं ? वास्तविक मुलं आपली सोय आपण पाहूं लागलीं याचं समाधान वाटलं पाहिजे आणि त्यांच्या इच्छापूर्तीला शक्य तें सहाय्य केलं पाहिजे. या एवढ्या गोष्टींत गजानन आपल्या इच्छेबाहेर वागत असला तरी इतर वेळीं त्यानं आपला उपमर्द केल्याचं एकतरी उदा-हरण आपणांस आठवतं का ? शक्यच नाहीं तें. त्याच्यासारखा सालस मुलगा

क्वचित्‌च असेल. आपणांस असा मुलगा लाभला हें आपलं भाग्य होय. आणि मीनाक्षीस प्रत्यक्ष पाहिल्यावर अशी सून आपल्यास लाभली याची आपणांस धन्यताच वाटेल. आपल्याकडं आलेल्या पत्रिकांतले सगळे गुण आणि सर्वांचा हुंडा एकत्र घातला तरी मीनाक्षीच वजनांत भारी होईल अशी आपली खात्री पटेल.

आज जग कसं चाललं आहे हें आपणहि पाहावं. म्हणजे चि. गजानन-राव मुलखावेगळं कांहीं करीत नाहीं असं आपणांस दिसून येईल. बापानं मुलावर रागवावं पण तें क्षणिक असावं. त्यास कायमच्या वैराचं स्वरूप येऊं नये. 'मुलगा आम्हांला मेला' हे शब्द बापाच्या तोंडांतून यावे ही कल्पनासुद्धां दुःसह होते. मुलाला सुखी करणं हेंच बापाचं कर्तव्य. मुलाच्या सुखासाठीं बापानं आपल्या सुखाकडं कानाडोळा करणं योग्य. आपणांस हें दुसऱ्यानं सांगायला नको. आपल्या हृदयांत बापाचं अंतःकरण आहे आणि तें आपणाकडून योग्य तेंच करवील.

तारखे दिवशीं आपली भेट होईल. आणि आपला लोभ वाढीस लागेल असं इच्छितों.

आपला

दादा

रा. दादाराव यांना सा. न. वि. वि.

४५

तुमचं पत्र पोंचलं. या प्रकारचं पत्र तुम्हीं मला यापुढं लिहूं नये. तुमचा नवमतवाद मला मानवणार नाहीं. वारणीचं कपाळ फुटलं. त्या दुःखांत काय कमतरता आहे म्हणून तिच्या जन्माचे आणखी धिंडवडे झालेले आम्हीं आणखी पहावे? तुम्ही आणि तुमच्यासारखेच दुसरे आप्तस्वकीय हट्ट धरून बसले म्हणून तिला शाळेंत घातलं. वास्तविक तिनं नशिबास आलेल्या अवस्थेंत घरीं बसूनच देवदेव करीत रहाणं योग्य होतं. तिच्या पोटालाहि देवदयेनं कमी नाहीं. तिला पोसायचं सामर्थ्य देवानं मला दिलं आहे. एका मुलीला पोसायचं संकट वाटावं असं काळं पाणी माझ्या तोंडून चाललेलं नाहीं. बरं, तुमच्या म्हणण्याप्रमाणं मीं तिला शिकवलं आणि ती मॅट्रिक झाली; पुष्कळ झालं. पण एवढ्यावर तुमचं समाधान नाहीं. तिला कॉलेजांत धाडा, तिला डाक्टरीण करा, असा तुमचा तगादा आहेच. आणि तिला अशी मड्डम बनवून फायदा काय, तर तिला आपल्या जन्माची विस्कटलेली

घडी फिरून बसवायला आपण संधि द्यावी. तुम्हीं स्पष्ट लिहिलं नाहीं तरी तिनं कालेजांत जाऊन कोणाबरोबर तरी पाट लावावा असा तुमचा उद्देश लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. पोरीच्या जन्माची घडी बसवायची असती तर देवानं ती विस्कटलीच असती कशाला ? आणि देवाचीच इच्छा तशी, तर तिच्याविरुद्ध जायला आम्ही माणसं काय देवाहून दांडगीं झालों ? तुम्ही नुसतं शिक्षणापुरतंच म्हणालां असतां तर मीं ऐकलं असतं एखादे वेळीं. पण या शिक्षणाच्या पोटांत पुनर्विवाहाचं पाप आहे म्हणून मी आतां पुढं शिकवायचं नांवसुद्धां काढणार नाहीं, कोणाला काढूं देणार नाहीं. गतजन्मींच्या पापाचं फळ पोरगी या जन्मांत भोगीत आहे. आणखी फिरून या जन्मांत पापंच करून पुढच्या जन्माचंहि वाटोळं करून ठेवावं असं शहाण्या म्हणविणाऱ्या तुमच्यासारख्या गृहस्थांनीं सुचवणं तुम्हांलाच शोभतं.

अधिक काय लिहिणें ही विनंति.

धोंडो सदाशिव पेठे

## रा. धोंडोपंत पेठे यांस सा. न. वि. वि. ४६

तुमचं पत्र वाचून वाईट वाटलं. आणि तें कां वाटलं हें तुम्हांला कळविण्यासाठींच मला हें पत्र लिहावं लागत आहे. तुम्हीं मला पत्र लिहूं नये अशी ताकीद दिल्यावर मला स्वस्थ बसणं भाग होतं. परंतु या वेळीं मी माझे विचार न कळवितां स्वस्थ बसलों तर एका निरपराधी मुलीला निष्कारण होणारं कठोर शासन मीं दुबळेपणानं मान्य केलं, असं माझं मन मला खात राहील. राजाच्या तावडींत सांपडलेले प्रजाजन आणि बापाच्या तावडींत सांपडलेलीं मुलं असहाय्य असतात, आणि त्यांना होईल तो छळ मुकाट्यानं सहन करण्यावांचून गत्यंतर नसतं. चि. बारूताई सर्वस्वीं तुमच्या ताब्यांत आहे. आणि तुम्हीं तिच्या जन्माचं सोनं किंवा माती कराल ती तिनं गोड मानून घेतली पाहिजे. तिच्या जन्माचं सोनं करणं तुम्हांला शक्य आहे. आणि तुम्हीं तसं केलं तर मला आनंद वाटेल. परंतु तुम्ही तिच्या जन्माचं मातेरं करीत असाल तर माझ्याइतका कष्टी कोणी होणार नाहीं. ही

अनिष्ट गोष्ट तुमच्या हातून न घडावी याबद्दल मी शक्य तो प्रयत्न करीत राहणार. तो तुम्हांस आवडो किंवा न आवडो.

तुमच्या पत्रांत देवाचं प्रस्थ बरंच माजलेलं दिसतं. चि. वारूताईच्या जन्माची झालेली आणि यापुढंहि होऊं पहाणारी वाताहत त्याच देवाच्या इच्छेप्रमाणं झालेली आणि व्हावयाची आहे, अशी स्वतःची समजूत करून घेऊन आमचीहि घालूं पहात आहां! देवाच्या सामर्थ्यावर आणि त्याच्या इच्छेच्या अभंगपणावर तुमची दृढ श्रद्धा असावी, असं तुमच्या पत्रावरून सकृद्दर्शनीं दिसतं. परंतु तुमचं आतांपर्यंतचं आयुष्य पाहिलेल्या माझ्या-सारख्या माणसाला ही तुमची देवावरील श्रद्धा दाखवण्यापुरतीच असून, वेळप्रसंगीं देवाचं सामर्थ्य आणि देवाची इच्छा तुम्ही धाब्यावर बसवूं शकतां हें कळून चुकलेलं आहे, एकदां नव्हे तर दोनदां तुमची पत्नी हिरावून घेऊन, तुम्हांला वैवाहिक जीवन उपभोगूं देण्याची आपली इच्छा नाहीं, असं तुमच्या देवानं दर्शविलं होतं. पण त्याची ही इच्छा अमान्य करून तुम्ही तिसऱ्या खेपेस बोहोल्यावर चढलां आणि आज सौ. शांताबाईसह संसारसुखाचा आनंदानं आस्वाद घेतां आहां!

देव म्हणा, किंवा आपल्या आकलन–सामर्थ्याबाहेर असलेली कोणती तरी शक्ति म्हणा, त्यांच्यामुळें आपल्या आयुष्यांत अतर्क्य आणि अनपेक्षित अशा कांहीं घटना घडून येत असतात. पण त्या घडल्या म्हणून त्यांची झळ नाहींशी करण्याचा प्रयत्न करायचा नाहीं, हा आत्मघातकीपणा होईल. ध्यानींमनीं नसतां मनुष्य सांथीच्या तावडींत किंवा अपघातांत सांपडतो, अशा वेळीं देवाच्या इच्छेमुळं हें गंडांतर आलं, त्याची इच्छा असली तर तें दूर होईल, असं म्हणून आपण कपाळाला हात लावून बसतों, कीं उत्कृष्ट औषधयोजना करून तें संकट मागं हटविण्याचा प्रयत्न करितों? असा प्रयत्न करणं म्हणजे देवाविरुद्ध बंड होय असं मानण्याइतके भोळे आपण

आतां राहिलों नाहीं. आणि अशा प्रकारे आपल्याविरुद्ध बंड करणाऱ्या माणसांना शासन करण्याचं सामर्थ्य देवाच्या अंगींहि राहिलेलं नाहीं, असा आपला रोजचा अनुभव आहे. योगायोगानं—यालाच पुष्कळजण देव म्हणतात—माणसाच्या आयुष्यांत एकादं वैगुण्य निर्माण झालं, तर अन्य साधनानं तें भरून काढण्याचा माणसाचा अट्टाहास सदैव चाललेला आहे, आणि तसा चाललाच पाहिजे; हेंच त्याच्या जिवंतपणाचं, तेजस्वी वृत्तीचं, द्योतक आहे.

पण माणसाची ही धडपड स्वतःच्या सुखासाठीं जितकी होते तितकी दुसऱ्यासाठीं होत नाहीं. अगदीं जीवलग व्यक्तीच्या सुखासाठींहि होत नाहीं. तुमचंच उदाहरण पहा. तुम्हीं स्वतःचं जीवन आनंदमय करण्यासाठीं जेवढी दक्षता घेतली व घेतां, तेवढी किंवा तिच्या दशांशतरी दक्षता तुम्ही चि. वारुताईच्या सुखासाठीं घेतां काय? तुम्हीं 'घेतों' असं उत्तर द्याल. आणि पुरावा म्हणून 'तिला पोटभर खायला घालतों आणि तिच्या आवडीप्रमाणं पोलकीं पातळं घेतों' असं सांगाल. पण भातपोळी आणि पातळपोलकीं एवढंच मनुष्यजीवन आनंदपूर्ण करूं शकत नाहीं हें तुम्हांलाहि माहीत आहे.

घरीं एकांतांत बसून वारुताई आपल्या नष्टचर्याबद्दल कुढत बसली असती, त्यापेक्षां शाळेच्या निमित्तानं तुम्हीं तिला बाहेरच्या जगांत थोडा वेळतरी वावरूं दिलं आणि शिक्षणाचा लाभ झाल्यामुळं तिला आतां लेखनवाचनांत बऱ्या प्रकारें कालक्रमण करतां येईल. पण मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण नोकरींत चंचुप्रवेश करण्यास पुरेसं असलं, तरी तें खरा विद्यानंद देऊं शकत नाहीं. विद्या या दृष्टीनं तें अगदीं तोकडं पडतं. वारुताईस तेव-ढ्यानं विद्येची चटक लागली असेल आणि शिक्षणाबद्दलची तिची भूक शांत होण्याऐवजीं अधिकच प्रज्वलित झाली असेल. तिचं समाधान तुम्हीं केलं

नाहींत, तर तिला एवढंतरी कशाला शिकवलंत? अपुऱ्या अन्नानं भूक अधिकच कडाडते, आणि अर्ध्या पोटीं पानावरून उठवणाऱ्याचा संताप येतो, हा तुम्हांलाहि अनुभव असेलच. ज्ञानाचंहि तसंच होतं.

चि. वारुताईला उच्च शिक्षण दिलं आणि पोटासाठीं नसलं तरी, आपलं वाया चाललेलं जीवन सत्कारणीं लावायचा कोणतातरी मार्ग तिला उपलब्ध झाला, तर त्यांत बिघडलं काय? लोकांच्या उपयोगी पडणं हें कां पाप आहे? आणि तुम्हीं ज्या देवाचं इतकं प्रस्थ माजवितां, त्या देवाला परोपकार म्हणजे पाप का वाटेल? आपण जो जन्म वारुताईला दिलात, तो घरच्या अंधारांत कुजवून टाकण्याऐवजीं इतरांच्या उपयोगीं पडून, तिनं त्या जन्माचं चीज केलेलं पाहून त्या देवाला समाधानच वाटेल. तो तुमचा देव सहृदय असला तर तो वारुताईस आणि तुम्हालांहि धन्यवाद देईल.

वारुताईला उच्च शिक्षण देण्यालाहि तुमची हरकत नाहीं. पण त्या उच्च शिक्षणाबरोबर तिच्या डोकींत पुनर्विवाहाचं वेड शिरेल, हा बाऊ तुम्हांला भीति दाखवितो आहे. कॉलेजांत जातांच मुलं उच्छृंखल आणि स्वैराचारी बनतात असा आपला समज आपण कां करून घ्यायचा? असे स्वेच्छाचारी विद्यार्थी–विद्यार्थिनी आपणांस अधूनमधून आढळतात; पण त्यांच्याहून कितीतरी पट अधिक मुलं सच्छील आणि सदाचारीहि असतात. आपली वारुताई त्यापैकींच ठरणार नाहीं असं मानायला आपल्यापाशीं काय आधार आहे? मुलांना आपल्या आजुबाजूची परिस्थिति कळते आणि त्या परिस्थितींत बिघाड होईल अशा गोष्टी आपल्या हातून न घडण्याबद्दल तीं शक्य ती दक्षता घेतात. वारुताई समजूतदार मुलगी आहे आणि ती आपलं वर्तन वेडंवाकडं होऊं देणार नाहीं असा मला विश्वास वाटतो.

आणि समजा, खरोखरीच एकादा अनुरूप जोडीदार भेटून ती त्याच्याशीं पुनर्विवाह करायला सिद्ध झाली, तर आपण तिच्या या इच्छेला मान

द्यायला पाहिजे. पाप म्हणून धिक्कारण्याइतकी ती गोष्ट निषिद्ध नाहीं. मला तर तशी वाटत नाहींच, पण तुम्हांलाहि तशी वाटण्याचं कारण नाहीं. पत्नीच्या निधनानंतर किंवा निधनापूर्वीहि विवाहाच्या आवृत्त्या काढण्याचा सदर परवाना तुम्ही पुरुषांना देतां, आणि ऐन तारुण्यांत वैधव्याच्या डागण्या मुलींनीं निमूटपणें सोसल्या पाहिजेत, असा जुलूम करतां; तो कां ? मुली निरुपायानं अशा जुलुमाला मान वाकवितात पण म्हणून त्यांची नैसर्गिक क्षुधा, त्यांना दडपून ठेवतां येते असं थोडंच आहे ? परवां तुम्ही इथं आलां होतां, तेव्हां तुमच्या शेजारच्या एका सावकाराची विधवा सून घरच्या मुनीमाबरोबर पळून गेली अशी एक गोष्ट तुम्हीं सांगितली. मला त्यांत त्या सुनेचा मुळींच दोष वाटत नाहीं. तिची नैसर्गिक भूक दडपून टाकणाऱ्या तिच्या बापाचा आणि सासऱ्याचा तो दोष आहे. दुसरं एक तुम्हींच सांगितलेलं प्रकरण आठवलं. एक कुमारी शिक्षका चुलींत पडून भाजून मेली आणि तो बळेंबळें अविवाहित राहिल्यामुळं येऊं लागलेल्या फेफऱ्याचा परिणाम होता, असं डाक्टरांनीं दिलेलं मत तुम्हीं मला सांगितलं. योग्य वयांत नैसर्गिक भूक शमली नाहीं तर, अविवाहित मुलींच्या प्रकृतीवरच विपरीत परिणाम व्हावा, आणि बालविधवांच्या प्रकृतीवर तो होऊं नये असं तुमच्या देवानं केलं असेल हें संभवनीय वाटत नाहीं.

तुम्हांला या सर्व गोष्टी कळतात आणि पटतहि असतील. पण आपल्या वैयक्तिक सोयीसाठीं तुम्ही वेड पांघरत आहां. तुम्हीं स्वतःला धर्माभिमानी संस्कृतिसंरक्षक म्हणवून घेतां आणि सनातनींच्या कंपूंतले मान्यस्त गृहस्थ असा तुमचा लौकिक आहे. मुलीला उच्च शिक्षण दिलं आणि यदाकदाचित् तिनं पुनर्विवाह केला, तर ती सुखी होईल हें दिसत असऊं तरी, त्यामुळं तुमच्या सनातनी कंपूंतल्या प्रतिष्ठेला धक्का बसेल ही तुमची खरी धास्ती आहे. म्हणजे तुम्ही लेकीच्या उभ्या आयुष्यापेक्षां स्वतःच्या उरलेल्या

थोडयाशा आयुष्याला जपतां आहां! मुलीला पाप लागेल आणि पुढल्या जन्मीं तिच्या वांटयास हालअपेष्टा येतील ही तुमची भीति खरी नसून आपला स्वतःचा आजचा बडेजाव कमी होईल आणि आज आपल्यास हात जोडणारे लोकच उद्यां आपल्याकडं बोट दाखवूं लागतील, ही तुमच्या पोटांत खरी धास्ती आहे. म्हणून तुम्हीं देवाधर्माचा, पापपुण्याचा आणि मुलीच्या कल्याणाचा वरकरणीं कितीहि आव आणलात तरी मुलीच्या सुखाचा होम करून तुम्ही त्या आगीवर आपली पोळी भाजून घेणार आहां, असंच जाणते लोक म्हणतील. तुमचा उपहास करतील.

अधिक काय लिहायचं ! लोभ वाटल्यास करावा ही विनंति.

*तुमचा*
**दादा**

तुमचे तेथील डॉ. धराधर हे इथं सहकुटुंब ( द्वितीय ) येणार असून त्यांची इथं कोणाचीच ओळख नाहीं, म्हणून त्यांनीं मजकडं उतरावं अशी तुमची इच्छा असल्याचं तुम्हीं लिहिलं. पण स्पष्ट सांगायचं म्हणजे या जोडप्याचं आतिथ्य करावं अशी माझी इच्छा नाहीं. मला पाहुण्यांचा कंटाळा मुळींच नाहीं. उलट पाहुणा येईल तो दिवस मला आनंदाचा वाटतो. त्यांतल्या त्यांत विद्वान् पाहुण्याचं आगमन म्हणजे मला सणासारखं आनंद-दायक होतं. तुमचे डॉ. धराधर हे नुसते कुशल डॉक्टर नसून उत्कृष्ट वक्ते आणि लोकप्रिय लेखक आहेत, या सर्व गोष्टी खऱ्या असतील. पण ज्याचं आचरण सुसंस्कृत नाहीं त्याच्यापुढं विद्वत्तादर्शक कितीहि पदव्या असल्या, तरी त्याला मी विद्वान् मानीत नाहीं. आणि त्याला मी विद्वान मानीत नसल्यानं तो मला पूज्य व स्वागतार्ह वाटत नाहीं. तुमच्या डॉ. धराधरांच्या

द्वितीय संबंधावरून नुकताच वृत्तपत्रांतून जो "फाल्गुनमास" साजरा झाला त्यावरून त्यांचं आचरण माणुसकीला सोडून झालेलं आहे अशी माझी समजूत झालेली आहे. पहिली पत्नी जिवंत असतांना दुसरी करणं हें सर्वच माणसांपुरतं निंद्य असतं असं मानणाऱ्यांपैकीं मी नाहीं. कांहीं विशिष्ट प्रसंगीं असे विवाह समर्थनीय आणि अत्यावश्यकहि असूं शकतील. परंतु डॉक्टर मजकुरांच्या प्रथम पत्नीचं आणि तिच्या सत्वशीलतेचं जें वर्णन मीं वाचलेलं आणि ऐकलेलं आहे, त्यावरून डॉ. धराधरांच्या द्वितीय विवाहाला ' मनुष्याला न शोभणारा स्वैराचार ' या व्यतिरिक्त दुसरं नांव देतां येणार नाहीं. माझ्या घरीं येणारे पाहुणे हीं माणसं असावींत, माणुसकीवर पाणी सोडलेल्या माणसांनीं माझ्या घरीं पाऊलहि टाकूं नये.

सौभाग्यवतीचं म्हणणं असं कीं "येताहेत तर येईनात कां ? ज्याचं कर्म त्याच्याबरोबर ! करायची आहे काय आपल्याला त्याची पंचाईत ?" पण मला तिचं हें मत मान्य नाहीं. चावट लोकांचा निषेध न करितां भल्या लोकांनीं त्यांचं आगत–स्वागत केलं, तर ते त्याचा भलताच फायदा घेऊं लागतात. आपलं आचरण हें, लोक नाकं मुरडतात तसं वावगं नाहीं, शहाणे व समजूतदार लोक आपल्याला मानानंच वागवितात, अशी ते बहुजन समाजाच्या डोळ्यांत धूळफेक करूं लागतात, आणि निंदणाऱ्यांना मूर्खांत काढून मोकळे होतात. डॉक्टर महाशय यांना खाद्यपेयांचा विधिनिषेध नाहीं असं ऐकतों. तसं असेल तर त्यांना आमच्या सारख्याकडंच उतरलं पाहिजे असं नाहीं. आगगाडीच्या डब्यांत किंवा स्टेशनवरील स्पेन्सरच्या भोजनगृहांत त्यांना जेवायला मिळेल आणि डाक बंगल्यांत पथारीहि पसरतां येईल. त्यांना पैशाचाहि प्रश्न नाहीं. मग अशी सरळ सोय सोडून हें जोडपं माझ्यासारख्याकडं उतरण्याची इच्छा करतं, तें कां ? मला तरी असं वाटतं कीं, आपल्या पापावर आमच्यासारख्याच्या मान्यतेचा छाप

मारून घेणं याहून त्यांचा वेगळा उद्देश नाहीं. माझ्यापुरता तरी त्यांचा हा उद्देश सफळ होण्यासारखा नाहीं.

तुमच्या एवढ्या इच्छेस मीं विरोध दाखविला म्हणून गैरसमज करून घेऊं नका. तुमचे आमचे संबंध आतांपर्यंत आहेत तसेच पुढेंहि राहतील. तुम्हीं स्वतः इथं आलां तर आम्हांला आनंदच होईल. इकडील सर्व ठीक. लोभ असावा हे आशीर्वाद.

तुमचा
दादा

## चि. चिमणराव यांस अनेक आशीर्वाद. ४८

तुमचं पत्र पोंचलं. झाल्या गोष्टीचं मला आश्चर्य वाटलं नाहीं, आणि वाईटहि वाटलं नाहीं. तुमच्या जामातांनीं तुमच्या मुलीला टाकून दुसरं लग्न केलं, याचं तुम्हांला वाईट वाटावं हें साहजिकच आहे. एका मुलीच्या जन्माचं मातेरं झाल्याबद्दल कोणालाहि वाईट वाटेल. परंतु या प्रसंगीं वस्तु-स्थिति वेगळी आहे. तुमच्या जामातांनीं दुसरी बायको केली, म्हणून तुमच्या चि. चिंगुताईच्या जन्माचं अधिक मातेरं झालं असं मला वाटत नाहीं. तें आधींच झालेलं आहे. कारण ती तुमच्या जामातांची एकटीच पत्नी असतांना स्वतः सुखी होती व त्यांना सुखी करीत होती असं नाहीं. तुम्हां पतिपत्नींच्या व इतरेजनांकडून चिंगुताईविषयींच्या ज्या गोष्टी मीं ऐकल्या आहेत, आणि एकदोनदां तुमच्या जामातांच्या घरीं जाऊन जो प्रकार प्रत्यक्ष पाहिला आहे, त्यावरून चिंगूताईस नवऱ्याच्या घरचं वास्तव्य रुचत नव्हतं ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. नवऱ्यादेखत कुंकूमंगळसूत्राला

फांटा देऊन घराबाहेर पडणाऱ्या मुलीला त्या नवऱ्यापाशीं रहायला मिळत नाहीं म्हणून तक्रार करायला काय अधिकार आहे ? आणि मुलीला रुचत नव्हती तीच गोष्ट नाहींशी झाल्याबद्दल तिच्या आईवडिलांनाहि हळहळण्याचं काय कारण आहे ?

तुमचे जामात वसंतराव यांना मी चांगलं ओळखतों. ते सज्जन गृहस्थ आहेत, अशी माझी खात्री आहे. त्यांच्याकडून तुमच्या मुलीचा छळ झाला असा आरोप तुम्हांला करतां येईल असं मला वाटत नाहीं. फारतर तुमच्या मुलीचे मूर्ख लाड त्यांनीं पुरविले नसतील, पण हा त्यांचा अपराध नव्हे. असा सुविद्य, सुशील आणि संपन्न जोडीदार लाभला असतां त्याचं प्रेम संपादण्याऐवजीं त्याच्याशीं वैमनस्य ठेवण्यांतच चिंगूताईनं आनंद मानला. नवऱ्याकडून छळ होण्याऐवजीं नवऱ्याचा छळ तिनं अमर्याद केला. वर्षानुवर्षं त्यांनीं हा छळ कां सोसला हेंच कळत नाहीं. सुधारणेची आशा नाहीं अशी खात्री करून घेऊन दुसरी अनुरूप जोडीदारीण वसंतरावांनीं यापूर्वीच करून घ्यायला हवी होती. पण उशीरां कां होईना, त्यांनीं योग्य तें केलं याचा मला आनंद वाटतो.

आतांपर्यंत चिंगूताई आणि वसंतराव दोघंहि कष्टी होतीं. आतां वसंतराव आपल्यापुरतेतरी सुखी झाले ही समाधानाचीच गोष्ट मानली पाहिजे. सुख घेतां आलं तर दोघांनाहि घेतां आलं पाहिजे, नाहींतर दोघांनींहि हालवनवासांत आयुष्य कंठलं पाहिजे, असं म्हणणं निष्ठुरपणाचं ठरेल.

चि. चिंगूताईला दुसरा मनपसंत जोडीदार मिळवून सुखी होतां येण्यासारखं नाहीं, हा वसंतरावांचा दोष नव्हे. आपल्या समाजव्यवस्थेचा तो दोष आहे. तथापि वसंतरावांच्या मनोवृत्तीविषयींचा माझा अंदाज बरोबर असेल तर, चिंगूताईनंहि आपल्या जन्माची नवी घडी बसविली तर तिला वसंतराव कायद्याचा बडगा दाखवून विरोध करणार नाहींत. तसं तिला

कोणत्याहि कारणानं करतां येत नसेल तर तिच्यासाठीं त्यांना एक गोष्ट करतां येण्यासारखी आहे. ती म्हणजे तिच्या अन्नवस्त्राची तरतूद. ती त्यांनीं केली नसेल तर मी मध्यस्थी करीन आणि त्यांत मला यशहि येईल असं वाटतं. वास्तविक त्यांच्याकडं ही मागणी करण्याचा चिंगूताईला अधिकार नाहीं. पत्नीपदाचं कोणतंच कर्तव्य स्वतः पाळायचं नाहीं आणि पत्नीपदाचे हक्क तेवढे उपभोगावयाचा हव्यास धरायचा हा शुद्ध जुलूम आहे. तरी देखील मूर्ख माणसाकडं क्षमेच्या दृष्टीनं पहायची उदारता वसंतरावांच्या अंतर्यामीं असेल.

माझं हें लिहिणं तुम्हांला कठोरपणाचं वाटेल. आणि तें तसं आहेहि. गैर गोष्टीबद्दल शासन झालं तरी तोंडापुरती सहानुभूति आणि हळहळ प्रकट करण्याचं नाटक मला करतां येत नाहीं. जीं नवरा–बायको एकमेकांस सुखी करूं शकत नाहींत, उलट एकजण दुसऱ्याचं जिणं क्लेशपूर्ण करण्यांत आनंद मानतो, त्यांनीं एकमेकाला कवटाळूनच बसलं पाहिजे असं म्हणणाऱ्यांपैकीं मी नाहीं. संसार ही समाईक भागीदारी आहे. त्यांतला एक भागीदार स्वार्थी, स्नेहशून्य आणि गळेकापू असेल तर दुसऱ्यानं त्याचा संबंध तोडण्यांत मुळींच दोष नाहीं. तो त्याचा शहाणपणा ठरेल. या प्रकरणीं वसंतरावांनीं हा शहाणपणा दाखविला आहे. याच्या आधींच ही गोष्ट व्हायला पाहिजे होती.

चिंगुताईबद्दल मला हळहळ वाटत नाहीं, असं मात्र नाहीं. सर्वतोपरी योग्य नवरा लाभला असून सुखाचा संसार करण्याऐवजीं ती देशोधडीला लागत आहे याचं मनस्वी वाईट वाटतं. तिच्यावर असा प्रसंग न यावा या सदिच्छेनं मीं एकदोनदां तिला सावधगिरीचा इषारा दिलेला होता. तुम्हीं तिची कानउघाडणी केली असलीच पाहिजे. पण माझ्यापुरतं सांगायचं तर मला अनुभव आला तो विपरीत आला. चिंगूताईनं आपलं आचरण

सुधारण्याऐवजीं माझ्याशीं तुसडेपणानं वागायला सुरवात केली. हितोपदेशहि कडवट कसा लागतो याचं प्रत्यंतर तिनं मला आणून दिलं.

चिंगूताईच्या या तुसडेपणावर चिडलेला असल्यामुळं तिच्या दुर्दशेचा मला हर्ष होतो आहे, असं मुळींच समजूं नका. तिची दुर्दशा दूर होऊन तिनं आपलं उरलेलं आयुष्य सुखी करावं याबद्दल तुमच्याइतकीच मलाहि तळमळ वाटते. आणि म्हणून मी एकदोन उपाय तुम्हांला सुचवून ठेवतों. चिंगूताईनं आतां शिकायला प्रारंभ करावा असं मला वाटतं; म्हणजे तिनं शाळेंत नांव दाखल करावं, असं नव्हे; पण शिवणकला किंवा आवडीची दुसरी एकादी कला शिकावी, अथवा सुईण आणि परिचारिकांचा अभ्यासक्रम पत्करून तो पुरा करावा. यांत तिचं मन रमेल. निदान रिकामपणीं नसते उपद्व्याप सुचतात, ते तरी वांचतील. शिवाय यापासून आपल्या निर्वाहापुरतं आपण स्वावलंबी झाल्याचं समाधान मिळेल.

आपण चुकलों आणि त्यामुळं आपल्या जन्माचे धिंडवडे झाले याचे क्लेश कमी व्हायला पाहिजे असतील तर आपण आपली पात्रता वाढविली पाहिजे, असे डोळे उघडले तरच चिंगूताई शिकायला तयार होईल, आणि अवश्य ते परिश्रमहि घेईल.

डोळे उघडले नसतील तर कांहींच होणार नाहीं. सुकाणूं तुटून तारूं भडकलं आहे. जाईल तिकडं गोते खात जाईल. त्याची दुर्दशा पाहून हळहळणं एवढंच तुम्हां आम्हांला करतां येण्यासारखं आहे.

लोभ असावा हे आशीर्वाद.

तुमचा
दादा

शिवरामकाकांचं आज पत्र आलं. त्यांनीं मला तुमच्यासाठीं एखादी मुलगी पहाण्यास लिहिलं आहे. त्यांना उत्तर लिहिण्याऐवजीं तुम्हांला लिहिलेलं बरं असं वाटल्यावरून हें पत्र लिहीत आहे. काकांना समजावून सांगितलं तरी त्याचा उपयोग कितपत होईल याची मला शंका वाटते. जुन्या माणसांच्या समजुती बदलणं कठिण असतं. तुमचे विचार तितके टणक झालेले नसतील, वळले तर वळूं शकतील, म्हणूनच मी तुम्हांला लिहून पहात आहे.

तुमच्यासाठीं आतां जी मुलगी पहायची ती तुम्हांला बायको पाहिजे म्हणून पहायची नसून तुम्हांला बाप बनवूं शकेल असं यंत्र म्हणून ती पाहिजे आहे. कारण चि. सौ. मंदाबाई ही पत्नी तुम्हांला प्राप्त झाली आहे आणि मी तुम्हां दोघांचा जो संसार पाहिला त्यावरून ती योग्य पत्नी आहे, असं म्हणायला मला कसलीहि शंका वाटत नाहीं. पण तिच्याशीं तुमचं लग्न

होऊन बारा वर्षं उलटून गेलीं असतांहि ती पुत्रवती झाली नाहीं, या तिच्या वैगुण्याचं शासन म्हणून तिच्या उरावर सवत नाचविण्याचा बूट निघालेला दिसत आहे. मला शिवरामकाकांचा—आणि तुमची संमति असेल तर तुमचा—हा विचार गैरवाजवी, किळसवाणा वाटतो.

आपणास मूल व्हावं ही इच्छा प्रत्येकास असते. आणि ती सफळ झाली नाहीं तर उदासवाणं वाटतं. पण पुरुषानं ही इच्छा तृप्त करून घेण्यासाठीं दुसरं लग्न करण न्याय्य ठरेल कीं काय, हें विचारपूर्वक पाहिलं पाहिजे. बायकोला मूल होत नाहीं त्या अर्थी ती वांझच असली पाहिजे असा निर्णय पुरुष आपल्या मनानं देतात, पण तो मुकाट्यानं मान्य करणं, योग्य ठरणार नाहीं. स्त्रीप्रमाणं पुरुषाचा वांझपणाहि अपत्यसंभवाला विरोध करूं शकतो, ही गोष्ट पुरुष समजून घेत नाहीं. तज्ज्ञ डॉक्टरांकडून तुम्ही स्वतःची तपासणी करून घ्याल तर मंदाबाईऐवजीं तुमच्या ठिकाणींहि वांझपणा दिसण्याचा संभव आहे. चांगला खणखणीत मर्दहि अपत्यनिर्मितीपुरता निष्फळ असूं शकतो असं जीवनशास्त्रानं सिद्ध केलेलं आहे.

स्त्रीदेखील अपत्यहीन राहिली म्हणून वांझोटीच असते असं नाहीं. गर्भ-संभव आणि गर्भसंवर्धन यांना प्रतिकूल अशी शरीररचना असूं शकते आणि शस्त्रवैद्य ती विकृति विनासायास दूर करूं शकतो. अशा उपायानं तिशी उलटलेल्या स्त्रियांनाहि पुत्रलाभ झाल्याचीं उदाहरणं आहेत. तुम्ही आपली आणि मंदाबाईची अशी तपासणी करून घेतली आहे काय ? आणि मंदा-बाईचा वांझपणा सिद्ध झाला आहे काय ? यापैकीं तुम्हीं कांहीं केलेलं नाहीं असा माझा समज आहे.

आणि जरी मंदाबाई वांझ आहे असं सिद्ध झालेलं असलं, तरी द्वितीय विवाहानं तुम्हीं तिची विटंबना करणं, माणुसकीला धरून होईल कां ! वांझ-पणा हा अपराध असलाच तर तो निसर्गानं केलेला आहे. आणि त्याचं

प्रायश्चित्त तुम्ही मंदाबाईस देऊं पहात आहां. अपराध एकाचा आणि शासन दुसऱ्याला हें न्याय्य नव्हे, हें तुमच्यासारखा सुविद्य मनुष्य मान्य करील असं वाटतं. तुमच्या अंगांत असा एकादा निसर्गनिर्मित दोष दिसला तर याच प्रकारचं प्रायश्चित्त मंदाबाईकडून घ्यायाला तुम्हीं सिद्ध व्हाल का हा प्रश्न तुम्हांला विचारावासा वाटतो. स्पष्ट लिहिल्याबद्दल रोष मानूं नये.

दुसरी एक गोष्ट विचारांत घेतली पाहिजे. ज्या अपत्यप्राप्तीसाठीं तुम्हीं दुसरी बायको करूं इच्छितां, ती अपत्यप्राप्ति दुसऱ्या बायकोकडून होईलच याचा काय विश्वास ? आणि दुसऱ्या बायकोनंहि ही तुमची हौस पुरविली नाहीं, तर तिसरी करण्याची तुमची तयारी आहे काय ?

आणि समजा, दुसऱ्या बायकोनं तुमची मुलाची हौस पुरविली तर तेवढ्यानं तुमचं आयुष्य आनंदमय होईल का, याचा विचार तुम्हीं केला पाहिजे. मुलाच्या बोबड्या बोलांचं संगीत तुमच्या घरांत सुरू होईल पण सवतीसवतीच्या रडारडींत तें तुम्हांला ऐकूं येईल का ? मुलाच्या बापाला त्याच्या प्राप्तीनं धन्यता वाटत असली, तरी दोन बायकांच्या दादल्याला जीव नकोसा होतो असा जगाचा अनुभव आहे. जगाचा अनुभव हा माणसाला मार्गदर्शक असतो.

तिसरी गोष्ट अशी कीं, बालकाच्या अभावीं घरांत पसरणारा उदासीनपणा दूर करून तिथं उल्हसितपणा निर्माण करण्यास दुसऱ्या बायकोच्या रूपानं पुत्रकन्यांची टांकसाळ स्थापन करणं हा एकच उपाय आहे, असं तुम्हांला कां वाटतं ? अगदीं आपल्या रक्तामांसाचं मूल मिळवायला हें दिव्य करणं भाग असलं, तरी दुसरा पर्यायहि आहे. दुसरं मूल किंवा मुलं मिळवून आपली हौस पुरवून घेणं शक्य आहे. दुर्दैवानं मातृहीन झालेलीं किंवा आपद्ग्रस्त आईबापांच्या पोटीं आलेलीं किती तरी गोजिरवाणीं बालकं, तुमच्यासारख्या प्रेमळ माणसांच्या सहानुभूतीकडं आशेनं पहात आहेत.

असा मुलगा किंवा मुलगी तुम्हांला उचलून घेतां येईल. त्याच्यावर तुमच्या वात्सल्याचा वर्षाव करितां येईल. त्याला जाणीव होण्याआधींच तें तुमच्या सांवलींत आल्यामुळं, तें अगदीं तुमचं होईल. अशा प्रकारें निपुत्रिक आई-[illegible]कसे [illegible]द मनमुराद अनुभवतात, याचीं वर्णनं मीं वाचलीं आहेत, आणि आपल्[illegible]डत असलेलीं कांहीं उदाहरणंहि पाहिलीं आहेत. [illegible] तुमच्याहि परिचयाचे अण्णासाहेब गाडगीळ आणि त्यांच्या पत्नी सौ. [illegible] यांचं उदाहरण पहा. स्वतःला मूल झालं नाहीं तरी भावा-[illegible], [illegible]य शेजाऱ्यांचीं मुलीमुलं जवळ घेऊन त्यांनीं त्यांचं संगो-पन केलं, त्यांच्या लग्नंमुंजी केल्या, त्यांना शिकविलं. त्यांची आबाळ झाली असती त्याऐवजीं त्यांचा अवघा जन्म आनंदमय होईल अशी सुस्थिति त्यांना प्राप्त करून दिली. तुम्हांला असं करतां येणार नाहीं काय? सवतीमत्सराची आग घराला न लावतां पुत्रकन्यांचं सुख तुम्हांला मिळेल आणि गरजू जीवांना सहाय्य दिल्याचं समाधानहि तुम्हांला लाभेल.

मला सांगायची आहे ती मुख्य गोष्ट ही कीं, मूल होत नाहीं म्हणून तुमचं दुसरं लग्न करावं हा तुमच्या शिवरामकाकांचा विचार मला क्रूर-पणाचा आणि असमंजसपणाचा वाटतो. म्हणून त्याच्या सिद्धतेस मी कोणत्याहि प्रकारे सहाय्य करणार नाहीं. घालतां येत असेल तर त्यास मोडता खचित घालीन. कुणाचंहि लग्न जमवावं ही जुनी विचारसरणी मला मान्य नाहीं, आणि अनुचित लग्नांत बिघाड आणायला मला मुळींच पातक वाटत नाहीं.

लोभ असावा हे आशीर्वाद.

*तुमचा*

**दादा**

चि. बाळाभाऊस अनेक आशीर्वाद ५०.

तुमचं पत्र वाचून आनंद वाटला. कांहीं माणसांचीं मनं फत्तरासारखीं असतात आणि त्यावर पडलेला चरा वज्रलेप होतो, पण कांहींचीं मनं तितकीं टणक नसतात. कारणपरत्वें त्यांवर एकादा ओरखडा निघाला, तरी कालांतरानं तो मावळतो. यालाच मी माणसाचं मन म्हणतों. तुमचं मन माणसाचं आहे आणि तुम्हां पतिपत्नींत आलेलं वितुष्ट आज ना उद्यां दूर होईल अशी माझी खात्रीच होती. माझी खात्री खरी ठरली याचा मला आनंद वाटल्यावांचून कसा राहील ?

तुमच्या सासुरवाडीच्या माणसांचा तिरसटपणा आणि माहेरच्या माणसांच्या नादानं नाचण्याचा चि. सौ. रोहिणीबाईचा अडाणीपणा, यामुळं गेलीं चार वर्षे तुम्हांला विभक्तपणा सोसावा लागला. स्वतःचं हितानहित कशांत आहे याचा पोंच रोहिणीबाईस नव्हता. तिच्याएवढ्या अल्पवयी मुलीस तसा पोंच नसला तर नवल नाहीं. परंतु नवऱ्यापासून दूर रहाण्यांत

कोणकोणत्या अडचणी येतात याची जाणीव आतां तिला झाली असावी आणि ' नवऱ्यानं टाकलेली ' असा छाप पडलेली मुलगी निरंतर बाळगणं सोयीचं नाहीं, असं तिच्या वडिलांनाहि कळून आलेलं असावं. अनुभवासारखा गुरु नाहीं. या गुरूनं कान उपटल्यामुळं तुमच्या श्वशुरांनीं रोहिणीबाईस तिच्या खऱ्या जागीं परत आणलं आणि झालं गेलं विसरून तुम्हीं तिचं स्वागत केलं. कशाहि रीतीनं असो, विस्कटलेली तुमची घडी फिरून बसली यांत मला आनंद आहे.

तुम्हीं वर्षभरापूर्वी दुसऱ्या लग्नाची गोष्ट माझ्यापाशीं काढली होती आणि मीं तुमच्या इच्छेला त्यावेळीं विरोध केला होता. तेव्हां तुम्हांला माझा रागहि आला असेल. पण आतां माझं म्हणणंच श्रेयस्कर होतं हें तुम्ही मान्य कराल असं वाटतं. त्यावेळीं मीं तुमची इच्छा उचलून धरली असती, आणि तुमचा द्वितीय विवाह उरकून टाकला असता तर, आज कसा अनवस्था प्रसंग निर्माण झाला असता? मनुष्य प्रमादी आहे. पण समजून वा न समजून केलेल्या प्रमादांची सुधारणा करण्यास त्याला भरपूर संधि दिली पाहिजे असं मला वाटतं. तशी संधि देऊनहि सुधारणा न झाली तर आपद्धर्म म्हणून दुसरी योजना स्वीकारल्यास ती दोषास्पद ठरणार नाहीं. तुम्हां इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या तोंडीं ' दम खा आणि वाट पहा ' अशा आशयाचं एक सुभाषित मी वरचेवर ऐकतों. तेंच तुम्हीं आचरून पहावं, अशी माझी इच्छा होती. तुमच्यापुरतं हें दम खाणं आणि वाट बघणं हितपरिणामीं ठरलं असं म्हणायला हरकत नाहीं.

आतां तुम्हां नवराबायकोच्या वैवाहिक जीवनाचा नवा श्रीगणेशा होत आहे. यावेळीं तुम्हीं अधिक सावधपणा स्वीकारला पाहिजे. पहिला प्रयत्न कां फसला, याचा तुम्हीं विचार केला पाहिजे आणि त्यांत ज्या चुका घडल्या त्या फिरून न होतील अशी दक्षता घेतली पाहिजे. तुमच्या आतां-

पर्यंतच्या बेबनावास चि. सौ. रोहिणीबाईचा हट्टी स्वभाव हें मुख्य कारण असलं, तरी तुम्हीं स्वतः सर्वस्वी निर्दोष असाल असं म्हणतां येणार नाहीं. टाळी एका हातानं वाजत नाहीं. दोन्हीं हातांचा त्यांत भाग असतो. कमी अधिक असेल इतकंच !

डोक्यांत एक वेड शिरलं कीं तें पुरं होईपर्यंत चैन पडायचं नाहीं, आणि तें पुरं झालं नाहीं तर घर डोक्यावर घ्यायचं, या रोहिणीबाईच्या वृत्तीमुळं तिचं आणि तुमचं जमत नव्हतं, हें मला ठाऊक आहे. पण तिची प्रत्येक इच्छा हें वेडच आहे, असं तुम्ही मानीत होतां, हा तुमचासुद्धां वेडेपणाच होता. बायकोची इच्छा वेडेपणाची असली तर तें तिला समजून सांगावं. अधिकाराच्या तोऱ्यानं बायकोचं मागणं धुडकावून लावलं तर तिला चीड येणं स्वाभाविक आहे. आणि थोडी तल्लख प्रकृतीची मुलगी अशा चिडीमुळं वंडखोर बनणंहि अशक्य नाहीं. म्हणून पहिला प्रकार फिरून सुरू न व्हावा अशी तुमची इच्छा असेल तर तुम्हीं आपल्या सौभाग्यवतीवर करडा अंमल चालविण्याऐवजीं गोड शब्दांनीं तिची समजूत घालण्याचं धोरण ठेवा. गोड शब्दांत विलक्षण जादू आहे. लोकांचीं मनं जिंकण्याचं सामर्थ्य गोड शब्दां-इतकं दुसरं कशांतहि नसेल. आणि एकाद्या गोष्टींत तुमचे समजुतीचे शब्द निष्फळ ठरले तर रोहिणीबाईची तेवढी इच्छा तुम्ही पूर्ण करा. कांहीं वेळानं तिची चूक तिलाच दिसून येईल आणि फिरून ती तसली मागणी करणार नाहीं.

तुम्हांला यशस्वी संसाराची मुख्य गोष्ट सांगायची ती ही कीं, बायकोला संसार हा **आपला** वाटेल असं धोरण नवऱ्यानं ठेवायला पाहिजे नवऱ्याच्या घरांतील आपण एक बटीक असा तिचा समज होण्याऐवजीं संसारांत आप-णहि सारखीच हक्कदारीण आहों असा विश्वास तिला वाटला पाहिजे. दुस-ऱ्याच्या संसाराबद्दल तिला पर्वा वाटली नाहीं, तरी **आपल्या** संसाराविषयीं

तिला खचित आस्था वाटेल. तीच त्याची जपणूक करील. ‘ घर तुझं आहे तुला योग्य दिसेल तें कर ’ असं स्वातंत्र्य तुम्ही रोहिणीबाईस देऊन पहा. उधळपट्टी आणि अनास्था चुकूनसुद्धां दिसणार नाहीं तिच्या वागणुकींत ! बायका दुसऱ्याच्या बाबतींत निष्काळजी असल्या, तरी आपल्या चीजवस्तूची जपणूक त्या जीवाभावानं करितात.

चि. सौ. रोहिणीबाई आतां अनुभवानं शहाणी झालेली आहे. कान फुंकणारीं माणसंच पुढं टिंगल करूं लागतात आणि मदतीऐवजीं तिटकाराच त्यांच्याकडून मिळतो, हें तिला कळून चुकलं असेल. देवघरांत असेल तोंपर्यंत दगडाला देवपण, तोंपर्यंतच त्याला पूजा नमस्कार. उघड्यावर पडला कीं लोक त्याला पायदळीं तुडवतात. माणसांचंहि तसंच आहे. सत्तेच्या घरांत असेल तोंवरच स्त्रीला गृहिणीपदाचा मान. ती आपल्या बैठकीवरून ढळली कीं झालीच तिच्या दुर्दशेला सुरवात. हा अनुभव रोहिणीबाईनंहि विसरूं नये.

या प्रसंगीं उपदेशाचे डोस तुम्हांला पाजणं बरोबर होणार नाहीं. पुनर्मीलनाचा आनंद लुटण्यांत तुम्हीं गर्क असाल. यावेळीं परस्परांशीं गुजगोष्टी करण्यापलीकडं तुम्हांला काय सुचणार ? म्हणून माझं पत्र तुम्हीं ताबडतोब वाचा असा आग्रह मी करीत नाहीं. सावकाश सवड होईल तेव्हां वाचा. दोघंहि वाचा.

चि. सौ. रोहिणीबाईस प्रेमपूर्वक आशीर्वाद. तुमच्या जीवनांतला आजचा आनंदीआनंद निरंतर टिकून राहो असें इच्छितों. लोभ असावा हे आशीर्वाद.

तुमचा

दादा

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें


**वि. स. खांडेकर**

१ फुलें आणि दगड १॥।
२ घरट्याबाहेर १॥।
३ पहिलें प्रेम (आ. २ री.) ३
४ जळलेला मोहर ३
५ क्रौंचवध ४
६ सायंकाल (आ. २ री.) २॥
७ अविनाश १॥।
८ मंदाकिनी १॥।
९ सहा भाषणें २
१० कलिका २।
११ स्त्री आणि पुरुष २
१२ पांढरे ढग ४।

**ग. त्र्यं. माडखोलकर**

१ अवशेष २
२ नागकन्या २
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार (जप्त) ४
५ चंदनवाडी ६॥
६ व्यक्तिरेखा २।

**ना. धों. ताम्हनकर**

१ तात्या भा. १ ला. २॥
२ तात्या भा. २ रा. ३
३ निवाडे भा. १ ला. २॥
४ चकमकी १॥
५ बच्चा नवरा १॥
६ अनेक आशीर्वाद ३॥

**चिं. वि. जोशी**

१ आणखी चिमणराव (आ. २) ४
२ नवें भारूड २
३ स्टेशनमास्तर २

**साने गुरुजी**

१ पुनर्जन्म २॥
२ आस्तिक २॥

**दत्तु बांदेकर**

१ सख्याहरी १॥।
२ नवी आघाडी १॥

**द. र. कवठेकर**

१ अपुरा डाव १
२ रेशमाच्या गांठी १॰
३ आभाळाची सांवली ४

**वा. म. जोशी**

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २।
१ नवें जग ?–पु. य. देशपांडे २॥
१ रॉयचरित्र–भाई बंक १॥

**प. ले. वि. स. खांडेकर**

१ काव्यज्योति १
१ पारंब्या–आनंदीबाई जयवंत १॥

**लक्ष्मण० सरदेसाई**

१ ढासळलेले बुरूज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

१ व्यक्तिचित्रें २॥
१ फसगत–ना. ह. आपटे १॥
१ साखरपुडा–प्र. के. अत्रे १॥

**कृष्णाबाई मोटे**

१ मीनाक्षीचें जीवन २।
१ चलतीं नाणीं र. गो. सरदेसाई २

**रा. श्री. जोग**

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८
१ हितपत्रें–ना. म. पटवर्धन १
१ बेबीची बहीण वि. वि. बोकील १
१ ग्रह आणि तारे–सत्यग्राही ४॥

**अनंत काणेकर**

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे १

**काकासाहेब कालेलकर**

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १॥

**य. दि. पेण्ढरकर**

१ प्रापंचिक पत्रें १
१ स्टॅलिन–वि. म. भुस्कुटे ३॥

**कमलाबाई टिळक**

१ आकाशगंगा २॥